सत्यमेव जयते

# अनुसूचित जाती कल्याण समिती

## (२०२४-२०२५)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

### सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे मार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील नागरिकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतचा

# पहिला अहवाल

(हा अहवाल विधानसभेस / विधानपरिषदेस दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
मार्च, २०२६

सत्यमेव जयते

# अनुसूचित जाती कल्याण समिती

## (२०२४-२०२५)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

## सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे मार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील नागरिकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतचा

# पहिला अहवाल

**(हा अहवाल विधानसभेस / विधानपरिषदेस दिनांक ......................., २०२६ रोजी सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
विधान भवन, मुंबई.

..........., २०२६

# अनुसूचित जाती कल्याण समिती

(२०२४-२०२५)

(पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

## सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे मार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील नागरिकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतचा

# पहिला अहवाल

# अनुसूचित जाती कल्याण समिती

## (सन २०२४ -२०२५)

**समिती प्रमुख**

(१) श्री. नारायण कुचे, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२) श्री. भिमराव केराम, वि.स.स.

(३) श्री. तान्हाजी मुटकुळे, वि.स.स.

(४) डॉ. अशोक माने, वि.स.स.

(५) श्री. श्याम खोडे, वि.स.स.

(६) श्री. मंगेश कुडाळक र, वि.स.स.

(७) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.

(८) श्री. संजय बनसोडे, वि.स.स.

(९) श्री. सचिन पाटील, वि.स.स.

(१०) श्री. गजानन लवटे, वि.स.स.

(११) श्री. संजय मेश्राम, वि.स.स.

(१२) श्री. अमित गोरखे, वि.प.स.

(१३) श्री. अमोल मिटक री, वि.प.स.

(१४) डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स.

(१५) श्री. जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. डॉ. विलास आठवले, सचिव - ३

२. श्री. सुभाष नलावडे, सह सचिव (समिती) तथा वि.का.अ.

३. श्रीमती सीमा तांबे, अवर सचिव

४. श्री. राहुल लिंगरवार, कक्ष अधिकारी.

# अनुसूचित जाती कल्याण समिती
# (सन २०२० -२०२१)

**समिती प्रमुख**

(१) कुमारी प्रणिती शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२) डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स.

(३) श्री. संतोष बांगर, वि.स.स.

(४) श्री. यशवंत माने, वि.स.स.

(५) डॉ. किरण लहामटे, वि.स.स.

(६) श्री. लहू कानडे, वि.स.स.

(७) श्री. लखन मलिक , वि.स.स.

(८) श्री. सुनील कांबळे , वि.स.स.

(९) श्री. नामदेव ससाणे, वि.स.स.

(१०) श्री. टेकचंद सावरकर, वि.स.स.

(११) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.

(१२) श्री. अरुण लाड, वि.प.स.

(१३) श्री. राजेश राठोड, वि.प.स.

(१४) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१५) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(१६) श्री. राजू जयवंतराव आवळे, वि.स.स.
(निमंत्रित सदस्य)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. शिवदर्शन साठ्ये, सह सचिव

२. श्री. घ. ज्ञा. देबडवार, कक्ष अधिकारी.

**टिप :**

(१) सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी ५ नोव्हेंबर, २०२० रोजी विधानसभा नियम २३३ अन्वये व मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजी विधानपरिषद नियम २११ अन्वये वरील विधानसभा/विधानपरिषद सदस्यांची अनुसूचित जाती कल्याण समितीवर नामनियुक्ती केली आहे.

(२) * श्री. राजू जयवंतराव आवळे, वि.स.स. यांची दिनांक २८ जानेवारी, २०२१ रोजी निमंत्रित सदस्य म्हणून मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी समितीवर नामनियुक्ती केली आहे.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **प्रस्तावना** | |
| १ | अहवाल | १ ते ५४ |
| | सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचेमार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील नागरिकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसदर्भात | |
| २ | परिशिष्ट "एक " | |
| | सामाजिक न्याय विभाग व आयुक्त, समाजकल्याण यांचेकडून समितीला प्राप्त माहिती | ५५ ते ११८ |
| ३ | परिशिष्ट "दोन" | |
| | सामाजिक न्याय विभाग यांचेकडून विभागीय सचिवांच्या बैठकीकरिता प्राप्त माहिती | ११९ ते १४१ |
| ४ | परिशिष्ट "तीन" | |
| | (समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त) | १४३ ते १४९ |

## प्रस्तावना

मी, अनुसूचित जाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ रोजी विधान भवन, मुंबई येथे सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण आयुक्तालयातील संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. उक्त बैठकीत अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना व विशेष घटक योजनेसंदर्भात सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचेकडून संगणकीय सादरीकरणाद्वारे (Power Point Presentation) माहिती देण्यात आली.

उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक २४ मे, २०२२ रोजी विधान भवन, मुंबई येथे विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचार विनिमय करून त्यासंदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊ न केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारुप अहवाल दिनांक  २३ मार्च, २०२६ रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व किरकोळ दुरुस्तीसह तो संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक  २३ मार्च, २०२६.

**नारायण कुचे**
समिती प्रमुख,
अनुसूचित जाती कल्याण समिती.

# अहवाल

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक बुधवार, दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीत सामाजिक न्याय विभागाकडून अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे संगणकीय सादरीकरण (Power Point Presentation) करण्यात आले.

समितीच्या बैठकीच्या वेळी आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस पुढीलप्रमाणे माहिती सादर केली. राज्यात एकूण ११.२३ कोटी लोकसंख्या असून त्यापैकी १.३३ कोटी लोकसंख्या अनुसूचित जातीची आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार ८२.९१ टक्के सर्वसाधारण साक्षरतेचे प्रमाण असून अनुसूचित जातीमधील साक्षरतेचे प्रमाण ७९.६६ टक्के इतके आहे. दिनांक २६ सप्टेंबर, २००८ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती प्रवर्गात ५९ जातींचा समावेश आहे. सरळसेवा व पदोन्नतीमध्ये गट-अ मध्ये ३२.१७ टक्के, गट-ब मध्ये २७.७७ टक्के, गट-क मध्ये ११.६७ टक्के आणि गट-ड मध्ये १६.१२ टक्के पदे रिक्त आहेत.राज्यात अनुसूचित जाती - १३ टक्के, अनुसूचित जमाती - ७ टक्के, निरधिसूचित जमाती (अ) - ३ टक्के, भटक्या जमाती (ब) - २.५ टक्के, भटक्या जमाती (क) - ३ टक्के, भटक्या जमाती (ड) - २ टक्के, विशेष मागास प्रवर्ग - २ टक्के, इतर मागास प्रवर्ग - १९ टक्के, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक - १० टक्के तसेच सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गाला १३ टक्के आरक्षण आहे. त्यापैकी सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गाच्या आरक्षणाच्या अंमलबजावणीस सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे.

समाजकल्याण विभागात एकूण ३५०९ मंजूर पदे आहेत. त्यापैकी २१०७ पदे भरलेली आहेत व १४०२ पदे रिक्त आहेत. अशाप्रकारे १/३ (एक तृतीयांश) पदे रिक्त असून २/३ (दोन तृतीयांश) पदे कार्यरत आहेत. राज्यात दिनांक २ जून, २०१५ व दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सरळसेवा भरतीसाठी निर्बंध आहेत. सध्या पदोन्नतीच्या माध्यमातून पदे भरण्याकडे कल आहे. जेणेकरुन त्यातून पदे उपलब्ध होतील. पदोन्नती देत असताना अनुसूचित जातीमधील कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्यात येते. पदोन्नतीसाठी गोपनीय अहवाल विचारात घेत असताना ते एक टप्पा वाढवून विचारात घेण्यात येते. त्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना विभागीय परीक्षेची एक वाढीव संधी दिली जाते. जेणेकरुन या समाजातील

लोकांना मदत होईल. संविधानाच्या अनुच्छेद ३३८(२) नुसार केंद्रातील सामाजिक न्याय विभागाचे आयुक्त या बाबतचा अहवाल संसदेमध्ये सादर करीत असतात. त्या अनुषंगाने समितीकडे अहवाल सादर केले आहेत.

अनुसूचित जातीकरिता केंद्र व राज्य शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. समाजकल्याण विभागाचा शिक्षण विभाग हा मोठा गाभा आहे. या विभागाच्या माध्यमातून शिक्षण विभागांकरिता विविध योजना राबविल्या जातात. शैक्षणिक योजनेमध्ये शिष्यवृत्ती आणि निर्वाह भत्ता तसेच वसतिगृहे आणि शाळा असे दोन भाग आहेत. शिष्यवृत्ती आणि निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना आहे. दहावीमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ दिला जातो. मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेमध्ये पाचवी ते सातवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, आठवी व दहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील मुलींसाठी शिष्यवृत्ती तसेच नववी व दहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील मुलांसाठी शिष्यवृत्ती आहे. तसेच अस्वच्छ व्यवसायामध्ये काम करणाऱ्या लोकांच्या पाल्यांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती दिली जाते. अस्वच्छ व्यवसायामध्ये काम करणाऱ्या लोकांच्या मुलांसाठी महाराष्ट्रात २ शाळा सुरू केल्या होत्या. त्यापैकी एक शाळा येरवडा, पुणे येथे सुरू आहे. तसेच नागपूर येथील शाळा कमी विद्यार्थी संख्येअभावी बंद पडली होती. सदरहू शाळेची सचिवांसमवेत पाहणी केली असून तेथील बंद पडलेली शाळा सुरू करण्याची कार्यवाही देखील सुरू आहे, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

सदर शाळा नागपूरला कोणत्या भागात आहे ? अशाप्रकारे काही शाळा प्रस्तावित आहेत काय ? आयटीआयमधील अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना योजनेमार्फत दिल्या जाणाऱ्या लाभासंबंधी विचारणा समितीने केली असता आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस खालीलप्रमाणे माहिती दिली.

सदर शाळा हिंगणा येथे आहे. या शाळा राज्य शासनामार्फत सुरू केल्या आहेत. महाराष्ट्रातील सैनिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी निर्वाहभत्ता दिला जातो. भोसले मिलिट्री स्कूल, सातारा येथील सैनिक शाळा यांना १०० टक्के खर्चाकरीता अनुदान दिले जाते. त्या अनुषंगाने महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, मागासवर्गीय मुलांमुलींकरिता मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती दिली जाते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील

विद्यार्थ्यांसाठी विद्यावेतन तसेच दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता पुरस्कार दिला जातो. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राज्यात शासकीय वसतिगृहे आहेत. तसेच ज्या मुलांना वसतिगृहामध्ये प्रवेश मिळत नाही अशा विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना आहे. त्या माध्यमातून त्यांना वसतिगृह न मिळाल्यामुळे राहण्याकरिता असलेल्या फी ची प्रतिपूर्ती केली जाते. अनुसूचित जातीतील नवबौध्दांच्या मुलामुलींकरिता प्रत्येक तालुक्यामध्ये निवासी शाळा सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे. त्या माध्यमातून यावर्षी शासनाकडे जवळपास १०० प्रस्ताव दिलेले आहेत. त्यासंबंधी शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. आतापर्यंत केंद्र व राज्य शासनाचे पोस्ट मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसंबंधी सूत्र नियोजन आयोगाने निर्धारित करून दिलेले होते. त्यानुसार मागील वर्षी असलेल्या विद्यार्थ्यांचा कॅप गृहीत धरुन जेवढे अतिरिक्त होईल तेवढा हिस्सा केंद्र शासनाकडून दिला जात होता. त्यावेळी राज्य शासनाला स्वतःचा भार सहन करावा लागत होता. त्यामुळे महाराष्ट्र तसेच उत्तर प्रदेशसारख्या मोठया राज्यांना मोठया प्रमाणात आर्थिक फटका बसत होता. त्या कॅपमध्ये जास्त विद्यार्थी बसत असल्यामुळे राज्य शासनाचा हिस्सा वाढून केंद्र शासनाचा हिस्सा कमी होत आहे. माननीय मंत्री व सचिव यांच्या मार्गदर्शनानुसार या संदर्भात चर्चा केली व त्यात केंद्र शासनाकडून इतर योजनांप्रमाणे या योजनेमध्ये ६०:४० असा हिस्सा ठेवण्यात येणार आहे. याकरिता आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने चांगली मदत केली आहे. अशाप्रकारे निर्णय झाल्यामुळे महाराष्ट्र राज्याला या योजनेत जवळपास ५५० कोटी रुपयांचा फायदा होणार असून महाराष्ट्रात जवळपास १२ हजार महाविद्यालये आणि १.०८ लाख शाळा शिष्यवृत्तीमध्ये समाविष्ट होत आहेत. तसेच १२०० पेक्षा जास्त कोर्सेसकरिता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. त्यात ५.५ लाख विद्यार्थी मॅट्रीकमधील आणि ४.५ लाख विद्यार्थी मॅट्रीकपूर्व आहेत. सदर योजनांमध्ये पारदर्शकता यावी आणि विद्यार्थ्यांना योजनांचा लाभ तात्काळ मिळण्याकरिता महाडीबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्याबाबत प्रयत्न करण्यात येत होते. त्याबाबतीत सन २०१७-१८ पासून कार्यवाही सुरू केली व आतापर्यंत ४ शिष्यवृत्तींची रक्कम महाडीबीटीद्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा केली आहे. उर्वरित एक वर्षात सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम महाडीबीटीद्वारे देण्याचे नियोजन केले आहे. जेणेकरुन त्यात पारदर्शकता येऊन विद्यार्थ्यांना त्याचा तात्काळ फायदा होऊ शकेल.

सदर योजनेअंतर्गत दरवर्षी जवळपास ३.७८ लाख विद्यार्थी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी नोंदणी करत असतात. सन २०२१ मध्ये ही संख्या जवळपास ४ लाखपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. समाजकल्याण आयुक्तालयाकडे माहे फेब्रुवारी, २०२१ पर्यंत ३०० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. त्याची प्रतिपूर्ती सुरू केली आहे. आतापर्यंत १.२५ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून आवश्यक त्या पूर्तता पूर्ण झालेल्या १५,६२९ विद्यार्थ्यांना यावर्षी शिष्यवृत्ती दिली आहे. शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीच्या योजनेमध्ये ४०,२१७ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लाभ दिला आहे. ऑनलाईन फॉर्म घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. दहावीमधून अकरावीमध्ये प्रवेश घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. दहावीमधून अकरावीमध्ये १७ हजार ४११ विद्यार्थ्यांना लाभ प्रवेश देऊन त्यांचे अभ्यास गट तयार केले असल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती या योजनेमधून दहावीतील विद्यार्थ्यांना दर महिन्याला ३०० रुपये देण्यात आलेले आहेत. सन २०११ नंतर शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती या रक्कमेत वाढ झालेली नसल्याचे तसेच या योजनेमधील लाभार्थ्यांची संख्या देखील कमी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर योजनेंतर्गत पालकांच्या उत्पन्नाची अट काय आहे व सदर योजनेत लाभार्थी कमी असण्याची कारणे काय आहेत, अशी विचारणा समितीने केली असता दहावीमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांपुरतीच ही योजना मर्यादित असून दहावीत ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ दिला जातो. अशा विद्यार्थ्यांना अकरावी व बारावीमध्ये शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेत उत्पनाची मर्यादा घातलेली नाही. ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊ शकत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढतच असते. सन २०२०-२१ मधील लाभार्थ्यांचे अर्ज अद्याप आलेले नाहीत. सन २०२० मध्ये कोव्हिडमुळे शाळा बंद होत्या. तसेच सन २०१८-१९ व सन २०१९-२० मधील विद्यार्थ्यांची संख्या बरीच कमी आहे. ते आम्ही तपासून घेतो, असे विभागीय सचिव यांनी समितीस आश्वासित केले.

दहावीनंतर एखाद्या विद्यार्थ्याने आयटीआयला प्रवेश घेतला तर त्याला स्कॉलरशीप दिली जाते काय, अशी विचारणा समितीने केली असता वैद्यकीय, अभियांत्रिकीला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती दिली जाते. आयटीआयला जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वेगळी स्कॉलरशीप आहे. दहावीतून अकरावीला जाणाऱ्यांसाठी ही योजना आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये आयआयटी, आयआयएम अशा नामांकित शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश

घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची एक योजना आहे. त्यानुसार सन २०१९-२० मध्ये १६६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली असल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी दिली. तसेच या योजनेमध्ये सुधारणा करण्यासाठी कॅबिनेट प्रस्ताव तयार केलेला आहे. या प्रस्तावावर सध्या कार्यवाही सुरू असून याकरिता १५० नामांकित संस्थांची निवड केलेली आहे. या योजनेमध्ये खूपच कमी लाभार्थी अर्ज करीत असल्याने राज्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची योजना आहे. वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार रुपये असणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशिप आहे. २ लाख ५० हजार रुपयांवरील वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांसाठी फ्रीशीप योजना आहे. राज्यातील मुले परराज्यात जाऊन चांगल्या संस्थांमध्ये शिक्षण घेत असताना त्यांना अनेक अडचणी येत असल्याने त्यांच्यासाठी स्कॉलरशिप बाबत नवीन योजना प्रस्तावित केली जाणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळाची टिप्पणी करणे सुरू आहे. सदर योजनेत उत्पन्नाची अट आता २० लाख रुपयांपर्यंत केलेली आहे, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

राज्यातील विद्यार्थी आयआयएम सारख्या नामांकित संस्थेत प्रवेश घेतात आयआयएम सारख्या संस्थेशी संलग्नता नसल्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृती योजनेचा लाभ मिळत नसून या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेले बहूसंख्य विद्यार्थी याबाबत चौकशी करतात, अशी माहिती विभागीय सचिव, यांनी समितीस दिली.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता पुस्तकपेढी योजना तयार असून या योजनेत केंद्र शासनाचा व राज्य शासनाचा ५० टक्के असा समसमान हिस्सा आहे. राज्य शासनाला मागील काही वर्षात मॅचिंग ग्रँट प्राप्त झालेली नाही. सदरहू योजना चांगली असून देखील त्यात अडचणी येत आहेत. जिल्हा नियोजन मधून पुस्तके देण्याची एक योजना तयार करण्यात आली आहे. सन २०२१ मध्ये पुणे व नागपूर या दोन जिल्ह्यांमध्ये अभियांत्रिकी व मेडीकलसाठी ५०-५० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच २०२० मध्ये १.९ लाख मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेतून शिष्यवृत्ती दिली आहे. त्यापूर्वी २.३८ लाख मुलांना शिष्यवृत्ती दिलेली आहे. या योजनेचा प्रचार व प्रसार केला जात आहे. नववी व दहावी मधील विद्यार्थ्यांना प्रि-मॅट्रीक शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त न झाल्यामुळे अडचणी येत आहेत. या योजनेत केंद्र शासनाचा ६० टक्के व राज्य शासनाचा ४० टक्के असा हिस्सा आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. याबाबत केंद्र शासनाकडून किती निधी अपेक्षित आहे, किती वर्षापासून निधी प्राप्त झालेला नाही, या योजनेत रक्कम शिल्लक

राहिल्याचे दिसत आहे. अखर्चित राहिलेली किती रक्कम केंद्राकडे परत गेली, अशी विचारणा समितीने केली असता केंद्र शासनाचा ६० टक्के व राज्य शासनाचा ४० टक्के हिस्सा या योजनेत आहे. केंद्राने ६० टक्के निधी दिल्यानंतर राज्य शासन ४० टक्के रक्कम मॅचिंग ग्रँट म्हणून देते. सन २०१७ - १८ व सन २०१८-१९ मध्ये निधी प्राप्त झालेला नाही. सन २०१९-२० मध्ये निधी प्राप्त झाला होता. त्यावेळी ९९ हजार २०० विद्यार्थ्यांना मदत देण्यात आलेली आहे. या योजनेत प्रत्येक वर्षासाठी रक्कम ठरवून दिलेली आहे. त्या वर्षी अखर्चित राहिलेली रक्कम नंतर लॅप्स होते. सन २०१९-२० मध्ये २१ हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिलेली आहे. ही आकडेवारी कमी वाटत असल्याचे दिसून येते त्याबाबतची माहिती तपासून घेण्यात येईल, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली. या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या कमी आहे व निधी वापरला गेला नाही. सन २०१९-२० मधील रक्कम खर्च झाली नाही. लोकांपर्यंत योजना पोहचत नसल्याने लाभार्थ्यांना निधी मिळत नसल्याचे मत समितीने व्यक्त केले. त्यावर नववी व दहावीमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना आहे. एकूण ६२६५ कोटी रुपये प्राप्त झाले असून २२३२ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. तरी उक्त आकडेवारी तपासून घेण्यात येईल, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

अस्वच्छ व्यवसायामध्ये काम करणाऱ्या कामगारांमध्ये कोणाचा समावेश होतो, सफाई कामगारांव्यतिरिक्त इतरांसाठी कोणत्या योजना आहेत, अशी विचारणा समितीने केली असता सन २०१३ च्या कायद्यानुसार अस्वच्छ व्यवसायामध्ये काम करणाऱ्या नागरिकांच्या कल्याणासंबंधी एक समिती तयार केली असून जिल्हाधिकारी समितीचे अध्यक्ष असतात नगरपालिका, महापालिका व ग्रामपंचायत येथे अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या लोकांच्या नावांची नोंद घेण्यात येते, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली असता मुंबई महापालिकेत ही योजना सुरू असल्याचे दिसून येत नाही. तसेच या योजनेसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळतो. या योजनेचे परीक्षण करणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले. तसेच राज्य शासनामार्फत ही योजना राबवली जाते. मागील ३ वर्षापासून सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला नाही. जो निधी आला तो लोकांपर्यंत पोहचत नाही. ज्या कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त होते, त्यांच्या पाल्यांना नंतर शिष्यवृत्ती दिली जाते काय, या योजनेचे १ हजार कोटी रुपये शिल्लक राहिले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात किती लाभार्थ्यांना निधी दिलेला आहे, राज्याला या योजनेचा निधी नियमितपणे दिला जात नसून

राज्य शासन मॅचिंग रक्कम खर्च करीत नाही काय, अनेक योजनेकरिता प्राप्त होणारा निधी व्यपगत होतो व तो परत जातो, अशी विचारणा समितीने केली असता अस्वच्छ कामगारांच्या पाल्यांना शिष्यवृती देण्याचा विषय लाड - पागे समितीमध्ये आहे. त्यांच्या पाल्यांची शिष्यवृत्ती नंतरही सुरू राहते. तसेच या योजनेची पडताळणी करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीला दिली. जिल्ह्याच्या ठिकाणी प्रत्येक शाळेत ऑनलाईन नोंदणी झाली किंवा किती मुलांची नोंद करण्यात आली असून किती मुलांचे फॉर्म आले, किती फॉर्म आले नाहीत याबाबतची माहिती देण्यात यावी याबाबत तसेच मागासवर्गीय योजनांचा निधी इतर विभागांकडे वर्ग केला जातो काय, याबाबतची देखील माहिती देण्याबाबत समितीने सूचित केले. त्यावर ज्या योजना सुरू आहेत त्या योजनांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. या योजनेतून विद्यार्थ्यांना दरमहा ५० रुपये व १०० रुपये देतो. काही मुलांना वेळेवर मिळत नसतील तर या योजनेबाबत जागरुकता निर्माण केली पाहिजे. या योजनेस एकूण २५ ते ३० वर्षे झाली असून सन १९९५ मध्ये शेवटची सुधारणा झालेली आहे, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मागासर्गीय मुला / मुलींकरिता मॅट्रिकपूर्व शिक्षण फी व परीक्षा फी योजना :-**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मागासर्गीय मुला/मुलींकरिता मॅट्रिकपूर्व शिक्षण फी व परीक्षा फी योजनेमध्ये ६२३८ एवढ्या विद्यार्थ्यांना लाभ दिलेला आहे. या योजनेत सन २०१८-२०१९ मध्ये जवळपास तीन ते साडेतीन हजाराच्यावर लाभार्थी होते. सन २०१९-२०२० मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) फक्त टोकन तरतूद होती. सन २०२० २०२१ मध्ये एकूण ३८ लाख रुपयांची तरतूद आहे. या वर्षातसुध्दा तरतूद आलेली आहे. या योजनेअंतर्गत ६० व ४० रुपये शिष्यवृती प्रती विद्यार्थी दिली जाते, अशी माहिती आयुक्त समाजकल्याण यांनी समितीस दिली.

सदर योजनेचा लाभ सन २०१८-२०१९ मध्ये एकूण ३१६६ लाभार्थ्यांनी घेतला. त्याचा खर्च १९ लाख रूपये झाल्याचे नमूद केले आहे. सन २०२०-२०२१ मध्ये ४१९ लाभार्थ्यांनी लाभ घेतला, त्याचा खर्च २५.१४ लाख रुपये झाल्याचे नमूद केले आहे, याबाबतची माहिती देण्याबाबत समितीने सांगितले असता, सन २०१९-२०२० या वर्षात तरतूदच केलेली नव्हती. सन २०२० - २०२१ या वर्षातील आर्थिक तरतूद सन २०१९-२०२० च्या लाभार्थ्यांसाठी

खर्च झालेली दिसत आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था ( आयआयटी ) सुरू झालेली नसल्याने सन २०२१-२०२२ या वर्षीचे अर्जच उशिरा येणार आहेत. सद्यस्थितीत पोस्ट मॅट्रिक या शिष्यवृतीबाबत पुनरावलोकन करून पूर्ण अर्ज भरण्याबाबत सांगितले आहे. सन २०२०-२०२१ या वर्षात ४१९ लाभार्थी दाखविले असले तरी सन २०१९-२०२० या वर्षातील रक्कम खर्च झालेली आहे. तसेच छात्रवृत्तीसह सर्व योजनांची पुनर्तपासणी करून घेण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिव, यांनी समितीस दिली असता छात्रवृत्ती वाढवण्याबाबत तसेच जी उत्पन्न मर्यादेची अट आहे त्याबाबत विचार करण्याबाबत समितीने सूचना केली.

अनुसूचित जातीच्या दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या मुला-मुलींना छत्रपती राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार देण्यात येतो. सन २०१९-२०२० मध्ये एकूण १०७२ मुलांना हा पुरस्कार दिलेला आहे. यावर्षीही हे काम सुरू आहे. या वर्षीही तेवढ्याच विद्यार्थ्यांना हा पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

उपरोक्त नमूद योजना लोकांपर्यंत पोहोचत नाहीत, तोपर्यंत त्या योजनांसाठी अर्ज येणार नाहीत. या सर्वच योजनांची प्रसिध्दी होईल तसेच विद्यार्थ्यांपर्यंत ज्या संस्था या योजना पोहोचवणार नाहीत, अशा संस्थांवर कारवाई करणे आवश्यक आहे या योजनांची प्रसिध्दी होणे अत्यंत महत्वाचे आहे, त्यासाठी या योजना सर्व सामान्य नागरिकांना समजतील त्या भाषेत सर्वसमावेशक एकत्रित करून पुस्तक स्वरुपात वितरीत कराव्या, यासाठी शासनाकडून प्रत्येक जिल्ह्यात प्रसिध्दीकरिता १५ लाखांची तरतूद करण्यात येते. अनेक नागरिकांना शासकीय योजनांची माहिती नसल्याकारणाने निधी अखर्चित राहतो तसेच कष्टकरी समाजात पालक अज्ञानी किंवा कमी शिकलेले असल्याने त्यांच्यापर्यंत शासनाच्या या योजना पोहोचत नाहीत, त्यामुळे योजना लोकांपर्यंत पोहचण्यासाठी योजनांची प्रसिध्दी करण्यात यावी, अशी सूचना समितीने विभागास केली.

राज्यात सध्या एकूण ४४१ शासकीय वसतिगृहे सुरू आहेत. ज्यांचे जवळपास २.५ लाखांपेक्षा कमी उत्पन्न आहे, अशा आठवी व त्या पुढील सर्व अनुसूचित जाती प्रवर्गातील पाल्यांना वसतीगृहात प्रवेश दिला जातो. या विद्यार्थ्यांना भोजनासह निर्वाह भत्ता व इतर सर्व सुविधा पुरविल्या जातात. ज्या विद्यार्थ्यांना अशा शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळत नाही त्या विद्यार्थ्यांकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केली असून त्यामध्येही

अटी त्याच आहेत. फक्त काही मुलांना प्रवेशासाठी अर्ज करुनही वसतिगृहामध्ये प्रवेश मिळत नाही, त्यांच्यासाठी निधी शासनाकडून देण्यात येतो. अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

शासकीय वसतिगृहांमधील पायाभूत सुविधांच्या सुधारणा कोणाकडून करण्यात येते, शासकीय वसतिगृहे किती आहेत, आश्रमशाळा किती आहेत, त्यातील किती वसतिगृहे/आश्रमशाळा भाड्याच्या जागेत आहेत व किती संस्थांना भाडे देण्यात आले तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह सुधारणा करण्यासाठी किंवा देखभालीसाठी किती निधी वर्ग केला आहे, याची माहिती देण्यात यावी तसेच समितीच्या दौऱ्याच्या वेळी सावंतवाडी येथील वसतिगृहाला समितीने भेट दिली असता तेथील इमारत मोडकळीस आल्याचे निदर्शनास आले. तेथील पंखे, शौचालय या सुविधाही वसतिगृहात पुरविण्यात आल्या नव्हत्या. जिल्हयातील अनेक वसतिगृहांमध्ये गरम पाणी देखील उपलब्ध होत नाही. सर्व वसतिगृहांची पाहणी केल्यास वसतिगृहे सुस्थितीत राहतील.

सोलापूर जिल्ह्यातील नजीक पिंपरी गावात १५ ते २० कोटी रुपये खर्च करून त्या निवासी शाळेची प्रशस्त इमारत बांधण्यात आली. परंतु, शिक्षक कमी असल्याने शाळा अद्यापही सुरू करण्यात आली नाही. त्या शाळेत पूर्वी २०० मुले होती. परंतु, त्यांना शिकविण्याकरिता शिक्षक पुरेशा प्रमाणात नाहीत तसेच सामाजिक न्याय विभागाने सध्या सर्व सहाय्यक आयुक्तांना पत्र देऊन जिल्ह्यामध्ये मुलींच्या निवासी शाळा प्रस्तावित असून त्याकरिता जागा उपलब्ध असल्यास कळविण्याबाबत कळविले आहे त्याच बरोबर जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधींशी याबाबत विचारविनिमय करावा जेणेकरुन त्यांनादेखील निवासी शाळेसाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी मदत करता येईल, अशी सूचना समितीने केली असता यावर ही सर्वसाधारण कार्यप्रणाली असून विभागाला कळविल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क करून तालुक्यामध्ये कोणत्या ठिकाणी जागा उपलब्ध आहेत याची माहिती मागविण्यात येते. याबाबत लोकप्रतिनिधीही जागा उपलब्ध असल्यास सूचवू शकतात, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

सद्यस्थितीत जागांचे मूल्य पूर्वीपेक्षा जास्त पटीने वाढले आहे. जागा ही फार मौल्यवान गोष्ट झाली असल्याने जिल्हाधिकारी, तहसीलदार यांच्या सहकार्याशिवाय प्रक्रिया पार पाडता येत नाही. अहमदनगर येथे सामाजिक न्याय भवन इमारत बांधण्यासाठी राज्य

परिवहन महामंडळाची जागा विकत घेण्यात आली. जिल्हयात अनेक शाळांना त्या वेळेस बाजूच्या जमिनीवर शेकडो एकर जागा मोफत दिल्या आहेत. तेथे सामाजिक न्याय विभागाने कोट्यवधी रुपये खर्च करून जागा खरेदी करून सामाजिक न्याय भवनची इमारत बांधली. प्रत्येक जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातीचा एक लोकप्रतिनिधी असून अशा कारणासाठी किमान त्यांच्याशी तरी विचारविनिमय करण्यास सांगितले पाहिजे तसेच अशा वेळी जागा उपलब्ध न झाल्यास तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन त्यांचे सहकार्य घेणे आवश्यक आहे. अशी सूचना समितीने केली असता यावर विभागीय सचिव यांनी १५ दिवसांपूर्वी सर्व जिल्हाधिकाऱ्यांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेऊन कोणकोणत्या ठिकाणी जागा उपलब्ध होत नाहीत, याची माहिती घेण्यात येत आहे. ज्या ठिकाणी जागा उपलब्ध नाहीत त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना स्वतः जागा उपलब्ध करून देण्याबाबत सांगितले आहे. त्यानुसार विभागाकडे आता २ ते ३ प्रस्ताव आले आहेत, अशी माहिती विभागीय सचिव, यांनी समितीस दिली.

अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलांमुलीकरिता प्रत्येक तालुक्यात एक निवासी शाळा सुरू करण्याकरिता कार्यवाही केली जाते. शासकीय वसतिगृहे, निवासी शाळा, सामाजिक न्याय भवन इत्यादी इमारती बांधकामाबाबत एकूण मंजूर बांधकामांची संख्या ३९१ इतकी आहे त्यापैकी २६६ बांधकामे पूर्ण झाली असून ६१ बांधकामे सुरू आहेत. तसेच जागा उपलब्ध नसलेले ४७ बांधकामे आहेत, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली. तसेच बांधकामाकरिता जागा उपलब्धतेबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांसमवेत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेऊन चर्चा केली आहे, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

शासकीय वसतिगृहे, निवासी शाळा व सामाजिक न्याय भवन उभारण्याच्या जागेच्या उपलब्धतेसंबंधी सचिव स्तरावर पाठपुरावा करण्यात यावा. जागा उपलब्ध नसलेली बांधकामांची संख्या मोठी असून बांधकामांसाठी जागा सत्वर उपलब्ध होण्याबाबत कार्यवाही होणे अत्यंत आवश्यक आहे. जिल्हा पातळीवर या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि सामाजिक न्याय विभाग यांच्यामध्ये योग्यप्रकारे समन्वय दिसत नाही. जिल्हानिहाय सार्वजनिक बांधकाम विभाग आणि सामाजिक न्याय विभागाने त्यांना वितरित झालेला निधी योग्यप्रकारे वापरला जात आहे किंवा नाही याबाबत एकत्रितपणे आढावा घेणे अत्यावश्यक आहे अशी सूचना समितीने विभागाला केली असता पुणे जिल्हयाबाबत अशाप्रकारचा

आढावा घेतला असता काही मुद्दे निदर्शनास आले. त्यानंतर प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग आणि सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यासमवेत चर्चा करून त्याबाबत अर्धशासकीय पत्राद्वारे त्यांना कळविले असल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली. तसेच सामाजिक न्याय विभागाकडील बांधकामे करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला निधी दिला जातो. परंतु त्यांच्याकडून अनेकवेळा कामाकडे दुर्लक्ष होत असते. सद्यस्थितीत सामाजिक न्याय विभागामध्ये बांधकाम कक्ष स्थापन करण्याबाबत माहे जानेवारी, २०२१ मध्ये प्रस्ताव तयार करण्यासाठी सुरुवात केली आहे. आदिवासी विकास विभागाने ३ वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या कक्षाप्रमाणे कक्ष तयार करण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील डीव्हीजन हस्तांतर करून मंत्रालय स्तरावर काही नवीन पदे निर्माण करण्यात येऊन कक्ष नियंत्रित करण्यात येईल. याबाबत कार्यवाही सुरू केली असल्याची माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

राज्यात एकूण २३८८ अनुदानित वसतिगृहे आहेत. त्यात ९९,२५२ विद्यार्थी संख्या आहे. अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी शाहू फुले आंबेडकर निवासी / अनिवासी शाळा योजनेमध्ये १६५ आश्रमशाळा असून त्यांना २० टक्के अनुदान दिले जाते. त्यांची १०० टक्के तपासणी झालेली आहे. त्याबाबत छाननी करून ती माहिती शासन स्तरावर पाठविण्यात येईल. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेत शासनातर्फे लाभार्थ्यांना ४ एकर जिरायत अथवा २ एकर बागायत जमीन दिली जाते. सदर योजनेअंतर्गत सन २०१७-१८ मध्ये २०६, सन २०१८-१९ मध्ये ३५३ आणि सन २०१९-२० मध्ये १७० लाभार्थ्यांना लाभ दिला आहे. सन २०२० - २१ या वर्षाकरिता विभागाकडे १२.५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून निधी वर्ग केल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली असता सदर योजना अतिशय लोकप्रिय असताना सन २०१७-१८ मध्ये फक्त २०६ लाभार्थ्यांनाच लाभ दिला आहे. या संदर्भात लोकांकडून जास्त मागणी केली जात आहे. शेती विकणाऱ्यांची आणि जमीन मागणाऱ्यांची संख्या जास्त आहे. सदरहू योजनेमध्ये लाभार्थी संख्या कमी असल्याने हजारो लाभार्थ्यांना एका वर्षामध्ये लाभ मिळणे आवश्यक असल्याचा मुद्दा समितीने मांडला असता सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी अनेक लाभार्थी जिल्हयातील समाजकल्याण कार्यालयामध्ये वारंवार पाठपुरावा करीत असतात. परंतु त्यांना सहकार्य मिळत नाही. मोहोळ तालुक्यातील (जि. सोलापूर) येथील नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याकरिता सादर केलेल्या कागदपत्रास मंजूरी देण्यात आली होती. परंतू सहायक आयुक्तांनी

याबाबत जिल्हाधिकारी यांचेकडून मार्गदर्शक सूचना मिळाल्या नसल्याचे कारण दिले. त्यामुळे सदर लाभार्थ्याला ४ एकर जिरायत अथवा २ एकर बागायत जमिनीचा लाभ मिळू शकला नाही. अशा प्रकारे सदर लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्यांना अनेक अडचणी येत आहेत. सदर योजनेमध्ये अशाप्रकारे कार्यवाही होत असल्यास लाभार्थ्यांना शेती मिळवून देण्यासाठी अनेक वर्षे लागतील. त्यामुळे सदर योजनेचा वेग वाढवून प्रत्येक वर्षी किमान १० हजार लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठेवणे आवश्यक आहे. हजारो एकर पुनर्वसित जमिनी तशाच पडून आहेत. त्या लोकांना सदर जमिनी न दिल्यामुळे किमान अशा लाभार्थ्यांना त्या जमिनी देणे आवश्यक आहे. सध्या त्या जमिनी ज्या मालकांकडून घेतलेल्या आहेत, तेच लोक त्या जमिनी कसत आहेत. किंवा अनेक ठिकाणी जमिनी तशाच पडून आहेत. त्यामुळे या संदर्भात महसूल विभागासमवेत बैठक आयोजित करून त्यांच्या स्तरावर निर्णय घेणे गरजेचे आहे, तसेच सदर योजनेमध्ये आतापर्यंत किती लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला व योजना कधी सुरू झाली, याबाबत विचारणा समितीने केली असता सदर योजना सन २००४-२००५ मध्ये सुरू झाली होती. सदर योजनेत आतापर्यंत ६१९२ लाभार्थ्यांना जमीन वाटप करण्यात आली आहे. अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली. यावर समितीने सदर योजनेमध्ये लाभार्थ्यांना साहित्य देण्याऐवजी जमीन दिली जाते. जमिनीच्या रेडी रेकनरचे दर वाढलेले असताना सुद्धा सामाजिक न्याय विभागाकडून अद्यापही जमिनीचे दर वाढविण्यात आले नाहीत. सद्यस्थितीत विभागाने जमिनीचे दर जिरायतीसाठी ५ लाख रुपये प्रती एकर आणि बागायतीसाठी ८ लाख रुपये प्रती एकर अशाप्रकारे ठेवलेले आहेत. ते दर सध्याच्या रेडी रेकनर दराशी समतुल्य आहेत काय, तसेच सध्याच्या परिस्थितीत जमिनी मिळत नाहीत आणि मिळाल्यास त्या शेती करण्यायोग्य नसतात, अशा अनेक अडचणी आहेत. सामाजिक न्याय विभागाकडून जमिनीचे जे मूल्य ठरवले जाते ते किमान रेडी रेकनर दराशी मिळते जुळते असले पाहिजेत.तसेच सामाजिक न्याय विभागाकडून ज्यांच्या जमिनी विकत घेतल्या जातात. त्या जमिनी मूळ शेतकऱ्यांनी लगतच्या काळात विकल्या आहेत काय, याबाबतीत तपासणी करून चौकशी केली पाहिजे. या संदर्भात जिल्हा पातळीवर माहिती संकलित करणे अत्यावश्यक आहे, असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता याबाबत जिल्हाधिकाऱ्यांसमवेत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेऊन त्यात ज्यांनी जमीन खरेदी केली आहे, ती जमीन सद्यस्थितीत त्यांच्याच ताब्यात आहेत का, याबाबतची माहिती मागवली आहे. ती पुढील एक महिन्यात प्राप्त होईल, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना अत्यंत महत्त्वाची आहे. ती योजना तळागाळातील लोकांपर्यंत कशी

पोहोचू शकेल याकरिता विभागामधील अधिकाऱ्यांनी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे, अशी समितीने सूचना केली.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याच्या योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये एकूण ९६९ लोकांना मिनी ट्रॅक्टर दिलेले आहेत, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली. सदर योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना लाभ दिला जातो. परंतु त्या कुटुंबातील गटाव्यतिरिक्त ४-५ सदस्यांची नावे दिल्यास सदर योजनेअंतर्गत त्यांना लाभ मिळू शकतो का, साधारणतः एकाच कुटुंबातील लोक अर्ज करून बचत गट तयार करतात. त्यात अधिक पारदर्शकपणा आणि स्पष्टता येणे महत्त्वाचे आहे अशी विचारणा समितीने केली असता, या योजनेचा लाभ कुटुंबनिहाय नसून बचत गटामार्फत दिला जातो. त्या गटाने नियमानुसार बॅलन्स बुक, अकाऊंट ठेवणे बंधनकारक आहे, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली तसेच याच अनुषंगाने कोल्हापूर येथे एक तक्रार प्राप्त झाली होती. त्याबाबत चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली होती. सदर समितीचा चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त असून या योजनेमध्ये स्वयंसहाय्यता बचत गटातील सर्व सदस्यांना मिळणारा लाभ योग्यप्रकारे वाटप झाला पाहिजे. परंतु काही ठिकाणी अशाप्रकारे कार्यवाही न करता एकच व्यक्ती सदर गट चालवत आहे. अहमदनगर जिल्हयातून सुध्दा अशीच तक्रार प्राप्त झाली आहे. त्यानुसार चौकशी समितीच्या अहवालावर निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

अनेक उच्चभ्रु लोक बचतगट तयार करून त्यांचा वापर करीत असल्याने या योजनेचा लाभ मुळ लाभार्थ्यांना होत नाही. त्यामुळे सदर योजनेमध्ये बोगस लोक येणार नाहीत याची दक्षता घेऊन याप्रकरणी योग्य ती दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सदर योजनेमध्ये बोगस लाभार्थ्यांना लाभ देण्याचे प्रकार घडू नये याची विभागाने दक्षता घेणे आवश्यक आहे. या योजनेंतर्गत ट्रॅक्टर खरेदी केले जात असून त्यावेळी त्याची कंपनी व दर्जा हे ही तपासून घेऊन तात्काळ लाभार्थ्यांना ट्रॅक्टर खरेदी करण्याचा अधिकार दिल्यास लाभार्थ्यांसाठी खूप सोईस्कर होऊ शकेल. संस्थेकडून ट्रॅक्टर खरेदी केल्यामुळे भविष्यात ट्रॅक्टर दुरुस्तीची वेळ आल्यानंतर त्या कंपनीच्या ट्रॅक्टरचे साहित्य मिळत नाही. सदर योजनेअंतर्गत मिनी ट्रॅक्टर व्यतिरिक्त काही दिले जाते का तसेच ही योजना ग्रामीण भागासाठी असल्यामुळे शहरी भागाकरिता कोणती योजना आहे, अशी विचारणा समितीने केली असता शहरी भागासाठी विविध योजना आहेत, त्यात गटई कामगारांसाठी योजना आहेत, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण

यांनी समितीस दिली, सदर योजनेअंतर्गत समाजकल्याण आयुक्तालयाकडून ५ ते ६ वर्षांपूर्वी वाटप करण्यात आलेले मिनी ट्रॅक्टरचे पुनः तपासणी केली आहे का, तसेच ते ट्रॅक्टर अद्यापही लाभार्थ्यांकडे आहेत का, याची तपासणी करण्यासाठी विभागाकडे वेगळी यंत्रणा आहे का, तसेच विभागामार्फत अभ्यासगट तयार करून सदर योजनेचे अवलोकन करणे गरजेचे आहे. तसेच समितीने केलेल्या सूचनांचा विचार करून शासनाने विषय मंत्रीमंडळ बैठकीत आणून त्याला शासन स्तरावर मंजुरी मिळाल्यास त्यातून मार्ग काढता येईल, तालुका स्तरावर सदर योजना प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी तेथे कर्मचारीवर्ग व यंत्रणा दिल्याशिवाय तपासणी करता येणार नाही. अशा प्रकारे तालुका स्तरावर कर्मचारीवर्ग किंवा यंत्रणा नसल्यामुळे ग्रामपातळीवर कशाप्रकारे कार्यवाही सुरू आहे याची माहिती मिळू शकत नाही. समाजकल्याण आयुक्तालयातील आकृतीबंधासंबंधी सन २०१० मधील व्हीजन डॉक्युमेंट दाखविण्यासंबंधी विभागाकडे विनंती केली होती. त्यानुसार तत्कालीन सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी व्हीजन डॉक्युमेंट दिले होते. सामाजिक न्याय विभागाने या संदर्भात ब्लॉक लेव्हलपर्यंत काम करणे आवश्यक आहे. विशेष घटक योजनेतील कृषी अधिकाऱ्याचे वेतन सामाजिक न्याय विभागाकडून दिले जात आहे. सामाजिक न्याय विभाग तेथील कर्मचारी नेमतो. समितीने ज्या सूचना केल्या आहेत त्यांची विभागाकडून अंमलबजावणी झाली पाहिजे. सामाजिक न्याय विभागाला आर्थिक तरतुदीसंबंधी कोणतीही अडचण नाही. इतर ठिकाणी प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांना सामाजिक न्याय विभागाकडून वेतन दिले जात आहे, अशी सूचना समितीने विभागास केली.

गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेंतर्गत व्यवसाय करणाऱ्यांना स्टॉल देण्यात यावा अशी मागणी होती. प्रथमतः अशा लाभार्थ्यांना पिच परवाना देऊन त्यांना जागा उपलब्ध करून त्याप्रमाणे ते गाळा कोठेही उभारु शकतात. गटई कामगार त्यांच्या दुकानात नवीन चपला देखील विकण्यास ठेवून शकतात. तसा त्यांना व्यवसाय करता येईल अशाप्रकारची संकल्पना ही योजना राबवितांना होती, मात्र महानगरपालिकेकडून पिच परवाने मिळत नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पिच परवाण्याची मागणी करणे आवश्यक आहे. मुंबईमध्ये हजारोंच्या संख्येने गटई कामगार आहेत. महापालिकेने मुंबईतील फेरीवाल्यांचे सर्व्हेक्षण करून पिच परवाने वाटप केले. त्याप्रमाणे गटई कामगारांना पिच परवाने दिले नाहीत. या गटई कामगारांना परवाने द्यावयाचे झाले तर मुंबई महापालिकेला निधी देण्यात येतो. गटई कामगारांना केवळ स्टॉल देऊन उपयोग नाही त्यांना पीच परवाने मिळाले पाहिजे.

त्यांच्या हक्काचे उत्पन्नाचे साधन मिळाले पाहिजे व त्याकरिता पिच परवाने देणे आवश्यक असल्याचे मत समितीने मांडले. तसेच राज्यात सन २०१८-१९ मध्ये एकूण ८६४ लाभार्थ्यांना स्टॉल देण्यात आले. परंतु सन २०१९-२० मध्ये फक्त ८९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला तसेच सन २०१७ -१८ मध्ये ११६३ लाभार्थ्यांना स्टॉल उपलब्ध करून दिल्याचे तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेत महापालिका, नगरपालिका यांनी पिच परवाने दिले पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता या योजनेअंतर्गत सन २०१७-१८ मध्ये ४ हजार स्टॉल दिले होते. सन २०१८-१९ मध्ये साडे तीन हजार स्टॉल दिले होते. सन २०१९-२० मध्ये १६८६ स्टॉल देण्याचे " उद्दिष्ट होते. अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली, तसेच गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल उपलब्ध करणेबाबत एक समिती नियुक्त केली आहे. या समितीमार्फत हे काम केले जाते. निविदा प्रक्रिया संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मार्फत केली जाते. तसेच या योजनेचे लाभार्थी संपूर्ण राज्यातील असतात अशी माहिती विभागीय सचिव, यांनी समितीस दिली, त्यावर या योजनेची अंमलबजावणी शून्य असल्याचे मत समितीने मांडले.

**केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील घटकांकरिता मार्जिन मनी उपलब्ध करणेबाबत :—**

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या घटकांकरिता मार्जिन मनी उपलब्ध करून देण्याची योजना राबविण्यात येते. सदर योजनेच्या अमंलबजावणीसाठी आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. नवउद्योजकानी त्यांचे प्रकल्प अहवाल दलित इंडियन चेम्बर ऑफ कॉमर्स अ‍ॅन्ड इंडस्ट्रि, पुणे (DICCI) यांचे मार्फत तसेच इतर लाभार्थ्यांकडून कार्यालयास प्राप्त प्रकल्प प्रस्ताव आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे १५% मार्जिन मनी मंजूरीकरीता पाठविण्यात येतात. बँकेने कर्ज मंजूर केलेल्या प्रकल्पाची पडताळणी प्रत्यक्ष बँकेकडून करण्यात येते. सदर योजनेत सन २०१९-२० मध्ये ११८ लाभार्थी होते. सन २०२०-२१ मध्ये ३७ लाभार्थ्यांची संख्या आहे. सद्यस्थितीत १५० अर्ज प्राप्त झालेले आहेत त्यांची छाननी केली असून ३७७ सहकारी संस्थांना मंजुरी दिलेली आहे. सन २०२१-२०२२ या वर्षी ५ नवीन संस्थांना मंजुरी दिलेली आहे. यासाठी ७ कोटी रुपयांचे भाग भांडवल उपलब्ध करून दिल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

राज्यामध्ये अशा किती योग्य संस्था आहेत, या संस्थांमध्ये सद्य:स्थितीत लेखापरिक्षण झाले आहे काय, एका संस्थेला ७ कोटी रुपये द्यायचे आहेत. मात्र एकाही संस्थेला पुरेसा निधी मिळत नाही. काही औद्योगिक संस्थांनी बोगस सदस्य दाखवून शासनाच्या पैशांचा गैरव्यवहार केला असून या संस्थाचे परवाने रद्द केले होते. या योजनेचा जे मागासवर्गीय आहेत, त्यांना काहीच लाभ मिळालेला नाही. या बाबतची सद्यस्थिती काय आहे, तसेच मागील १५ वर्षात या योजनेची अंमलबजावणी झालेली नाही. किती संस्थांना लाभ दिला आहे व किती संस्थांना दिला जाणार आहे, अशी विचारणा समितीने केली असता या योजनेंतर्गत जुने प्रस्ताव प्रलंबित असून त्यांना लाभ दिल्यानंतर नवीन प्रस्तावांना मान्यता दिली जाईल. जुने प्रस्ताव प्राप्त झालेल्या संस्थांची आधी उभारणी करायची आहे. या संबंधी मा. उच्च न्यायालयात वाद सुरू असल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली तसेच या संबंधी विभागाकडे बैठक झाली आहे. या बाबत विभाग सकारात्मक आहे. ज्यांच्याकडे योग्य प्रमाणपत्र असतात, त्या संस्थेला मदत दिली जाते. अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

औद्योगिक संस्था सुरू करण्याबाबत किती प्रकरणे प्रलंबित आहेत, एक महिन्यात किती पूर्ण करण्यात आली. तसेच सहकारी संस्थाना भाग भांडवल म्हणून ३५० कोटी रुपये दिले असून वसुली २० कोटी रुपये देखील झालेली नाही.

सद्यस्थितीत राज्यातील किती जिल्ह्यात सूत गिरण्यांना मान्यता दिलेली आहे, पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्हयामध्ये अनेक संस्था आहेत, या निधीची वसूली होत नसून अनेक सूत गिरण्यांमध्ये सदस्य वेगवेगळे आहेत, या सूतगिरण्या मागासवर्गीयांना मंजूर करून तेथील सभासद वेगळे आहेत या संस्थांना शासनाने भाग भांडवल उपलब्ध करून दिलेले आहे, अशी विचारणा समितीने केली असता विशेष घटक योजनेतून मागासवर्गीयांना सूत गिरण्या दिल्या जातात. आता पर्यंत एकूण १५ सूतगिरण्यांना मंजुरी दिली असून ३५५ कोटी रुपये खर्च केले आहेत, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली. राज्यात सर्व ठिकाणी संस्थांना मान्यता दिलेली आहे. सभासद व संस्थेच्या कार्यकारिणीची माहिती समितीस उपलब्ध करून देण्यात येईल. अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

**रमाई आवास योजना**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बेघर व्यक्तींना स्वतःच्या मालकीचे घर उपलब्ध व्हावे, या हेतूने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१० नुसार रमाई आवास योजना सन २०१०-११ या वर्षापासून राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजना ग्रामीण व शहरी दोन्ही क्षेत्रांमध्ये राबविण्यात येते. दिनांक ७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयानुसार या योजनेत सुधारणा केल्यानुसार ग्रामीण भागात १.३२ लाख

व डोंगराळ / नक्षलग्रस्त भागात १.४२ लक्ष रुपयांची मर्यादा आहे. तसेच नगरपालिका/ नगरपरिषद व महानगरपालिका क्षेत्रात खर्चाची मर्यादा २.५० लाख रुपये आहे.

रमाई आवास योजनेंतर्गत ९८५५ घरकुलांचे काम सुरू असून याकरिता निधीची मागणी केली होती. त्यापैकी ३०० कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. पुरवणी मागण्यांमध्ये १५०० कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली असून थकित रक्कम प्राप्त झाल्यास या योजनेला गती मिळू शकेल, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी सादरीकरणाद्वारे समितीस दिली.

**अत्याचारास बळी ठरणाऱ्या अनुसूचित जातीच्या कुटुंबियांना अर्थसहाय्य देण्याबाबत :-**

अत्याचारास बळी ठरणाऱ्या अनुसूचित जातीच्या कुंटुंबियांना अर्थसहाय्य देणे या योजनेबाबत माहिती देण्याबाबत समितीने विचारणा केली असता नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५ अन्वये अस्पृश्यता पाळणे व ती पाळण्यास उत्तेजन देणे हा गुन्हा समजण्यात आला असून त्यासाठी शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या व्यक्तीवर होणाऱ्या अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, १९८९ व सुधारित नियम, १९९५ हा कायदा लागू करण्यात आला आहे. जातीयतेच्या कारणावरुन अत्याचारास बळी पडलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती सदस्यांना अर्थसहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) नियम, १९९५ व सुधारित अधिनियम, २०१५ व नियम २०१६ मध्ये पारीत केले असून नियमांतील तरतूदीनुसार पिडीत व्यक्तींना अर्थसहाय्य देण्यात येते. याअंतर्गत एससी, एसटी मधील ३०१४ केसेस नोंदी झालेल्या आहेत. याबाबत विभागाचे सचिव यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेतली होती, तसेच विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या समवेतही बैठक घेतली होती. ॲट्रॉसिटीचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. अत्याचारास बळी पडणाऱ्या कुटुंबास तातडीने अर्थसहाय्य देण्यासाठी ३० कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी १८ कोटी रुपये मिळाले आहेत. यामध्ये नोकरी, जमीन देण्यासाठी तरतूद करावी लागणार आहे. विभागाचे शासन निर्णय सुस्पष्ट असले तरी देखील ही योजना अधिक चांगल्या प्रकारे राबवण्याकरिता मार्गदर्शन घेतले जाणार असल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली असता महाराष्ट्र सोडून बहुतेक सर्व राज्यात ॲट्रॉसिटीसाठी स्वतंत्र न्यायालये स्थापन झालेली आहेत. याप्रमाणे राज्यात स्वंतत्र न्यायालये स्थापन करण्याबाबतची कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे मत समितीने मांडले.

## प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना (PMAGY)

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने सन २००९-१० या आर्थिक वर्षापासून प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना लागु केली आहे. सदर योजनेंतर्गत अनुसूचित जातीची ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावात मुलभुत सोईसुविधांची कामे केली जातात.

सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाने पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्र राज्यातील २०७ गावे व सन २०२०-२१ साठी अकोला व अमरावती मधील २९ गावांची निवड केली आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाने व केंद्र शासनाने सदर योजनेसाठी विहीत केलेली मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ नुसार सदर योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केली आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त सन २०१७-२०१८ मध्ये १२, सन २०१८-२०१९ मध्ये १४, सन २०१९-२०२० मध्ये ६, सन २०२० - २०२१ मध्ये ३ अशी वर्षनिहाय कामे मंजूर केलेली आहेत. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करण्यासाठी सन २०१९- २०२० या वर्षात ८६ कोटी रुपये खर्च केले होते. सन २०२० - २०२१ या वर्षात ८२ कोटी रुपये प्राप्त झाले असून ते १०० टक्के खर्च करण्यात येत असल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

सभामंडप किंवा सांस्कृतिक सभागृहासाठी दिला जाणारा निधी खूप कमी आहे. वस्तीमध्ये राहणाऱ्या गरीब लोकांना लग्न समारंभाकरिता मोफत उपलब्ध होईल असे सभागृह बनवायचे असेल तर त्याकरिता २० लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च येतो. त्यामुळे त्याची मर्यादा वाढविली पाहिजे अशी सूचना समितीने केली.

स्मशानभूमीकरिता लोकसंख्येची अट नसावी, जागा उपलब्ध असतानाही लोकसंख्या कमी असली तरी ती सुविधा देणे आवश्यक असल्याचे मत समितीने मांडले, त्यावर समाजमंदिरासाठी लोकसंख्येची अट असल्याची माहिती आयुक्तांनी समितीला दिली.

***

## विभागीय सचिवांची साक्ष

अनुसूचित जाती कल्याण समितीने "सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे मार्फत अनुसूचित जातींच्या नागरिकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत" समितीच्या दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली. या बैठकीत प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २४ मे, २०२२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

## अस्वच्छ व्यवसायामध्ये काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी शाळा व मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना व सफाई कामगारांसाठी घरे उपलब्ध करणेबाबत :–

अस्वच्छ व्यवसायामध्ये काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी राज्यात सद्यःस्थितीत येरवडा, पुणे व हिंगणा, नागपूर येथे दोन शाळा कार्यरत आहेत. सद्यःस्थितीत हिंगणा, नागपूर येथील शाळा बंद अवस्थेत आहे. सदरहू शाळा तातडीने सुरू करणे आवश्यक असून त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे, तसेच अशाप्रकारच्या काही शाळा राज्यात इतरत्र सुरू करण्याचे प्रस्तावित आहे काय, याप्रकरणी विस्तृत माहिती देण्याबाबत समितीने विचारणा केली असता सर्व शाळा सुरू करण्यात आलेल्या आहे. सद्यःस्थितीत सर्व शाळा सुरू असून ३२० विद्यार्थी संख्या असल्याचे व सफाई कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची शाळा म्हणूनच त्या शाळेला ओळखले जात असल्याबाबत माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली. सफाई कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची शाळा म्हणण्याच्या ऐवजी एखादे काही जागतिक स्तरावरील नाव देणे आवश्यक आहे. त्यामुळे त्या शाळांकडे बघण्याचा दृष्टीकोन देखील बदलेल तसेच नागपूरमध्ये ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यात आली. त्या ठिकाणापासून सफाई कामगारांच्या वसाहती खूप दूर असल्यामुळे रेल्वे स्टेशनच्या जवळ शाळा असावी आणि ज्या ज्या ठिकाणी वसाहती आहेत तिथे शाळा सुरू केल्या तर त्यांच्यासाठी चांगली व्यवस्था होईल, अशी सूचना समितीने केली असता समितीने सूचविल्यानंतर त्या ठिकाणी तातडीने शाळा सुरू करण्यात आलेली आहे. कोव्हिडची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे तिथे ई-लर्निंग सुरू करण्यात आले होते. ई-लर्निंगमुळे शिक्षणाचा दर्जा उंचावल्यामुळे तेथील नागरिक मुलांना निवासी शाळेत टाकण्यासाठी इच्छूक आहेत. या शाळेची स्वतःची जागा असल्यामुळे मोठी इमारत असावी, अशा प्रकारची सूचना समितीने केली होती. त्या अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यासशी संपर्क करून जागा मागितली. त्याप्रमाणे मध्यवर्ती ठिकाणी एक जागा एक ते दीड एकरची आहे.

नागपूर सुधार प्रन्यास हे विकास प्राधिकरण असल्यामुळे इमारत बांधून देण्यात येईल, असे नागपूर सुधार प्रन्यास यांनी सांगितले होते. यापूर्वी नागपूर येथील शाळेमध्ये एकूण ३२० विद्यार्थी बसण्याची क्षमता होती. सद्यस्थितीत ७०० ते ८०० पर्यंत विद्यार्थी संख्या केली तर नागपूर जिल्ह्याच्या आजूबाजूच्या जिल्ह्यातून सुद्धा विद्यार्थी येऊ शकतील, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती आणि महानगरपालिका आयुक्त यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये समितीने केलेल्या सूचनेनुसार नागपूर सुधार प्रन्यास मोफत जागा उपलब्ध करून देत आहे. तसेच महानगरपालिका इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्यास तयार असल्याबाबत समितीने विभागास अवगत केले. तसेच या प्रकरणाबाबत नागपूर जिल्हयातील तत्कालिन पालकमंत्री यांचे समवेत चर्चा झालेली आहे. नागपूर येथे नागपूर सुधार प्रन्यासकडे प्रचंड जागा उपलब्ध असून त्यांच्याकडे सफाई कामगाराच्या घरांसाठी जागा देण्याबाबत समितीने एक समन्वय घडवून आणला होता. तसेच यामध्ये काही अधिकच्या शाळा प्रस्तावित आहेत काय, कोणकोणत्या तालुक्यात शाळा कार्यरत आहेत, या शाळा फक्त श्रमसाफल्य योजनेसाठी आहेत काय, अशी विचारणा समितीने केली असता सध्या तरी अशाप्रकारच्या शाळा प्रस्तावित नाहीत. यासाठी एक प्रस्ताव पाठविण्यात आला होता. या प्रस्तावामध्ये शासनाकडून त्रुटी पुर्ततेसाठी समाजकल्याण आयुक्तालयाकडे त्रुटी सादर करण्यात आलेल्या असून त्रुटींची पुर्तता करून देण्यात येत आहे. सद्यस्थितीत एकूण ९० निवासी शाळा कार्यरत आहेत. प्रत्येक तालुक्यात एक शाळा शासनाने मंजूर केलेली आहे. अशाप्रकारे १०० शाळा मंजूर झालेल्या आहेत. यातील दोन शाळा विशेषतः सफाई कामगारासांठी आहेत आणि ९० शाळा सामाजिक न्याय विभागाशी संबंधित आहेत. अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या इ. १ ली ते १० वीत शिकत असलेल्या पाल्यांना भारत सरकार मॅट्रीक पूर्व शिष्यवृती देण्याची योजना केंद्र व राज्य शासनाच्या ५०-५० टक्के अर्थ सहाय्याने राबविण्यात येत होती तसेच यामध्ये केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाल्याशिवाय राज्य शासनाचा निधी खर्च करता येत नाही. सदर योजनेवर सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये १३४२.६५ लाख एवढी तरतूद करण्यात आलेली होती. तथापि सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांकडून एकूण २१,१९४ परिपूर्ण अर्ज प्राप्त झाले त्यानुसार रक्कम रु.३९२.१० लाख एवढा खर्च करण्यात आला.

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृती करिता अस्वच्छ व्यवसाय करत असल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका/ नगरपरिषदा यांचेकडून अडचणी निर्माण होतात. त्यामुळे शिष्यवृतीसाठी पालकांकडून अर्ज कमी प्रमाणात प्राप्त होतात. अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृती करिता अस्वच्छ व्यवसाय करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याबाबत महानगरपालिका, नगरपालिका यांना आयुक्तालयाचे अ.शा. पत्र क्रमांक. २३६, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये कळविण्यात आलेले आहे. शासन परिपत्रक दिनांक १७ मार्च, २००९ नुसार सदर योजनेचे दर दिनांक १ एप्रिल, २००८ पासून खालीलप्रमाणे होते.

शासन परिपत्रक दिनांक १७ मार्च, २००९ नुसार सदर योजनेचे दर दिनांक १ एप्रिल, २००८ पासून खालीलप्रमाणे आहेत.

**(दहा महिने करिता )**

| बाब | वर्ग | वसतिगृहात न राहणारे | वसतिगृहात राहणारे |
|---|---|---|---|
| दरमहा शिष्यवृत्तीचे दर | १ ली ते २ री | रु. ११०/- | - |
| | ३ री ते १० वी | रु. ११०/- | रु. ७००/- |
| वार्षिक तदर्थ अनुदान | | रु. ७५०/- | रु. १०००/- |

तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. अजाशि- २०२०/ प्र. क्र. १८९ / शिक्षण-१, दि. १ मार्च, २०२१ नुसार केंद्र शासनाकडून प्रस्तावित करण्यांत आलेले शिष्यवृत्तीचे सुधारित दर सन २०२०-२१ पासून खालील प्रमाणे आहेत.

**(दहा महिने करिता)**

| बाब | वर्ग | वसतिगृहात न राहणारे | वसतिगृहात राहणारे |
|---|---|---|---|
| दरमहा शिष्यवृत्तीचे दर | १ ली ते २ री | रु. २२५/- | - |
| | ३ री ते १० वी | रु. २२५/- | रु. ७००/- |
| वार्षिक तदर्थ अनुदान | | रु. ७५०/- | रु. १०००/- |

केंद्र शासनाच्या दिनांक १४ मार्च, २०२२ च्या सुधारीत मार्गदर्शक सुचनांनुसार सदर योजनेकरिता खालीलप्रमाणे दरवाढ प्रस्तावित केलेली आहे.

| बाब | वर्ग | वसतिगृहात न राहणारे | वसतिगृहात राहणारे |
|---|---|---|---|
| दरमहा शिष्यवृत्तीचे दर | १ ली ते २ री | रु. ३५०/-<br>(१० महिन्यांकरीता एकूण रु. ३५००) | - |
| | ३ री ते १० वी | रु. ३५०/-<br>(१० महिन्यांकरीता एकूण रु. ३५००) | रु. ८०००/-<br>वार्षिक |

सदरील योजनेसाठीच्या दिव्यांग लाभार्थ्यांना केंद्र शासनाची नियमावली दि. ०२ एप्रिल, २०१८ च्या मार्गदर्शक सूचना परिच्छेद ५. IV. नुसार शिष्यवृत्तीचे खालील अतिरिक्त लाभ लागू राहतील.

(a) Reader Allowance of 100 per month for blind students in classes III and X

(b) Transport Allowance of Rs. 50 per month for the disabled students not resending in the hostel located within the premises of educational institutions.

(c) Special pay of Rs. 100 per month would be admissible to any employee of the hostel willing to extended help to severly orthopedically handicapped student residing in a hostel managed by the educational institutions or by the state govt.

(d) Escort allowance of Rs. 50 per month for severely handicapped day scholar students with lower extreremity disability.

(e) Allowance of Rs. 100 per month towords extra coaching to mentally retarded and mentally ill students in class III and X.

सन १९९६-९७ या वर्षात अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा असाव्यात असा एक निर्णय करण्यात आला होता. त्यावेळी खूप कमी प्रमाणात आश्रमशाळा मंजूर केल्या. पण त्यानंतर अशाप्रकारच्या निवासी शाळा अनुसूचित जातीच्या लोकांना देणे बंद

केले. अनुसूचित जमाती तसेच विमुक्त जाती भटक्या जमातींसाठी आश्रमशाळा होत्या. परंतु विभागाकडे प्रचंड निधी असून सुद्धा अनुसूचित जातीसाठी आश्रमशाळा नव्हत्या. त्या निर्णयानंतर निवासी शाळा झाल्याच नाही. एकूण ९० शाळा मंजूर केल्याची माहिती विभागाने दिली आहे. अस्वच्छ म्हणून गणल्या गेलेल्या जातीतील ९९ टक्के जाती या अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये येत असल्यामुळे ही योजना फक्त अनुसूचित जातीसाठीच असणे अभिप्रेत आहे. ९० शाळा आधीच अस्तित्वात आहे त्यांची यादी आम्ही आपल्याला देवू शकतो. त्याव्यतिरिक्त १०० शाळा शासन आता मंजूर करत आहे. तसेच सर्व तालुक्यामध्ये एक शाळा असावी असे शासनाचे धोरण आहे अशी माहिती आयुक्त यांनी दिली. ज्या ठिकाणी अनुसूचित जातीची लोकसंख्या जास्त आहे किंवा जे मतदारसंघ राखीव ठेवण्यात आले असतील तो भाग पहिल्या टप्प्यात घेण्याबाबत काही निकष लावले पाहिजे. अशी सूचना समितीने केली.

**अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलांमुलीकरिता प्रत्येक तालुक्यात एक निवासी शाळा सुरू करण्याबाबत :—**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्र. अजाशा- २००५/प्र.क्र.४३२/मावक-४, दिनांक १ जून, २००६ अन्वये प्रत्येक तालुक्याला एक निवासी शाळा असे धोरण शासनाने मंजूर केलेले आहेत. त्यापैकी १०० शाळा पहिल्या टप्प्यामध्ये मंजूर करण्याच्या प्रक्रियेत आहेत. एकूण ९० शाळा पूर्वीपासूनच अस्तित्वात आहेत. शासनाने ३५८ तालुक्यांसाठी ३५८ शाळांना तत्वतः मान्यता दिलेली आहे. त्यापैकी १०० शाळा पहिल्या टप्यामध्ये घेण्यात येत आहेत. अशी माहिती विभागीय सचिव, यांनी समितीस दिली.

नागपूर सुधार प्रन्यासची जागा संपादित करून त्यावर शाळा बांधण्यासाठी खूप दिवसांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे तोपर्यंत महानगरपालिकेच्या ज्या शाळा बंद आहेत व ज्या शाळांच्या एरियामध्ये अनुसूचित जातीचे प्रमाण जास्त आहे, अशा शाळांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात अनुसूचित जातीच्या शाळा सुरू करण्यास हरकत नाही. या बैठकीच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागाने महानगरपालिका व एनआयटीच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करावी. जोपर्यंत अशा प्रकारच्या शाळा सुरू होणार नाहीत तोपर्यंत पाठपुरावा होणे आवश्यक आहे. तसेच शासनाने प्रस्तावामध्येच जागेची देखील तरतूद करणे आवश्यक आहे. असा मुद्दा उपस्थित केला असता सर्वप्रथम जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून शासकीय जागा उपलब्ध करण्यात येत असून शासकीय जागा उपलब्ध न झाल्यास अन्य ठिकाणी जागा घेण्याचा

प्रयत्न करण्यात येईल. नागपूर येथे शासकीय जागा उपलब्ध होत नसल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यासकडे विनंती करण्यात आलेली आहे. सिडको आणि नागपूर सुधार प्रन्यास ही विकास प्राधिकरणे असल्यामुळे ते प्रथम निविदा काढतात. उक्त निविदेमध्ये शाळेसाठी जो भूखंड राखीव आहे, तोच भूखंड विभागाने निविदा भरुन घेणे आवश्यक आहे, अशी नागपूर सुधार प्रन्यासने सूचना केली आहे.

अनुसूचित जातीच्या योजनांची अंमलबजावणी केवळ जागेअभावीच होत नसून या योजनांसाठी जमीन संपादित करण्याची कोणत्याही अधिकाऱ्यांची मानसिकता दिसत नाही. जागा उपलब्ध करून घेण्याबाबत कोणीही प्रयत्न करीत नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका यांच्याशी चर्चा करून जेथे जागा मोकळी आहे, तेथील जागा उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीच्या रमाई आवास योजना व श्रमसाफल्य या सारख्या अनेक योजना फक्त जागा उपलब्ध नसल्याकारणाने कागदावरच राहतात. ज्या जिल्ह्यामध्ये नागपूर सुधार प्रन्यास प्राधिकरण नाही, अशा जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त, यांच्याशी समन्वय साधून सदर योजनांसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत सामाजिक न्याय विभागाने प्रयत्न करावा, अशी समितीने विभागास सूचना केली असता जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त व नागपूर सुधार प्रन्यास यांच्याशी चर्चा करून सदर योजनांना जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, तसेच ज्या भागामध्ये शाळा नाहीत व ज्या भागामध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे, अशा भागामध्ये नवीन शाळा सुरू करण्यास हरकत नाही. याबाबत माननीय समिती प्रमुख यांचे सूचनेनुसार सामाजिक न्याय विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येईल. नागपूर सुधार प्रन्यास यांच्याकडून एक-दोन शाळांसाठी जागा उपलब्ध झाली तर त्या जागेवर बांधकाम करण्यासाठी महानगरपालिका मदत करणार आहे. त्यामुळे याबाबत समाज कल्याण विभागामार्फत पूर्णपणे सहकार्य करण्यात येईल, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली यावर समितीने जिल्हाधिकारी व आयुक्त यांच्यासोबत बैठक घेऊन केलेल्या सुचनेबाबत प्राधान्याने आणि गांभीर्याने चर्चा करण्यात यावी. संबंधित जिल्हाधिकारी यांनी लवकरात लवकर जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच जागा उपलब्ध करण्यासाठी दोन पर्याय आहे. पहिला म्हणजे नवीन टाऊन प्लॅननुसार ओपन स्पेस सोडला जातो. त्या जागेवर शाळा बांधावी किंवा दुसरा ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होत नाही, त्या ठिकाणी जागा खरेदी करण्याबाबत शासनाने निधीची तरतूद करून खाजगी जागा खरेदी करण्यात यावी, अशी समितीने सूचना केली असता त्याकरिता तशी विभागाकडे मागणी प्राप्त

झाली तर याबाबत प्राधान्याने चर्चा करून जेथे जागा उपलब्ध होत नाही, तेथे जागा खरेदी करण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार निधीची तरतूद करण्यात येईल, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

**रमाई आवास योजना :—**

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील कुटुंबांचे राहणीमान उंचवावे व त्यांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून शहरी भागामध्ये त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी ३२३ चौ. फुटाचे पक्के घर बांधून देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय दि. १५ नोव्हेंबर, २००८ अन्वये रमाई आवास योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे. त्यानंतर शासन निर्णय दि. ९ मार्च,२०१० नुसार सदर योजनेमध्ये सुधारणा करण्यात येऊन योजनेची प्रत्यक्ष अमलबजावणी सन २०१०-११ पासून महानगरपालिका क्षेत्रासाठी आयुक्त, महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रासाठी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत सुरू आहे.

रमाई आवास योजना (ग्रामीण) या योजनेंतर्गत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी रुपये ५००.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली. व माहे डिसेंबर, २०२० पर्यंत बीडीएसवर रु. ३००.०० कोटी तरतूद प्राप्त झाली होती योजनेंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद रु. ५००.०० कोटी पुरेशी नसल्याने संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृह निर्माण, मुंबई यांनी त्यांचे पत्र दिनांक २१ ऑक्टोबर, २०२० अन्वये रु.१५१६.०३ कोटी इतक्या अतिरिक्त तरतूदींची मागणी नोंदवली होती सदर मागणी विचारात घेवून सन २०२०-२१ च्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात रु. १५१६.०३ कोटी इतक्या जादाच्या तरतूदींचा पुरक मागणीचा प्रस्ताव आयुक्तालयाचे पत्र दि. १७ डिसेंबर, २०२० अन्वये शासनास सादर केला होता.

शासनाचे ज्ञापन दि. १५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये रु. ५००.०० कोटी इतकी तरतूद पुरक मागणीद्वारे व अर्थसंकल्पात रु. ५००.०० कोटी अशी एकूण तरतूद रु. १०००.०० कोटी सन २०२० - २१ करिता माहे मार्च, २०२१ पर्यंत प्राप्त झालेली होती. सदर प्राप्त तरतूद संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई यांना आयुक्तालयाचे आदेश दि. १८ मार्च, २०२१ अन्वये वर्ग करण्यात येवून सदर तरतूद योजनेच्या अंमलबजावणीसाठी खर्च करण्यात आली आहे.

सन २०२१-२२ करिता रु. ७५०.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत असून यापैकी माहे मार्च, २०२२ अखेर रु. ५६२. ५० कोटी इतकी तरतूद बी. डी. एस. वर खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर तरतूद संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई यांच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी वर्ग करण्यात आली आहे. तसेच सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी योजनेंतर्गत रु. ७५०.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे.

सदर योजनेंतर्गत सन २०१६-१७ ते सन २०२१-२२ पर्यंत एकूण रु. ३३४२.५० कोटी इतकी तरतूद शासनाकडून प्राप्त झाली असून त्यानुषंगाने संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई या अंमलबजाणी यंत्रणेमार्फत अद्यापपर्यंत एकूण मंजूर ३,४३,५०२ घरकुलापैकी २,४५,०६५ इतक्या घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे व ९८,४३७ इतक्या घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय दि. ७ जानेवारी, २०१७ अन्वये लाभार्थी अनुदान, कुटुंबांची वार्षिक उत्पन्न मर्यादा व घरकुलांच्या क्षेत्रफळात खालीलप्रमाणे सुधारणा केली आहे.

(रुपये लाखात)

| बांधकामासाठी क्षेत्रनिहाय खर्चाची मर्यादा | | लाभार्थी हिस्सा | उत्पन्न मर्यादा | घरकुलांचे क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| क्षेत्र | रुपये | | रुपये | (चौ.फु.) |
| (ब) महानगरपालिका | २.५० | १०% | ३.०० | ३२३ |
| (क) नगरपालिका | २.५० | ७.५ % | ३.०० | ३२३ |

रमाई आवास (शहर) योजनेसाठी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील ज्या व्यक्ती/ कुटुंबांकडे स्वतःची जागा नाही आणि ते खाजगी मालकीच्या जागेवर अतिक्रमण करून वास्तव्य करीत आहेत. अशा व्यक्ती/कुटुंबासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे असलेली आरक्षित किंवा त्या भागातील जागा प्रधानमंत्री आवास योजना/ झोपडपट्टी पुनर्वसन योजना यांच्या नियमानुसार पुनर्विकसित करून त्या ठिकाणी सदर लाभार्थ्यांसाठी घरकुल किंवा बहूमजली इमारत बांधून देण्याचे धोरण ठरविण्यासाठी आयुक्तालयाचे दि. २ जुलै, २०२१ च्या पत्रान्वये धोरणात्मक निर्णयासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही सुरू आहे. तसेच योजनेच्या प्रभावी अंमलबजाणीसाठी

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण या कक्षाच्या धर्तीवर रमाई आवास योजना (शहरी) या योजनकरिता राज्यस्तरावर नवीन राज्य व्यवस्थापन कक्ष -नागरी गृहनिर्माण स्थापन करणे आवश्यक आहे. सदर योजनेकरिता सन २०१९- २० या आर्थीक वर्षासाठी रु.१००.०० कोटी इतक्या निधीची मागणी करण्यात आली होती. परंतू रु. ६०.०० कोटी इतका निधी प्राप्त झाला तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता रु.१००.०० कोटी निधींची मागणी करण्यात आली होती परंतू प्रत्यक्षात फक्त रु. २०.०० कोटी इतका निधी प्राप्त झाला व सन २०२१-२२ करिता रु. १००.०० कोटी इतक्या निधीची मागणी नोंदविण्यात आलेली होती परंतू माहे मार्च, २०२२ अखेर बीडीएसवर रु.७५.०० कोटी इतकी तरतूद प्राप्त झाली व सदर तरतूद संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्यामार्फत महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायत या स्थानिक यंत्रणांना वितरित करून योजनेची अंमलबजाणी केली जात आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी योजनेंतर्गत रु. ५००.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे.

रमाई आवास योजनेतील ४० टक्के घरे जागेअभावी बांधता येत नाहीत. शहरी व ग्रामीण भागातील जागेच्या किंमती व साहित्याच्या किंमती मोठ्या प्रमाणावर वाढत असताना देखील शासनाने योजनांमधील रक्कम वाढविलेली नाही. ५० हजार रुपयांमध्ये जागा खरेदी करून बांधकाम करणे शक्य होणार नाही. त्यामुळे योजनेतील अनुदानाची रक्कम वाढविणे आवश्यक आहे. ज्या प्रमाणात महागाई वाढते, त्या प्रमाणात योजनांतील अनुदानाची रक्कम वाढविणे आवश्यक आहे. तसेच खाजगी घोषित झोपडपट्ट्यांमध्ये रमाई आवास योजना लागू होत नाही. त्यामुळे ही अट शासनाने शिथिल करणे आवश्यक असल्याचे मत समितीने मांडले.

**लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना :**

शासनाने ग्रामीण भागातील दलित वस्त्याची तपासणी करून त्यास नावे दिलेली आहेत. परंतु ही प्रक्रिया महानगरपालिका हद्दीमध्ये झालेली नाही. ज्या वसाहतीमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा अधिक अनुसूचित जातीची लोकसंख्या असेल ती दलित वस्ती म्हणून घोषित केलेली आहे. परंतु यासाठी कोणताही निकष नाही. म्हणजे एकाच सोसायटीमधील लोकसंख्या मोजावी की, चार सोसायट्यामधील संख्या मोजावी, याबाबत कोणतेही धोरण नाही. याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आरक्षित प्रभागासाठी निधीची तरतूद केल्याप्रमाणे खर्च झाल्याचे दिसून येत नाही. तो निधी इतर वस्तीमध्ये वापरला जातो. त्यामुळे दलित वस्त्या

दुर्लक्षित राहत आहेत. दलित झोपडपट्टयामध्ये देखील निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. परंतु त्यासाठी झोपडपट्ट्या तपासण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. खुल्या प्रभागामध्ये विखुरलेल्या दलितांसाठी कोणतीही योजना राबविली जात नाही. खुल्या प्रभागातील विखुरलेल्या दलितांसाठी योजना राबविण्याबाबत शासनाची किंवा अधिकाऱ्यांची मानसिकता असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे विखुरलेला दलित समाज दुर्लक्षित राहतो. प्रभाग आरक्षित नसल्यामुळे त्या ठिकाणी वास्तव्य करीत असलेल्या दलित समाजाला शासनाच्या कोणत्याही योजनांचा लाभ मिळत नाही.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना राबविण्यामागील शासनाचा उद्देश ज्या शहरामध्ये झोपडपट्ट्या आहेत, त्या ठिकाणी या योजनेच्या माध्यमातून मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. परंतु या सुविधा अशा ठिकाणी उपलब्ध न करता अन्य ठिकाणी केल्या जात आहेत. तसेच शासन निर्णयामध्ये ५१ टक्क्यांची अट दिलेली आहे. परंतु सदर ५१ टक्के समाज एकत्र असणे आवश्यक आहे की, विखुरलेला असला तरी चालेल, याबाबत शासन निर्णयामध्ये काहीही नमूद केलेले नाही. तसेच जिल्हा स्तरावरील सहाय्यक आयुक्त यांच्यामार्फत सदर निधी वितरीत करावा व महानगरपालिका हद्दीतील तपासणी केलेल्या ५१ टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या वस्त्या किती आहेत, याबाबतची सर्व माहिती सहाय्यक आयुक्त यांना गोळा करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. अशी समितीने सूचना केली असता समितीने दिलेल्या सूचनांची माहिती नगर विकास विभाग, महानगरपालिका व नगरपालिकांना देण्यात येईल. ज्या भागामध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी अनुसूचित जातीची संख्या आहे आणि ती विखुरलेल्या स्वरुपात आहेत, अशा वस्त्यांबाबत काय करायचे, यासंदर्भात महानगरपालिकेकडून माहिती घेण्यात येईल.

सामाजिक न्याय विभागाकडून १८ विभागांना निधी वितरीत केला जातो. त्यानंतर शासनाच्या धोरणानुसार संबंधित विभाग योजनांची अंमलबजावणी करतात, नगर विकास विभाग व सहाय्यक आयुक्त यांच्याकडून सर्व माहिती घेण्यात येईल. तसेच समितीने सुचविलेल्या सुधारणा नगर विकास विभागाकडे देखील सादर करण्यात येतील. अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली. यावर सर्व नागरी वस्त्यांचा बृहत आराखडा तयार करावा व अनुसूचित जातीच्या लोकसंख्येनुसार निधी वितरीत करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. सद्यःस्थितीत प्रभागनिहाय निधी वितरीत केला जातो, अशी सूचना समिती सदस्यांनी केली असता सदर शासन निर्णय असून यात सर्व बाबी समाविष्ट आहेत, प्रथम आराखडा

तयार केला जातो. त्यानंतर टप्प्याटप्प्याने निधी वितरीत केला जातो. अनुसूचित जातीच्या वस्त्यांचा विकास करण्यामागील मुख्य उद्देश असा होता की, हा समाज गावाबाहेर राहत होता. त्या लोकांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध होत नव्हत्या. त्यामुळे अशा लोकांच्या वस्त्यासाठी विशेष निधीची तरतूद करून फक्त त्याच वस्त्यांमध्ये निधी खर्च करावा. गावांमध्ये किंवा शहरामध्ये असा विकास करावा की, जेणेकरुन अनुसूचित जाती व इतर अन्य वर्गातील समाज एकत्र वास्तव्य करावा, तसेच दलित वस्त्यांचे जीआयएस मॅपिंग करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. याबाबत मा. मंत्री स्तरावर देखील बैठका झालेल्या आहेत. दलित वस्त्या तपासून घेणे व त्या वस्त्यामध्ये झालेल्या कामांचे मॅपिंग करण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. समितीच्या सन्माननीय सदस्यांच्या सूचनेप्रमाणे बृहत आराखडा तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच माननीय समिती प्रमुख यांनी दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात येईल. महानगरपालिकेमध्ये बृहत आराखडा तयार करणे हे महानगरपालिकेचे काम आहे. कारण स्थानिक संस्थेमध्ये त्यांचे प्राधिकार आहेत. अनुसूचित जातीमधील योजनांना जागा उपलब्ध करून देण्याबाबत काय धोरण निश्‍चित करता येईल याबाबत नगर विकास विभागासोबत चर्चा करण्यात येईल. एखाद्या भागामध्ये अनुसूचित जातीची ५१ टक्क्यापेक्षा कमी लोकसंख्या असेल आणि ती विखुरलेल्या स्वरुपात असेल तरी त्या ठिकाणी विकास होणे किंवा अशा ठिकाणी अनुसूचित जातीच्या योजना लागू करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. अनुसूचित जातीच्या लोकसंख्या नसलेल्या परिसरामध्ये निधी खर्च होणार नाही, याची देखील काळजी घेणे आवश्यक आहे, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

आदिवासी उपयोजनेमध्ये तरतूद करतांना आदिवासी समाजातील लोकप्रतिनिधींच्या सूचनेनुसार आदिवासी विकास विभागातील प्रकल्प अधिकारी अर्थसंकल्पिय तरतूद करतो, दरवर्षी जिल्हा नियोजन समितीला अनुसूचित जाती योजनेतंर्गत निधी दिला जातो. प्रत्येक जिल्हयात अनुसूचित जातीचा एक लोकप्रतिनिधी असतो त्यांना विश्‍वासात घेणे आवश्यक आहे, काही विभागांना गरज नसतांनाही निधी दिला जातो असे मत समितीने मांडले असता जिल्हा नियोजन समितीमध्ये मा. पालक मंत्री, मा. खासदार, मा. आमदार आणि जिल्हापरिषद व पंचायत समिती लोकप्रतिनिधींच्या स्तरावर जिल्हा वार्षिक योजनेस मंजूरी दिली जाते. त्यानुसार त्याची अंमलबजावणी केली जाते, असे विभागीय सचिव यांनी समितीस सांगितले. लोकशाहिर

अण्णाभाऊ साठे वस्ती सुधार योजनाकरिता महसूली उत्पन्नाच्या ५% निधी खर्च केला जातो. रुपये २५० कोटी उत्पन्न असलेल्या महानगरपालिकेस ४६ लाख, ५० लाख एवढेच महसूली उत्पन्न दाखवले जाते त्यावर ५% प्रमाणे १ कोटी रक्कम दाखविण्यात येते, तसेच शासन निर्णयात महसूली उत्पन्न पगार, विद्युत देयक, पाणी पुरवठयावरील देखभालीचा खर्च इत्यादी गोष्टी समाविष्ट असतात कोणतीही महानगरपालिका किंवा नगरपरिषदेने आजतागायत १% च्यावर अनुसूचित जातींच्या लोकांच्या कल्याणासाठी खर्च केलेला नाही. हे तपासून त्यामध्ये स्पष्टता येणे आवश्यक आहे. जे अधिकारी / कर्मचारी मागासवर्गीय लोकांच्या कल्याणासाठी कामे करतील अशा अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, अशी सूचना समितीने केली असता हा स्वनिधी असतो. सदरहू शासन निर्णय नगरविकास विभागाने काढला आहे. राज्य शासनामार्फत अर्थसंकल्प मंजूर केला जातो व त्यानंतर निधी वितरित केला जातो. राज्य शासनामधील अर्थसंकल्पिय घटकांन्वये निधी दिला जातो. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार एकूण अर्थसंकल्पिय तरतुदीच्या ५ टक्के किंवा बजेट अव्हेलेबल फॉर वर्क पोर्शन ओनली. सॅलरी आणि पेन्शन वगळून हे देखील संबंधित शासन निर्णयानुसार तपासून घेतले जाणार आहे. तसेच समितीने अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्याबाबत सांगितले आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात मागासवर्गीयांना मदत करण्याचा स्वभाव याबाबतची नोंद केली जाते. उत्कृष्ट प्रशासकीय कामकाजाचे पारितोषिक वितरित करण्यात येते. प्रशासकीय गतीमानता अभियानामध्ये सर्व अधिकाऱ्यांना भाग घेता येतो, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

**अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यासाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना :—**

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यासाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या हिश्या प्रमाणे, केंद्र शासनाकडून आता पर्यंत प्रलंबित असलेल्या निधीची रक्कम, राज्य शासनाच्या हिश्यापोटी रक्कम इत्यादीच्या अनुषंगाने या योजनेचा एकूणच आढावा घेऊन समितीस अवगत करण्याबाबत सादरीकरणाच्या वेळी आश्वासित करण्यात आले होते. त्याबाबतची विस्तृत माहिती समितीस अवगत करण्याची सूचना समितीने केली असता या विषयाच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे निधी वाढवून देण्यासाठी पाठपुरावा करण्यास सांगितले होते. त्यानुसार कार्यवाही केलेली आहे. मागील वर्षी ८ कोटी १३ लाख रुपयांचा निधी मिळाला होता. त्यानुसार तो निधी खर्च केलेला आहे.

तसेच सन २०२२-२०२३ मध्ये ९ कोटी ५० लक्ष रुपयांची मागणी केली होती. माहे मे, २०२२ मध्ये या योजनेसाठी ५ कोटी ७० लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झालेला आहे. अस्वछ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यासाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृती योजनेंतर्गत या पूर्वी ११० रुपये दिले जात होते. त्यामध्ये १०० टक्के पेक्षा जास्त वाढ करून २३५ रुपये देण्यासाठी प्रस्तावित केलेले आहे. हा निर्णय सद्यस्थितीत शासनाच्या विचाराधीन आहे, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

केंद्र व राज्य शासनाकडून दोन हप्त्यांमध्ये निधी वितरित केला जातो. आता अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे. त्यांची प्रवेश प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर महाडीबीटी पोर्टलवर स्कॉलरशिपसाठी अर्ज केले जातात. अर्ज अपलोड केल्यानंतर महाविद्यालयाकडून शिफारस केली जाते. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभागाकडून त्याला मंजुरी दिली जाते. शिष्यवृत्तीचा पैसा आधार बेस लिंक असून, आयुक्तांमार्फत संबंधित विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होतो. याकरिता पुरवणी मागणीद्वारे निधीची मागणी केली जाते आणि त्यानुसार निधी उपलब्ध होतो, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली असता यामध्ये खूप मोठया प्रमाणावर बदल करण्याची गरज असून धोरणात्मक गोष्टी करणे आवश्यक आहे तसेच अस्वच्छ कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्यासंदर्भात गट शिक्षण अधिकारी किंवा काही शिक्षणाधिकारी सर्टिफिकेटची मागणी करतात, विद्यार्थ्यांच्या जातीची नोंद शाळेच्या रजिस्टरमध्ये असते, मुख्याध्यापकांनी त्याबाबत स्वाक्षरीने कळविणे आवश्यक आहे. १०० रुपयांच्या शिष्यवृत्तीकरिता विद्यार्थ्यांना वारंवार ये-जा करावी लागते, ही बाब खुपच खेदजनक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

**सामाजिक न्याय विभाग व त्याअंतर्गत कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत :–**

सामाजिक न्याय विभागात एकूण ६ हजार पदे आहेत. त्यापैकी बरीचशी पदे रिक्त आहेत. शासनाने आता एमपीएससीच्या स्तरावरील किंवा राज्यस्तरावरील वर्ग १ व वर्ग २ ची १०० टक्के पदे भरण्यास मान्यता दिली. वर्ग क व वर्ग ड ची ५० टक्के पदे भरण्यास मान्यता दिली. मात्र कोविड परिस्थितीमुळे नोकर भरती होऊ शकली नाही. जी पदे मंजूर आहेत, त्यांचा आकृतीबंध मंजूर करण्याबाबत वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. वसतिगृह, शाळा, एमएसडब्ल्यू, बीएसडब्ल्यू महाविद्यालयांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत. आऊटसोर्स करून काही ठिकाणी कामकाज चालविले जाते, अशी माहिती विभागीय

सचिव, यांनी समितीस दिली. तसेच सुधारित आकृतीबंध तयार करण्यात येत आहे. त्यामध्ये तालुकास्तरावर नवीन पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव समाविष्ट केलेला आहे. उच्चस्तरीय समितीने मान्यता दिल्यानंतर तालुकास्तरावर देखील पदे भरता येऊ शकतील, अशी माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

समाजकल्याण विभागाने तयार केलेल्या नवीन आकृतीबंधाबाबत माहिती देण्याबाबत समितीने विचारणा केली असता सामाजिक न्याय विभागांतर्गत मुला-मुलींचे वसतिगृह, दिव्यांगांच्या शाळा आहेत, त्यामुळे आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, गृह या विभागांप्रमाणे अत्यावश्यक सेवा म्हणून पद भरतीबाबत परवानगी देण्याबाबत मागणी केलेली आहे. याबाबत मंत्री महोदय तसेच मुख्यमंत्री महोदय व उप मुख्यमंत्री महोदयांकडे देखील विनंती केली असून वसतिगृह चालवायचे असेल तर अधिक्षक व इतर पदे भरावीच लागणार आहेत. त्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. वित्त विभागाकडे पाठविलेल्या प्रस्तावात त्रूटी काढून समाजकल्याण विभागास पाठविलेला आहे. दिनांक २३ मे, २०२२ रोजी माननीय तत्कालिन उप मुख्यमंत्री व राज्य मंत्री महोदयांच्या बैठकीत आकृतीबंधाबाबतचा विषय उपस्थित केला होता. विभागांतर्गत शिक्षकांची पदे रिक्त आहेत. तो प्रस्ताव अंतिम झाल्यानंतर समितीला सादर करण्यात येईल, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली असता आऊटसोर्सीगच्या विषयाबाबत क्रिस्टल व बीव्हीजी कंपनी मार्फत बऱ्याच वसतिगृहामध्ये सफाईची वगैरे कामे केली जातात. मात्र नागपूर येथील वसतिगृहामध्ये खाजगी कंपनीकडून आठवड्यातील केवळ एक दिवस कंपनीचे लोक स्वच्छतेचे काम करतात व सर्व दिवसांचे पैसे घेऊन मनमानी करीत आहेत उर्वरित दिवस त्या विद्यार्थ्यांनाच स्वच्छतेचे काम करावे लागते. क्रिस्टल कंपनीकडून जेवण व साफसफाईचे काम केले जाते तर बीव्हीजी कंपनी तेथील सुरक्षेचे काम पाहते. अशा खाजगी कंपन्यामुळे वसतिगृहांकडे खूप मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष होत असून समितीला त्या कंपनीच्या कामात खूपच अनियमितता असल्याचे दिसून आल्याचे समितीने मत व्यक्त केले असता शासनाने ई - निविदा प्रक्रियेद्वारे मंजूर केलेली हि प्रक्रिया आहे. स्वच्छतेचे दर प्रती चौरस फुटानुसार मंजूर केलेले आहेत, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

सफाई कामगारांचे काम करणाऱ्या खाजगी कंपन्या स्थापन होऊन सुद्धा मात्र प्रत्यक्ष काम पूर्वाश्रमीचे सफाई कामगार असणाऱ्या जातीतील लोकच करतात अशा खाजगी कंपन्यामध्ये कर्मचाऱ्यांना ठरल्याप्रमाणे वेतन मिळत नसून खाजगी कंपन्या कमिशन म्हणून ५० टक्क्यांपेक्षा अधिक पैसे काढून घेतात. या सर्व प्रक्रियेकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय

विभागाकडून सफाई काम करणाऱ्या जातीच्या लोकांच्या कंपन्यांना प्राधान्य देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे. बुलढाणा नगरपालिकेमध्ये कंपनीने गटारे स्वच्छ करण्याकरिता खाजगी कर्मचारी नेमले असून त्यांची शासनाकडे सफाई कामगार म्हणून नोंदच नाही. त्यामुळे स्वच्छतेचे काम करताना त्यांचे निधन झाले असता त्यांच्या कुटुंबियांना शासनाकडे नोंद नसल्यामुळे तसेच खाजगी कंपनी असल्यामुळे कोणीही नुकसानभरपाई देत नाही. महानगरपालिकेकडून त्या कामगारांना वेतन दिले जात नसल्यामुळे त्याबाबत त्यांची जबाबदारी नसल्याचे कळविण्यात येते. या कर्मचाऱ्यांना सफाई कर्मचारी मानण्यास कोणीही तयार होत नाहीत. ज्या कंपनीने त्यांना आऊटसोर्सद्वारे नेमले आहेत त्या कंपन्यादेखील जबाबदारी घेत नाहीत, कंपनी म्हणते की, त्यांना नुकसानभरपाई करण्यास जबाबदार नाही, कारण ते सफाई काम करतच नव्हते. या खाजगी कंपन्या कर्मचारी नेमत असले तरी ते ही नुकसान भरपाई देण्यास तयार नसतात. त्यांचा मृत्यू झाला याबाबत पोलिसांनी तपासणी केलेली असून एफआयआर करण्यात आल्याचे कारण देऊनही अशीच परिस्थिती सर्व महापालिकेमध्ये आढळते. कंत्राटी तत्वावर नेमल्या जाणाऱ्या कंपन्यांवर कोणाचे नियंत्रण आहे, तसेच या सेवेबाबत आऊटसोर्सिंगचे धोरण शासनाने ७-८ वर्षांपूर्वी केले आहे. ही अत्यावश्यक सेवा आहे. ज्या कामगारांची संख्या पूर्वी ७ ते ८ हजार इतकी होती. ती संख्या सध्या २३०० ते २४०० वर आली. वर्षानुवर्षे हे काम करणाऱ्या लोकांना "घाण भत्ता" लागू होता. आता खाजगी कंत्राटामुळे क्रिस्टल, बीव्हीजी सारख्या कंपन्या कामगारांचे मोठ्या प्रमाणात शोषण करीत आहेत. या कंपन्याकडून पीएफची रक्कम ही भरणा करण्यात येत नाही. यापूर्वी महापालिकेमधील कर्मचाऱ्यांना साबणापासून सर्व सुविधा पुरविल्या जायच्या. मात्र या खाजगी कंपन्या त्यांच्या कामगारांना ग्लोव्हज, शूज वगैरे साध्या सुविधा देखील पुरवित नाहीत. सामाजिक न्याय विभागाने अशा प्रकारे होणारे मागासवर्गीयांचे शोषण तातडीने शासनाच्या निदर्शनास आणून थांबविले पाहिजे, ही बाब समितीने निदर्शनास आणली.

तसेच औरंगाबाद येथील वसतिगृहाची ६-७ मजली इमारत बांधण्यात आली असून त्या इमारतीमध्ये लिफ्टची सुविधाच देण्यात न आल्याने तेथील लहान मुलांना रोज ७ मजले चढउतार करावे लागत असून त्या वसतिगृहातील लिफ्टचे काम झाले आहे की नाही, या बाबतची पडताळणी न करता इमारत ताब्यात घेणाऱ्या अधिकारी /कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करून तात्काळ त्यांना निलंबित केले पाहिजे. वसतिगृहाची एक हजार मुलांची क्षमता आहे. कोविड रुग्णांची व्यवस्था वसतिगृहाच्या याच इमारतीमध्ये केली होती. त्या रुग्णांकरिता

वसतिगृहातीलच गाद्या वापरल्या गेल्या. तेथील खोल्यांचे रंग काम केलेले नाही, मुलांसाठी असलेले न्हाणी कक्ष व मुतारी कक्ष अस्वच्छ असतात. क्रिस्टल व बीव्हीजी या सारख्या खाजगी कंपन्यांना त्यांची रक्कम वेळेवर मिळते, मात्र विद्यार्थ्यांना २-२ वर्षे शिष्यवृत्ती मिळत नाही, अगदी स्टेशनरी देखील त्यांना वेगळ्या पद्धतीने खुप विलंबाने मिळते असे मुद्दे समितीने उपस्थित केले असता याबाबत तक्रार करण्यात आली होती, त्यावर खाजगी कंपन्यांना कारणे दाखवा नोटिस देखील देण्यात आली आहे असे आयुक्त, समाजकल्याण यांनी सांगितले.

महापालिका, जिल्हापरिषद किंवा वसतिगृह अशा ज्या ज्या ठिकाणी आऊटसोर्सिंगचा अवलंब केलेला असेल त्यांचे पूर्ण परिक्षण करून त्यामध्ये गैरप्रकार आढळल्यास संबंधित कंपनीला काळया यादीत समाविष्ट करावे. तसेच सोलार सिस्टीम व लिफ्टचे काम पूर्ण झाले नसून आरसीसी स्ट्रक्चरचे काम पूर्ण झाले आहे, ते ताब्यात घेण्यात येत आहे, अशा पद्धतीने नमूद करून त्या इमारतीचा ताबा सामाजिक न्याय विभागाने घेऊन संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत कार्यवाही करावी या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाची चूक आहे. त्यांनी काम पूर्ण करून ते सामाजिक न्याय विभागास हस्तांतरित केले असते तर हा विषय समोर आला नसता. या प्रकरणी संबंधित समाज कल्याण अधिकारी यांची चौकशी करून त्यांच्या विरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सोलार सिस्टम बसविली नाही, लिफ्ट बसविली नाही, काम अपूर्ण असताना इमारत हस्तांतरित केली असल्याने या प्रकरणी बांधकाम विभागाच्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत सचिव, सार्वजनिक बांधकाम विभागास कळविल्याची माहिती विभागीय सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस दिली.

सार्वजनिक बांधकाम विभाग त्यांच्या अधिकाऱ्यांच्या संदर्भात निर्णय घेईल. या प्रकरणात प्रत्येक बाबींच्या संदर्भात विभागाचा गैर प्रकार निदर्शनास आला आहे, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यास समितीने सांगितले असता सामाजिक न्याय विभागामार्फत समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. तथापि, सदरहू मूळ विषय सार्वजनिक बांधकाम विभागाचा असून त्यांच्याकडून कारवाई करण्यात येत नाही. रायगड येथील इमारतीचा ताबा घेतल्यानंतर इमारतीमध्ये गळती होत असल्याची बाब समोर आल्यानंतर कारवाई करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे. कोकणात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्याने तसेच वसतीगृहाच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट झाल्याने इमारत जीर्ण होईल, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली असता. सदरहू ठिकाणच्या इमारतीमध्ये

न उभारलेल्या बाबींवर खर्च करण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहे. सदरहू ठिकाणच्या सहायक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग यांनी यासंदर्भात कोणती निरीक्षणे नोंदविली आहेत, त्यासंदर्भात कोणती कारवाई करण्यात आली आहे, अशी विचारणा समितीने केली असता सदरहू प्रकरणाचे सर्व अहवाल प्राप्त असून या प्रकरणी कारवाई करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. उक्त प्रकरणी समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती विभागीय सचिव, यांनी समितीस दिली. या प्रकरणाशी संबंधित जेवढ्या विभागांचे अधिकारी असतील, त्यांच्या विरुद्ध कारवाई करण्यात यावी व या प्रकरणी सर्व संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, त्याकरिता संबंधित विभाग परवानगी देतील, त्यांच्या विभागाच्या अधिकाऱ्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी परवानगी मागावी. उक्त प्रकरणातील संबंधितांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला पाहिजे, अशा प्रकारच्या कार्यवाहीत इतर जिल्हयातील अधिकारी जबाबदारीने चांगले काम करतील, अशी सूचना समितीने केली.

औरंगाबाद येथील वसतीगृहाची इमारत हस्तांतरित करून घेणारे अधिकारी सेवानिवृत्त झाले असल्याबाबत खुलासा सादर करण्यात आला होता. औरंगाबाद येथे दरी असलेल्या ठिकाणी जमीन खरेदी केली आहे, सोलार व लिफ्ट बसविलेली नसताना त्यांचे देयक अदा केले आहे. त्यांनी केलेल्या गैरव्यवहारा संदर्भात कारवाई करून त्यांच्याविरुद्ध तातडीने गुन्हा नोंद करावा व या प्रकरणी तातडीने कारवाई करण्याबाबतची सूचना समितीने केली असता यासंदर्भात शासनास प्रस्ताव सादर केला होता व तो उच्चाधिकार समितीकडे ही सादर करण्यात आला होता. परंतु उक्त प्रस्तावामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने काही त्रुटी काढल्या आहेत. आदिवासी विकास विभागामध्ये स्थापन झालेल्या बांधकाम विभागाच्या धर्तीवर विभाग निर्माण करण्यात येत आहे, जेणेकरुन संबंधित अधिकारी जबाबदारीने काम करतील व काही अनियमितता केली तर त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करता येईल. असे आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस अवगत केले. सामाजिक न्याय विभागाची स्वतंत्र बांधकाम यंत्रणा स्थापन करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्यास मंजुरी मिळण्यासाठी शासनस्तरावरील विहीत प्रक्रिया पार पाडण्यात येत असल्याची माहिती विभागीय सचिव, यांनी समितीस दिली.

**व्यावसायिक अभ्यासक्रमामधील आय.आय.टी., आय.आय.एम. अशा नामांकित शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना :–**

व्यावसायिक अभ्यासक्रमामधील आय. आय. टी., आय. आय. एम. अशा नामांकित शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना आहे. उक्त योजनेमध्ये सुधारणा करण्याबाबतच्या प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा समितीने केली असता अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील आयआयटी, आयआयएम या सारख्या देशपातळीवरील संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उक्त अभ्यासक्रमाच्या पुस्तकांसाठी व शैक्षणिक साहित्यासाठी प्रत्येकी ५ हजार रुपये याप्रमाणे १० हजार रुपये प्रति वर्षी देण्यात येतात. सदरहू रकमेमध्ये वाढ करण्याबाबत समितीने सूचित केले होते. त्यानुषंगाने महागाई निर्देशांकानुसार उक्त रकमेमध्ये वाढ करून पुस्तकांसाठी व शैक्षणिक साहित्यासाठी प्रत्येकी २५ हजार रुपये याप्रमाणे एकूण ५० हजार रुपये दरवर्षी मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव समाजकल्याण आयुक्तालयाने शासनास सादर केला आहे. सदरहू प्रस्ताव सद्यःस्थितीत शासनाच्या विचाराधीन असल्याची माहिती आयुक्त समाजकल्याण यांनी समितीस दिली. यावर आयुक्तालयास आर्थिक अधिभार गृहीत धरुन प्रस्ताव सादर करण्यास सांगण्यात आले होते व तो प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. याप्रकरणी अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा यासर्व घटकांचा विचार करून उक्त प्रकरणी निर्णय घ्यावा लागतो. सदरहू रकमेमध्ये महागाई निर्देशांकाच्या दृष्टीकोनातून वाढ करणे अपेक्षित असून त्यासंदर्भात कार्यवाही सुरू असल्याची माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

**अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता पुस्तकपेढी योजना :–**

अनुसूचित जातीसाठी राबविण्यात येणाऱ्या पुस्तकपेढी योजनेची माहिती देण्याबाबत समितीने विचारणा केली असता, शासन निर्णय दि. ५ जानेवारी, २००५ व त्यासोबतच्या केंद्र शासनाच्या दि. १ एप्रिल, २००५ च्या मार्गदर्शक सूचनानुसार भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृती योजनेंतर्गत वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषि, पशुवैद्यकीय, तंत्रनिकेतन व विधी अभ्यासक्रमातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता “ग्रंथपेढया” ही योजना (केंद्र हिस्सा ५०%) लेखाशिर्ष- (२२२५-०५६६) ३१ - सहाय्यक अनुदान व जिल्हा वार्षीक योजना (राज्य हिस्सा ५०%) लेखाशिर्ष (NN२१०००६) या नुसार राबविण्यात येते.

याबाबत केंद्रस्तरावर स्वतंत्र योजना नसून या योजनेचा समावेश भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृती योजनेंतर्गत करण्यात येतो. त्यानुसार प्रत्येक वर्षी केंद्रीय अनुदान प्राप्त करून घेण्यास्तव केंद्र शासनास राज्य शासनाकडून प्रस्ताव पाठविण्यात येतो. सदर प्रस्तावामध्ये पुस्तक पेढी या योजनेवरील मागणी देखील करण्यात येते. मात्र केंद्र शासनाने भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या निकषांमध्ये सन २०१७-१८ पासून बदल प्रस्तावित केले होते. यामध्ये प्रामुख्याने केंद्र शासनाचा हिस्सा अत्यल्प करण्यात आला होता व संपूर्णतः योजनेचा आर्थिक भार राज्य शासनास सोसावा लागणार होता. सदर बाब लक्षात घेता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीत वेळोवेळी केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, यांचेशी समन्वय साधून व याबाबत प्रखर पाठपुरावा करून अखेरीस माहे मार्च, २०२१ मध्ये केंद्र शासनाने सदर योजनेस ६० ( केंद्र हिस्सा ) :४० ( राज्य हिस्सा ) याप्रमाणात बांधील खर्च निश्चित केला आहे.

त्यानुसार पुस्तकपेढी ही योजना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृती योजनेंतर्गत असल्याने या योजनेंतर्गत लेखाशिर्ष ( २२२५-०५६६ ) ( केंद्र हिस्सा ५०% ) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी रक्कम रु. १८७.८४ लाख एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली होती. तथापि शासनस्तरावरुन सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी रक्कम रु. ०.०१ लाख इतकी नाममात्र तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली होती. सदर योजनेंतर्गत वाढीव तरतूद मागणीचा प्रस्ताव शासनास आयुक्तालयाचे दि. २६ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे चालू वर्ष २०२१-२२ करिता सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण व प्रादेशिक उपायुक्त, यांचेकडून सदर योजनेकरिता तरतूद मागणी करणेकरिता आयुक्तलयाचे दि. २६ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तथापि, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई - ३२ परिपत्रक क्रमांक विघयो- २०१९/प्र.क्र.२७/अर्थसंकल्प (विघयो), दि. १४ जानेवारी, २०२१ मधील अट क्र. ८ वर "केंद्र पुरस्कृत योजनांकरीता राज्य हिस्स्याची तरतूद, जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती घटक कार्यक्रमामध्ये प्रस्तावित करण्यात येऊ नये." असे नमूद आहे तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय व तंत्रनिकेतन विद्यार्थ्यांकरिता ग्रंथपेढया ही योजना केंद्र पुरस्कृत आहे, त्यामुळे सदर योजनेकरिता राज्य हिस्स्यापोटी कोणत्या लेखाशिर्षाखाली मागणी करावी याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून आयुक्तालयास वारंवार विचारणा होत आहे.

त्यानुषंगाने आयुक्तालयाचे पत्र क्र. १२१५, दि. १४ मार्च, २०२२ अन्वये शासन परिपत्रक दि.१४ जानेवारी, २०२१ मधील अट क्र. ८ ग्रंथपेढी योजनेव्यतिरिक्त इतर योजना लागू करावी, अशी सुधारणा करणेबाबत शासनास कळविण्यात आलेले आहे. उक्त योजनेबाबतच्या विभागाच्या दि. १४ जानेवारी, २०२१ रोजीच्या परिपत्रकातील त्रुटीपुर्तता करण्याचे प्रस्तावित आहे.

आयुक्त कार्यालयाच्या मागणीनुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी सदर योजनेवर रक्कम रु. १८७.८४ लाख एवढी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता पुस्तक पेढी योजनेची अंमलबजावणी केवळ पुणे व नागपूर या दोन जिल्ह्यात करण्यात येत असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. उक्त योजना राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सुरू करण्याच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी, अशी विचारणा समितीने केली असता समितीच्या निदेशाचे पालन करण्यात आले आहे. उक्त बाबीच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता व तो मंजूर करण्यात आला आहे. त्याकरिता यावर्षी १.८७ कोटी रुपये अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली तसेच सदरहू योजना चांगली असून त्यासाठी आणखी निधीची आवश्यकता असेल तर तो देण्यात येईल. या प्रकरणी वित्त विभागाने तातडीने निधीची उपलब्धता केली आहे, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

नववी व दहावीमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रि-मॅट्रिक शिष्यवृती योजने अंतर्गत ६२६५ कोटी रुपये प्राप्त झाले असून २२३२ कोटी रुपये खर्च झालले आहेत. सन २०२० - २०२१ या वर्षी ४ लाख २३ हजार विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रीकचे १२६२ कोटी रुपये डीबीटीद्वारे वाटप केलेले आहेत. महाडिबीटीद्वारे सन २०१८ पासून वाटप सुरू केले असून दिनांक ९ मे, २०२२ रोजी दिल्ली येथे झालेल्या बैठकीकरिता सामाजिक न्याय मंत्री, आदिवासी विकास मंत्री, सचिव, आयुक्त, समाजकल्याण उपस्थित होते. सदरहू बैठकीत केंद्र शासनाने पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीच्या संदर्भात ६० टक्क्यांच्या वर रक्कम ही केंद्र सरकारची असून ती तात्काळ विद्यार्थ्यांच्या खात्यात वर्ग केली जाणार आहे आणि विद्यार्थ्यांनी त्यातून महाविद्यालयीन फी भरण्याबाबत तसेच राज्य सरकारकडून ४० टक्के रक्कम पूर्वीच्या धोरणाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या खात्यात आणि कॉलेजची रक्कम त्यांच्या खात्यात जमा केली

जाईल. परंतु केंद्र सरकारच्या सूचना अशा आहेत की, त्यांचे मार्गदर्शक तत्वे राज्य शासनाने स्वीकारावीत. त्याप्रमाणे शिष्यवृत्तीचे वाटप करणे अपेक्षित असून १२६२ कोटी रुपयांमध्ये ७०० ते ८०० कोटी केंद्र सरकारचे आहे याबाबत मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाचे ६० टक्के आणि राज्य शासनाचे ४० टक्के निधी उपलब्ध करून महाडिबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्तीचे वाटप केले पाहिजे. तसेच केंद्र शासनाची नवीन सूचना आहे की, त्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल सुरू केले असून पोर्टलवर सर्व माहिती उपलब्ध करण्यात येत आहे. महाडिबीटीच्या माध्यमातून नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर डेटा जमा केला जातो. हे सर्व्हर इंटिग्रेटेड आहे. यासंदर्भात तत्कालिन उप मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत राज्य शासनाकडून त्यांच्या हिश्यातील ४० टक्के रक्कम देण्यात येत असून सदरहू रक्कम महाडिबीटीमार्फत आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात येते. त्यामुळे पब्लिक फंड मॅनेजमेंट सिस्टिमद्वारे याचे वाटप करण्यात येत आहे केंद्र शासनाने सन २०२२-२३ या वर्षात ७८३ कोटी रुपये रक्कम मंजूर केली असल्याची माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

सन २०१८ या वर्षात राज्यात अनेक ठिकाणी शिष्यवृतीमध्ये गैरप्रकार झाल्याबाबतच्या अनेक बाबी निदर्शनास आल्या होत्या. त्याबाबत राज्य शासनाने एसआयटी स्थापन केली होती. त्यामध्ये काही बाबी आढळल्या होत्या त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल झाले आहेत. तसेच संबंधित संस्था चालकांवर देखील कारवाई करण्यात आली आहे. काही ठिकाणी ज्यांनी चुकीच्या पद्धतीने रकमा घेतलेल्या आहेत. त्यांचेकडून वसूली प्रक्रिया देखील सुरू केली आहे. शिष्यवृतीबाबत अशाप्रकारे पुनरावृत्ती होऊ नये म्हणून माननीय सचिवांनी देखील बैठक घेऊन लेखापरीक्षणामध्ये जेवढया किंमतीची अडचण आली त्याचे सर्व दस्तऐवज आरक्षित करून ठेवण्यात यावे, अशाप्रकारचे निर्देश दिले असल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली यावर समितीने शिष्यवृतीमधील गैरप्रकाराबाबत किती गुन्हे दाखल झाले आहेत अशी विचारणा केली असता यामध्ये एफआयआर दाखल झाली आहे, याप्रकरणी चौकशी सुरू असून काही अधिकारी देखील निलंबित झाले आहेत. व्हिजेएनटी आणि ओबीसीच्या बाबतीत देखील अशा प्रकारच्या काही बाबी निदर्शनास आल्या आहेत. त्या प्रकरणातही एसआयटी स्थापन होऊन कार्यवाही सुरू आहे. अंमलबजावणी संचालनालय (ED) यांनी देखील समाजकल्याण विभागाकडून माहिती मागविली आहे. त्यांच्याकडून देखील चौकशी सुरू आहे. शिष्यवृती गैरप्रकाराबाबत पोलीस विभागाकडून याची माहिती घेऊन समितीला सादर करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस

दिली. यावर आतापर्यंत काही चौकशींचे आरोपपत्र न्यायालयात गेले आहेत किंवा नाही, एवढया वर्षापासून हे सर्व चौकशीच्या स्तरावरच सुरू असून न्यायालयात एकही आरोपपत्र दाखल झालेले नाही. ज्या संस्था शिष्यवृत्तीच्या बाबतीत सिस्टिममधून ऑपरेट करीत होत्या त्यांच्यावर काय कारवाई केली, त्यांच्यावर काही वसूली लावली आहे काय, काही कर्मचारी तुरुंगात गेले आणि परत कामावर रुजू झाले आहेत त्यांच्याकडून काही वसूली करणार आहात काय, एकूण किती आणि कधी एफआयआर दाखल झाले आहेत याची माहिती देण्याबाबत विचारणा समितीने केली असता यामध्ये जी कायदेशीर प्रक्रिया असेल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस आश्वासित केले.

**कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील भूमिहिन शेत मजूरांना कायमस्वरुपी दोन एकर ओलीताखालील जमीन किंवा चार एकर कोरडवाहू जमीन उपलब्ध करून देण्याबाबत :—**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रय रेषेखालील भूमिहिन शेत मजूरांना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याकरिता दोन एकर ओलीताखालील जमीन किंवा चार एकर कोरडवाहू जमीन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. जिरायत जमिनीकरीता प्रती एकर ५ लाख व बागायत जमिनीकरीता प्रती एकर ८ लाख रुपये असे विभागाने दर निश्चित केले आहेत. सदरहू दर हे जमिनीच्या सध्याच्या बाजारमुल्यांशी समतुल्य नाहीत. सदरहू दर बाजारमुल्याशी मिळतेजुळते करणे आवश्यक आहे. तसेच उक्त योजनेंतर्गत लाभार्थ्यांची संख्या खूपच कमी दिसत असल्याने या योजनेचा प्रचार प्रसार प्रभावीपणे करणे अंत्यत आवश्यक असून या योजनेबाबतची माहिती देण्याबाबत समितीने विचारणा केली असता याकरिता जमीन बाजारमुल्याप्रमाणे मिळत नाही हा आतापर्यंतचा समितीचा आणि विभागाचा अनुभव आहे. त्या दृष्टीकोनातून शासन स्तरावर त्या पद्धतीने निर्णय घ्यावा लागेल. सर्व राज्यासाठीच हे दर आहेत. काही ठिकाणी जमिनी कमी दराने किंवा जास्त दराने मिळतात. तसेच काही ठिकाणी बागायती तर काही ठिकाणी हलक्या जमिनी आहेत. यासाठी कशा पद्धतीने चांगली योजना करता येईल यासाठी एखादी योजना तयार करावी लागेल. तसेच रेडी रेकनरचा दर बेस ठेऊन हे आपण पाहू. तसेच सन २०२२ २३ या वर्षात शासनाने यासाठी १५० कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करून दिली असून आतापर्यंत एकूण ६१८५ लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत पूर्ण लाभ देण्यात आला आहे, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

कायमस्वरुपी शेतमजूर असणाऱ्या अनुसूचित जातीच्या कुटुंबासाठी असणारी विभागाची ही सर्वांत चांगली योजना आहे. या योजनेंतर्गत शासनाकडून निधीची तरतूद होत आहे. परंतु बाजारमुल्यामध्ये बसत नसल्यामुळे योजनेंतर्गत पैसे खर्च होत नाहीत आणि जमीन उपलब्ध होत नाही. त्यामुळे सदर योजना बंद पडण्याच्या मार्गावर आहे. शासन जेवढ्या निधीची तरतूद करीत आहे, किमान तेवढा निधी खर्च होणे आवश्यक आहे. सर्व योजनांच्या तुलनेमध्ये ही योजना खूप चांगली आहे. शासनाने जिरायत शेतीला ५ लाख रुपये दिले व बागायत शेतीला ८ लाख रुपये दिले तरी जमीन उपलब्ध होणार नाही. कमीत कमी जिरायत शेतील ९ लाख रुपये व बागायत शेतीला १३ लाख रुपयांची तरतूद करणे आवश्यक आहे. या योजनेमध्ये ५ लाख रुपयांमध्ये अशीच जमीन उपलब्ध होईल ज्या जमिनीमध्ये कोणत्याही प्रकारचे उत्पादन घेता येत नाही अशी विचारणा समितीने केली असता जमीन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने सर्वसमावेशक धोरण आणणे आवश्यक आहे सदर योजनांसाठी जमीन उपलब्ध करण्यासाठी रेडीरेकनरच्या दरापेक्षा दुप्पट दराने जमीन खरेदी करता येते. म्हणजे एखाद्या जमिनीचा रेडीरेकनरचा दर एक लाख रुपये आहे तर ती जमीन २ लाख रुपयांमध्ये खरेदी करता येते. परंतु तीच जमीन ५ लाख रुपयांमध्ये खरेदी करण्यासाठी शासन स्तरावर निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच वित्त विभागाच्या मान्यतेने याबाबत निर्णय घ्यावा लागेल. आर्थिक बाबींशी संबंधित नस्ती वित्त विभागाकडे जाते. त्यांच्या मान्यतेशिवाय शासन निर्णय निर्गमित करता येत नाही किंवा कोषागारातून निधी काढता येत नाही. वित्त विभागाने मान्यता दिली तर याबाबत निर्णय घेण्यास कोणतीही अडचण होणार नाही. जमीन उपलब्ध होत नसल्यामुळे कोणत्याही जिल्ह्यामध्ये एकही प्रकल्प उभारला जात नाही, ही बाब वित्त विभागाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. उक्त प्रस्तावामध्ये या सर्व बाबींचा समावेश करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

**महानगरपालिकेमध्ये गटई कामगारांना पत्र्यांचे स्टॉल पुरविणे :—**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये गटई कामगारांना पत्र्यांचे स्टॉल पुरविणेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात यावी व गटई कामगारांना पत्र्यांचे स्टॉल देण्यासाठी सर्व महानगरपालिकेमध्ये निधीची तरतूद करण्यात आली आहे काय, अशी विचारणा समितीने केली असता सन २०१९ मध्ये याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे विचारणा केली असता माननीय न्यायालयाच्या निदेशानुसार पिच परवाने देता येणार नाहीत, अशी माहिती महानगरपालिकेने दिलेली आहे. याबाबत विभागाकडून सन २०१९ पासून पाठपुरावा करण्यात

येत आहे. गटई कामगारांना पत्र्यांचे स्टॉल देण्यासाठी मागील दोन वर्षामध्ये नव्याने कोणतीही निविदा करण्यात आलेली नाही. परंतु सन २०२२- २०२३ या वर्षात गटई कामगारांना पत्र्यांचे स्टॉल देण्यासाठी ७ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या वर्षी सदर योजना कार्यान्वित करून सदर निधी खर्च करण्यात येणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी सदर निधीची तरतूद केलेली आहे, अशी माहिती विभागीय सचिव, यांनी समितीस दिली असता यावर सर्व महानगरपालिकेसाठी निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. राज्यातील अन्य महानगरपालिकेमध्ये देखील गटई कामगारांना पत्र्यांचे स्टॉल देण्याची योजना राबविली जात नाही. गटई कामगार हा ऊन-पावसामध्ये उघड्यावर बसतो. परंतु महानगरपालिकेचे अधिकारी त्यांना वाटेल तेव्हा त्या कामगाराला तेथून उठवितात. त्यामुळे अशा कामगारांना शासन मान्य किंवा अधिकृत स्टॉल दिला तर त्या कामगाराचे ऊन-पावसापासून संरक्षण होऊन त्याला विस्थापित करता येणार नाही. महानगरपालिकेच्या परवानगीनेच अधिकृतपणे सदर कामगार त्या ठिकाणी काम करीत असल्याने यासाठी पिच परवाने घेणे आवश्यक असते. पिच परवाना मिळाल्यानंतर तो काम करीत असलेली जागा अधिकृतरित्या त्याची आहे, असे सिद्ध होते. पिच परवाना न देता फक्त स्टॉल दिले जाते. मुंबईत अनेक फेरीवाले असून त्यांना महानगरपालिकेकडून पिच परवाने दिले आहेत. परंतू जे कामगार अनेक वर्षापासून एकाच ठिकाणी बसून बुट पॉलिशचे काम करीत आहेत, त्यांना मात्र पिच परवाने दिले जात नाही, अशी बाब समितीने उपस्थित केली असता ज्या कामगारांना स्टॉल दिलेले आहेत, त्यांना महानगरपालिकेने संरक्षण दिलेले आहेत. त्यांना कोणीही उठवू शकत नाही. कारण त्या स्टॉलवर आदेश क्रमांक व स्टॉलचा क्रमांक असतो. आता नवीन पिच परवाने देण्याबाबत माननीय न्यायालयाचे काही आदेश आहेत. त्याबाबतचा अभ्यास करून पिच परवाने कसे देता येतील, याबाबत पाठपुरावा करण्यात येईल, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली असता पिच परवाने देण्याबाबत मुंबईमध्ये अशी अडचण आहे. परंतु पुणे महानगरपालिका देखील पिच परवाने किंवा स्टॉल देत नाही. मुंबई वगळता राज्यातील अन्य महानगरपालिकेमध्ये किती कामगारांना स्टॉल पुरविलेले आहेत, याबाबतची आकडेवारी समितीला देण्यात यावी तसेच सन २०१३ नंतर देखील मोठ्या प्रमाणावर स्टॉलची मागणी होती. अशी विचारणा समितीने केली असता पुणे येथे सन २०११-१२ मध्ये ६३ स्टॉलचे वाटप करण्यात आलेले आहेत. सन २०१२-१३ मध्ये ८४ स्टॉलचे वाटप करण्यात आलेले आहेत. त्यानंतर स्टॉलची मागणी करण्यात आलेली नाही. राज्यातील सर्व महानगरपालिकेतून कोणत्या वर्षामध्ये किती

स्टॉल देण्यात आले आहेत, याबाबतची सर्व माहिती समितीला सादर करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिव, यांनी समितीस दिली.

## अनुसूचित जातीच्या औद्योगिक सहकारी संस्थांना अर्थसहाय्य :–

अनुसूचित जातीच्या औद्योगिक सहकारी संस्थांना अर्थसहाय्य देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे, याबाबतची विचारणा समितीने केली असता अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थाना अर्थसहाय्य देणे या योजनेंतर्गत ३७२ संस्थाना अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे. तसेच सात नवीन संस्थाना मजुंरी देण्यात आलेली आहे. या प्रकल्पामध्ये उत्पादन सुरू असलेल्या विभागाने वर्गवारी केलेल्या संस्थांची संख्या ६४ इतकी आहे. सहकारी विभागाने लेखापरीक्षण केलेल्या संस्थांची संख्या १० आहे. अशा एकूण ७४ संस्था आहेत. बांधकाम पूर्ण/प्रगतीपथावर असलेल्या संस्थांची संख्या ९६ इतकी आहे. तसेच या संस्थामध्ये मशिनरी बसविण्याची कार्यवाही सुरू आहे. पहिला हप्ता घेऊन उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केलेल्या संस्थांची संख्या ७४ इतकी आहे. तसेच लेखापरीक्षण केलेल्या संस्थांची संख्या ४४ इतकी आहे, अशा एकूण ११८ संस्था आहेत. गुन्हे दाखल झालेल्या संस्था / सहकार विभागाकडून तपासणीअंती विनिर्दिष्ट अहवाल सादर केलेल्या संस्था/फौजदारी कारवाई सुरू असलेल्या संस्थांची संख्या ६५ इतकी आहे. एकूण संस्थाचा विचार केला तर विभागाने वर्गवारी केलेल्या संस्थांची संख्या २४६ इतकी आहे. सहकार विभागाने लेखापरीक्षण केलेल्या संस्थांची संख्या १३१ अशा एकूण संस्थांची संख्या ३७७ आहे. यापैकी “अ” वर्गामध्ये ७४ संस्थाच्या प्रकल्पामध्ये उत्पादन सुरू झालेले आहे. “ब” वर्गामध्ये १२२ संस्थाच्या प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण/प्रगतीपथावर/मशिनरी बसविण्याची कार्यवाही सुरू आहे. यापैकी सन २०२०-२१ मध्ये ५३ संस्थांची सुनावणी घेण्यात आलेली आहे. ज्या संस्थांना निधी उपलब्ध करून दिल्यामुळे त्या संस्था उद्योग उभे करु शकतील, अशा अ+ब च्या एकूण १९६ संस्थांपैकी ज्या संस्था पात्र ठरतील त्या संस्थांचे प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाकडून मागवून त्या संस्थाना अर्थसहाय्य देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याने अशा संस्थांना आवश्यक त्या प्रमाणात अनुसूचित जाती उपयोजनेतून पुनर्विनियोजनाद्वारे निधी मंजूर करण्याबाबत पुरवणी मागणी शासनास सादर करण्यात येईल. तसेच ९ नवीन संस्थाचे प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे सादर करण्यात आलेले आहेत, अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

काही ठिकाणी या संस्थावर गुन्हे दाखल केलेले आहेत तर काही ठिकाणी गुन्हे दाखल केलेले नाहीत. ज्या संस्थांवर गुन्हे दाखल केले आहेत, ते कोणत्या निकषानुसार दाखल केलेले आहेत, प्रत्यक्ष सुरू असलेल्या व उत्पादन घेणाऱ्या संस्थांची संख्या अतिशय कमी आहे. एकूण ३७२ औद्योगिक संस्था आहेत. सदर सर्व संस्थांना अनुदान देण्यात आलेले आहे. या सर्व संस्थांचे लेखापरीक्षण होणे अपेक्षित होते, असे असताना देखील केवळ १३१ संस्थांचे लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे. सन २००४ पासून ते सद्यस्थितीत किती संस्थाकडून वसूली करण्यात आली, या योजनेसाठी संस्थेस किमान २५० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कमेचे वाटप झालेले आहे. एकूण रक्कम किती आहे, याबाबत विचारणा समितीने केली असता माननीय न्यायालयामध्ये एक पीआयएल दाखल करण्यात आली होती. त्यामुळे एकूण ८२ संस्थांचे लेखापरीक्षण करण्यात आले होते. यामध्ये ज्या ज्या संस्था दोषी आढळलेल्या आहेत, त्या संस्थांवर गुन्हे दाखल करून वसूली करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही केलेली आहे. त्यात एकूण ३० संस्थांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. अशी माहिती विभागीय सचिव यांनी दिली. अनुदान दिलेल्या ३७२ संस्थांपैकी केवळ १३१ संस्थाचे विशेष लेखापरीक्षण करण्यात आलेले असल्याबाबत मुद्दा समितीने उपस्थित केला असता प्रत्येक संस्थेने खाजगी सनदी लेखापालामार्फत लेखापरीक्षण करून घेणे अपेक्षित असते त्यानंतर ते लेखापरीक्षण जिल्हा उपनिबंधक यांच्याकडून साक्षांकित करून घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारची कार्य पद्धती सर्व संस्थांनी करणे आवश्यक आहे तसेच सदरहू योजनेवर १११२ कोटी रुपयांचा खर्च झालेला असून यात ३५ टक्के कर्ज आणि ३५ टक्के भागभांडवल असे एकूण ८२ लक्ष रुपये वसूल केले असल्याची माहिती आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली. ३७२ पैकी किती संस्था सुरू आहेत असा प्रश्न समितीने विचारला असता एकूण ७४ संस्था सुरू असून उर्वरित १२२ संस्थाचे काम सुरू आहेत. नवीन उद्योजक किंवा तरुण उद्योजकांकडून पाठपुरावा केला जात आहे. सद्यस्थितीत मंजुरी देण्याचे थांबविण्यात आलेले आहे. जुने प्रकल्प कसे पूर्ण होतील किंवा ज्या लोकांनी प्रकल्प पूर्ण केले नाहीत किंवा काही ठिकाणी अनियमितता दिसून आल्यामुळे त्यांच्या अनुदानातून ते वसूली करण्याचे काम सुरू असल्याची माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली.

**अनुसूचित जातीच्या सहकारी सूत गिरणींना दीर्घ मुदतीचे कर्ज :—**

विशेष घटक योजनेतून (SCP) अनुसूचित जातीमधील मागासवर्गीयांच्या सूत गिरण्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करणे या योजनेंतर्गत आजमितीपर्यंत किती सूत गिरण्यांना

मंजुरी देण्यात आली, त्यापैकी किती सूत गिरण्या कार्यरत आहेत, या योजनेंतर्गत झालेले कर्ज वाटप, कर्ज वसुली व खर्ची पडलेला निधी याबाबतची तपशीलवार माहिती समितीस अवगत करण्यात यावी तसेच ज्या तालुक्यात कापूस उत्पादन होते, अशा ठिकाणी शासनाने सन २०१८ मध्ये केलेल्या नियमावली नुसार काही तालुके वगळलेले आहेत. तरी नव्याने या तालुक्यांचा समावेश करण्याची आवश्यकता आहे. समितीला सूत गिरण्यांच्या संदर्भातील यादी दिलेली नाही. तसेच नव्याने काही प्रस्ताव आलेले आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता सन २०२२-२०२३ मध्ये ७५ कोटी रुपये अर्थसंकल्पीय तरतूद असून अद्यापपर्यंत १६ सूत गिरण्यांना लाभ देण्यात आलेला आहे. प्रकल्प मर्यादा ही ४० ते ४५ कोटी रुपयांपर्यंत आहे. त्यानुसार मंजुरी देण्याची कार्यवाही केली जाते. प्रकल्प मोठा असल्यास ती मर्यादा ६० ते ६१ कोटी रुपयांपर्यंत आहे. ७० टक्के अनुसूचित जातीसाठी आणि ३० टक्के इतर प्रवर्गाकरिता असे प्रमाण आहे. यामध्ये संबंधितांकडून जात वैधता प्रमाणपत्र तपासून घेतले जाते. अशी माहिती विभागीय सचिव यांनी समितीस दिली असता त्यावर फेरविचार करण्याची गरज आहे. अनुसूचित जातीचे मालक असणाऱ्या सूत गिरण्या किती आहेत, याबाबतची समितीला यादी देण्यात यावी, तसेच ७० आणि ३० टक्के अट रद्द करून १०० टक्के अनुसूचित जातीमधील लोक असली पाहिजेत, असे समितीने सूचित केले.

***

## अभिप्राय व शिफारशी

अनुसूचित जाती कल्याण समितीने सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ रोजी विधान भवन, मुंबई येथे बैठक घेतली. सदर बैठकीत अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना व विशेष घटक योजनेसंदर्भात सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचेकडून माहिती सादर करण्यात आली. सदर बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने दिनांक २४ मे, २०२२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. समितीच्या बैठकीदरम्यान काही त्रुटी समितीच्या निदर्शनास आल्या आहेत.

(१) अस्वच्छ व्यवसायामध्ये काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी शाळा व मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना या योजनेंतर्गत अस्वच्छ व्यवसायामध्ये काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी राज्यात सद्य:स्थितीत दोन शाळा कार्यरत असून त्यापैकी एक शाळा येरवडा (पुणे) व दुसरी शाळा हिंगणा, नागपूर येथे आहे, तसेच नागपूर मध्ये सफाई कामगारांच्या पाल्याकरिता एका ठिकाणी शाळा सुरु केलेली आहे. तथापि, सफाई कामगारांच्या वसाहती विखुरलेल्या असल्यामुळे पाल्यांना शाळा खूप दूर पडते, तसेच सदर शाळेस सफाई कर्मचाऱ्यांच्या पाल्याची शाळा म्हणून समाजात त्या शाळांची ओळख निर्माण होणे अशा बाबी निदर्शनास आल्या. सबब, सदर वस्तुस्थिती लक्षात घेता सदर वर्गासाठी सुरु करण्यात आलेल्या शाळांच्या दर्जात सुधारणा करुन शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी आवश्यक असणारी उपाययोजना करावी व तत्संबंधी शासन निर्णय तातडीने निर्गमित करावा त्याचप्रमाणे अशा शाळांच्या नावांमध्ये जातीवाचक नावांचा उल्लेख असल्यास तो वगळून महापुरुषांच्या नावांने शाळांच्या नावांत सुधारणा करावी अशी शिफारस समिती शासनास करित आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात यावा.

समितीला पुढे असे ही निदर्शनास आले की, अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सदर योजना केंद्र व राज्य शासनाच्या हिश्यातून राबविली जाते. सदर योजनेंतर्गत

देण्यात येणारी शिष्यवृत्ती ही अत्यंत कमी असल्याने त्यात कालानुरुप बदल करणे आवश्यक आहे. तसेच शिष्यवृत्ती मिळण्याकरिता विद्यार्थ्यांची कागदपत्रांअभावी अडवणूक केली जाते ही बाब लक्षात घेता अस्वच्छ व्यवसायामध्ये काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्यात यावी तसेच सदर विद्यार्थ्यांना बहुतांश वेळा शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या सत्र समाप्तीनंतर मिळत असल्याने या रकमेचा वापर त्यांना शैक्षणिक वर्षात करता येत नाही. अशा रकमेचा वापर त्यांना शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून दोन महिन्याच्या आत तरतूद वितरीत करण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करुन योग्य ती उपाययोजना करावी अशी शिफारस समिती शासनास करित आहे तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावी.

(२) समितीला पुढे असे ही निदर्शनास आले की, अनुसूचित जातीच्या सर्व योजनांची अंमलबजावणी ज्या ठिकाणी दलित वस्ती घोषित करण्यात आली आहे, त्याच ठिकाणी करण्यात येते, परंतु खुल्या प्रभागामध्ये विखुरलेल्या अनुसूचित जातींसाठी कोणतीही योजना राबविली जात नाही. खुल्या प्रभागात विखुरलेल्या अनुसूचित जाती आयडेंटीफाय होत नाही, तसेच प्रभाग आरक्षित नसल्यामुळे त्या ठिकाणी वास्तव्य करीत असलेल्या दलित समाजाला शासनाच्या कोणत्याही योजनांचा लाभ मिळत नाही. अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधारणा योजनेचा मुख्य उद्देश ज्या शहरामध्ये झोपडपट्ट्या आहेत, त्या ठिकाणी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे हा आहे. या योजनेंतर्गत ५०% लोकसंख्येची अट आहे. तथापि, शहरी भागामधील अनुसूचित जाती विखुरलेल्या स्वरुपात असल्यामुळे अनेक वस्त्या ही ५०% ची अट पूर्ण करु शकत नाही. त्यामुळे सदर योजनेचा लाभ शहरात विखुरलेल्या स्वरुपात राहणाऱ्या समाजातील घटकांना मिळत नाही ही बाब लक्षात घेता सदर घटकांना वैयक्तिक लाभांच्या योजनांचा लाभ देता येईल किंवा कसे याबाबत आढावा घेवून वैयक्तिक लाभांच्या योजना आखून अशा प्रकारे विखुरलेल्या घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी योग्य त्या योजना राबविण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात व त्याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.

(३) केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने सन २००९-१० या आर्थिक वर्षापासून प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना लागू केली आहे. सदर योजनेंतर्गत अनुसूचित जातीची ५० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावात मुलभूत सोईसुविधांची कामे केली जातात. प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेअंतर्गत (PMAGY) सभामंडप किंवा सांस्कृतिक सभागृहाकरिता दिला जाणारा निधी खूपच कमी असल्याने उक्त रक्कमेद्वारे दर्जेदार व टिकाऊ कामे करणे शक्य होत नाही. सदरची कामे टिकाऊ व दर्जेदार करुन त्या कामाचा जास्तीत जास्त वापर करता यावा यासाठी सध्या देण्यात येणाऱ्या रक्कमेत भरीव वाढ करुन वित्तीय मर्यादा वाढविण्यात यावी व त्या अनुषंगाने शासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

(४) समितीच्या बैठकीत असेही निदर्शनास आले की, राज्यामधील आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी उपयोजना तर अनुसूचित जातींच्या विकासासाठी अनुसूचित जाती उपयोजना राबविण्यात येते. आदिवासी उपयोजनांमध्ये तरतूद करतांना आदिवासी समाजातील लोकप्रतिनिधींच्या सूचनेनुसार आदिवासी विभागातील प्रकल्प अधिकाऱ्यांकडून अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येते. दरवर्षी जिल्हा नियोजन समितीला अनुसूचित जाती उप योजनेंतर्गत निधी दिला जातो. तथापि, अनुसूचित जातीसाठी उपयोजना राबविताना संबंधित जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील लोकप्रतिनिधींचे मत विचारात घेतले जात नाही. त्यामुळे अनुसूचित जाती उपयोजनेकरिता आवश्यक त्या प्रमाणात अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येत नाही. या पुढील काळात अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत अर्थसंकल्प तयार होण्यापूर्वी अनुसूचित जातीच्या लोकप्रतिनिधींकडून सूचना विहित मुदतीत मागवून अशा प्राप्त होणाऱ्या सूचनांवर प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीने विचार करुन त्यानुसार अनुसूचित जाती उपयोजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासंदर्भात कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.

(५) समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेत असेही निदर्शनास आले की, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील

भुमिहीन शेतमजूरांना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याकरिता दोन एकर ओलीताखालील अथवा चार एकर कोरडवाहू जमिन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तथापि जमिनीच्या रेडी रेकनरचे दर वाढलेले असताना सुध्दा सामाजिक न्याय विभागाकडून अद्यापही जमिनीसाठी मिळणाऱ्या अनुदानाचे दर वाढविण्यात आलेले नाहीत. सद्यस्थितीत या योजनेंतर्गत जिरायत जमिनीसाठी प्रती एकर ५ लक्ष रुपये व बागायत जमिनीसाठी प्रती एकर ८ लक्ष रुपये इतके अनुदान देण्यात येते. सदरचे अनुदान पूर्ण राज्यासाठी एकसारखे आहेत. तथापि, प्रत्येक जिल्ह्यामध्ये जमिनीचे दर वेगवेगळे असल्यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये या दरानुसार जमीन उपलब्ध होत नाही. त्यामुळे सदर योजनेंतर्गत जमीन घेण्याकरिता देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये कालानुरुप बदल करणे आवश्यक आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान ही योजना राज्यातील अनुसूचित जातीच्या दारिद्रय रेषेखालील भूमिहिन शेजमजूरांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांना कायमस्वरुपी उत्पादनाचे साधन उपलब्ध होण्यासाठी राबविली जाते. सदरची योजना राबविण्यात शासनाचा उदात्त हेतू असल्याचे दिसून येते. तथापि, या योजनेचा लाभ जास्तीत जास्त अनुसूचित जातीतीत दारिद्रय रेषेखालील भुमिहीन शेतमजूर लाभार्थ्यांना मिळत नसल्याचे तसेच उक्त योजनेचा जास्तीत जास्त प्रचार व प्रसार झाला नाही व यात प्रामुख्याने संबंधित अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा व दुर्लक्ष असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. आता दिवसेंदिवस अशा जमिनीच्या भावात वाढ झाल्याने शेतकरी जमिनी देण्यास इच्छुक नाहीत. त्यामुळे या समुहाला उक्त योजनेचा लाभ मिळणे बहुतांश जिल्ह्यात दुरापास्त झाले आहे. उक्त योजना अनुसूचित जातीच्या भुमिहीन शेतमजूर यांचे जीवनमान उंचावून त्यांच्या उत्पादकतेत वाढ होण्यासाठी तसेच त्यांचे सन्मानाने जगणे सुकर होण्यासाठी आहे ही बाब विचारात घेता या योजनेचा जास्तीत जास्त प्रचार व प्रसार होण्यासाठी शासनाने या प्रकरणी एक सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करुन तो शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करुन जिल्हा व तालुका स्तरावरील महसूल तसेच सामाजिक न्याय विभागाच्या कार्यालयात दर्शनी भागात तसेच कार्यालयाच्या जाहिरात फलकावर लावण्यात यावा जेणेकरुन तो उक्त लाभार्थ्यांना माहितीसाठी उपलब्ध होईल. तसेच या योजनेंतर्गत जिरायत जमिनीला प्रति एकर ५ लक्ष रुपये व बागायत जमिनीला प्रति

एकर ८ लाख रुपये अनुदान देण्यात येते, अलिकडील काळात जमिनीचे वाढलेले भाव विचारात घेता बाजार भावाप्रमाणे उक्त रकमेत योग्य ती वाढ करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

(६) रमाई आवास योजनेसंदर्भात सदरहू बैठकीत मुद्दा उपस्थित झाला असता, राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील कुटुंबाचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा, याकरिता रमाई आवास योजना सुरु करण्यात आली आहे. तथापि, सदरहू योजनेंतर्गत शहरी भागातील अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी केवळ २.५० लक्ष रुपये इतके अनुदान शासनामार्फत देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. वाढत्या महागाईच्या काळात पक्के घर बांधकामासाठी वाळूची उपलब्धता, बांधकाम, मजूरी, लोखंडाचे भाव, इत्यादी बाबी विचारात घेता उक्त अनुदानाची रक्कम शहरी भागात घर बांधकाम करण्यासाठी पुरेशी नसल्याने या रकमेमध्ये पक्के घर बांधता येणे शक्य होत नाही. तसेच या योजनेंतर्गतचा लाभार्थी अत्यल्प उत्पन्न गटातील असल्याने त्यांच्याकडे सुध्दा पक्के घर बांधकामासाठी आवश्यक असलेली उर्वरीत रक्कम उपलब्ध होण्यास अनेक अडचणी असतात त्यामुळे लाभार्थ्यांना घरकुल मंजूर होऊनही अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने घरकुले विहित मुदतीत पूर्ण होत नाहीत. सद्याच्या काळातील वाढती महागाई विचारात घेऊन रमाई आवास योजनेंतर्गतच्या अनुदानामध्ये लाभार्थ्यांच्या विविध अडचणी विचारात घेता सदरचे घरकुल लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने भरीव वाढ करण्यात यावी तसेच खाजगी घोषित झोपडपटट्यामध्ये रमाई आवास योजना लागू होत नाही त्यामुळे खाजगी घोषित झोपडपटट्याबाबतची अट शिथिल करणे आवश्यक आहे. अतः खाजगी घोषित झोपडपट्टयामधील अट शिथिल करण्यासंदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करुन रमाई आवास योजनेत असलेल्या त्रुटींची पूर्तता करावी व सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त लोकांना कसा होईल त्यादृष्टीने उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात अवगत करावी अशी शिफारस समिती करीत आहे.

तसेच समितीला अनुसूचित जातीसाठी असलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी केवळ जागे अभावीच होत नसल्याचे निदर्शनास आले असून या

योजना राबविण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याचे कारण दिले जाते. तथापि जागा संपादित करुन उपलब्ध करण्याबाबत प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका यांच्याशी चर्चा करुन तेथील मोकळी जागा उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. रमाई आवास योजनेतील ४० टक्के घरे जागेअभावी बांधता येत नाहीत. त्यामुळे अनुसूचित जातीच्या रमाई आवास योजना, श्रमसाफल्य व इतर योजना योग्यरित्या राबविल्या जात नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील जागेच्या व साहित्याच्या किंमती मोठया प्रमाणात वाढत असताना शासनाच्या विविध योजनांकरिता असलेली रक्कम त्याप्रमाणात वाढविलेली नाही,

अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना शहरी भागात घरकुलाची जागा उपलब्ध होत नसल्यामुळे अनेक पात्र लोकांना घरकुलापासून वंचित राहावे लागत आहे. यासाठी शहरातील नगररचना करित असताना त्यातील नियोजनात अनुसूचित जातीतील व्यक्तींना घरकुले उपलब्ध होण्यासाठी योग्य ते भुखंड राखीव ठेवण्यात यावे यासाठी सामाजिक न्याय विभागाने नगरविकास विभागाकडे योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा त्याचप्रमाणे शहराच्या विविध भागात ज्या शासकीय जमिनी उपलब्ध आहेत अशा जागेवर अनुसूचित जातीतील वंचित व्यक्तींना घरकुलासाठी आवश्यक ती जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी.

ग्रामीण भागातील रमाई आवास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण असा कक्ष तयार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे या योजनेच्या शहरी भागातील प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष – शहरी गृहनिर्माण असा स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीला सादर करावा अशी ही समिती शिफारस करीत आहे.

(७) समितीच्या बैठकीत सामाजिक न्याय विभागांतर्गत करण्यात येत असलेल्या बांधकामासंदर्भात मुद्दा उपस्थित झाला. सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारितील नवीन बांधकामाची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत

करुन घेतली जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उक्त कामे विहित कालावधीत सुरु तसेच पूर्ण करुन दिली जात नाहीत. त्यामुळे बांधकाम खर्चात वाढ होते व शासनावर विलंबाने होणाऱ्या बांधकामाच्या अतिरिक्त खर्चाचा भार पडतो. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणाऱ्या कामावर संनियंत्रण ठेवण्याकरिता सामाजिक न्याय विभागाकडे स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात नाही. त्यामुळे झालेल्या बांधकामाच्या दर्जाबाबत सामाजिक न्याय विभागाला तपासणी करता येत नाही. अशाच प्रकारे शासनाकडून मंजूर झालेल्या निधीतून आदिवासी विकास विभागाने त्यांच्या अखत्यारितील आश्रमशाळा व वसतिगृहे बांधकाम व देखभाल दुरुस्तीसाठी स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्ष स्थापन केला आहे, उक्त कक्षाद्वारे आदिवासी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या बांधकामांवर योग्य ती देखरेख करण्यात येत असून त्याद्वारे बांधकामाचा दर्जा तसेच काम पूर्ततेची माहिती यावर नियंत्रण ठेवले जात आहे. त्याच धर्तीवर सामाजिक न्याय विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध बांधकामावर नियंत्रण ठेवून विहित वेळेत कामे पूर्ण करण्याकरिता सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वतंत्र बांधकाम कक्ष स्थापन करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

(८) समितीच्या असेही निदर्शनास आले की, सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती लोकांपर्यत पोहोचत नाहीत, त्यामुळे विविध योजनांसाठी लाभार्थ्यांकडून अर्ज करण्यात येत नाहीत. सामाजिक न्याय विभागाच्या सर्वच योजनांची माहिती लोकापर्यंत तसेच विद्यार्थ्यांपर्यंत ज्या संस्था पोहोचवणार नाहीत, अशा संस्थांवर कारवाई करणे आवश्यक आहे, तसेच शासनाच्या विविध योजनांची प्रसिध्दी होणे अत्यंत महत्वाचे आहे, त्यासाठी या योजना सर्व सामान्य नागरिकांना समजतील त्या भाषेत सर्वसमावेशक एकत्रित करुन पुस्तक स्वरुपात वितरीत कराव्यात. शासनाकडून प्रत्येक जिल्ह्यात प्रसिध्दीकरिता १५ लाखांची तरतूद करण्यात येते. तथापि या घटकाकरिता विविध शासकीय योजना उपलब्ध असूनही व त्यासाठी निधीची तरतूद असूनही लाभार्थ्यांची संख्या अत्यंत अपूरी आहे. त्यामुळे अशा योजना वेळीच राबविल्या जात नसल्याकारणाने निधी अखर्चित राहतो, व असा निधी एक तर शासनाकडे परत केला जातो किंवा इतर योजनांसाठी

वापरला जातो. त्यामुळे ज्या बाबीसाठी निधीची तरतुद केली जाते त्यावर खर्च होत नसल्यामुळे शासनाने राबविले धोरण निष्फळ ठरते. अनुसूचित जातीतील कष्टकरी समाजात पालक अज्ञानी किंवा कमी शिकलेले असल्याने त्यांच्यापर्यंत शासनाच्या या योजनांची माहिती अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे तसेच या योजनांचा प्रसार व प्रचार होण्यासाठी योग्य त्या साधनांची कमतरता असल्यामुळे पोहोचत नाहीत, अनुसूचित जातीच्या लोकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी तसेच योजना शासनाने घोषित केलेल्या लोकांपर्यंत पोहचण्यासाठी सदर योजनांची प्रसिध्दी मोठया प्रमाणात करणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने सदरच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आणि योग्य तो प्रसार व प्रचार होण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावरील शासकीय कार्यालयात जनजागृती करण्यासंदर्भात सर्वंकष शासन निर्णय, निर्गमित करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावा, अशी शिफारस समिती करीत आहे.

(९) नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५ अन्वये अस्पृश्यता पाळणे व ती पाळण्यास उत्तेजन देणे हा गुन्हा समजण्यात आला असून त्यासाठी शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीतील व्यक्तीवर होणाऱ्या अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, १९८९ व सुधारित नियम, १९९५ लागू करण्यात आले. जातीयतेच्या कारणावरुन अत्याचारास बळी पडलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या नागरिकांना अर्थसहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. शासनाने या कायद्याच्या अनुषंगाने सुधारित अधिनियम, २०१५ व नियम २०१६ मध्ये पारीत केले असून नियमांतील तरतूदीनुसार पिडीत व्यक्तींना अर्थसहाय्य देण्यात येते. जातीयतेच्या कारणावरुन अत्याचारास बळी पडलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीतील नागरिकांना नोकरी, जमीन देण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. याबाबत शासन निर्णय सुस्पष्ट असले तरी देखील सदरहू योजनेचा लाभ अत्याचारीत व्यक्तींना वेळीच प्रभावी उपाययोजना नसल्यामुळे मिळत नाही. सदरील योजना अधिक चांगल्या प्रकारे राबविण्याकरिता उपरोक्त अधिनियमात केलेल्या तरतुदींची अंमलबजावणी

प्रभावी व काटेकोरपणे करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी तसेच महाराष्ट्र राज्य वगळता बहुतेक सर्व राज्यात ॲट्रॉसिटीअंतर्गत गुन्ह्यातील आरोपींना शिक्षा होण्यासाठी स्वतंत्र न्यायालये स्थापन झालेली आहेत त्याच धर्तीवर महाराष्ट्रात देखील ॲट्रॉसिटीसंदर्भातील गुन्ह्यांच्या संदर्भात खटले चालविण्यासाठी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्याची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

.

# परिशिष्ट - एक

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या बैठकीसाठी समितीला पुरविण्यात आलेली माहिती.**


समता न्याय एकात्मता
महाराष्ट्र शासन
मा. समिती प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ
अनुसूचित्त जाती कल्याण समिती
यांच्या अध्यक्षतेखाली
महाराष्ट्र विधानमंडळाच्या नव्याने गठीत
अनुसूचित जाती कल्याण समिती समोर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य
विभागाच्या माहितीचे सादरीकरण
दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२१
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई

# १. अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट असलेल्या जातींची अद्यावत यादी

- केंद्र शासनाच्या दि.१० ऑगस्ट१९५० रोजी मा.राष्ट्रपती यांनी घोषित केलेली अनुसूचित जातींची यादी
- महाराष्ट्रातील मागासवर्गीयांची यादी शासनपत्र क्र. संकीर्ण-२००८/ यादी/ प्र.क्र.५५३/ मावक ५, दि.२६ सप्टेंबर, २००८

## महाराष्ट्रातील मागासवर्गीयांची यादी शासनपत्र क्र. संकीर्ण-२००८/यादी/प्र.क्र.५५३/मावक-५,दि.२६ सप्टेंबर, २००८

| अ.क्र. | अनुसूचित जातींची नावे |
|---|---|
| 1 | अगेर |
| 2 | अनमुक |
| 3 | आरेमाला |
| 4 | आरवा माला |
| 5 | बहना ,बहाना, |
| 6 | बाकड, बंट |
| 7 | बलाही , बलाई |
| 8 | बसोर, बुरुड, बांसोर, बांसोडी, बसोड |
| 9 | बेडाजंगम, बुडगा जंगम |
| 10 | बेडर |
| 11 | भांबी, भांभी, असादरु, चामडिया, चमार, चमारी, चांभार, चमगार, हरळया, हराळी, खालपा, माचीगार, मोचीगार, मादर, मादिग, मोची, तेलगू मोची, कामाटी मोची, राणीगार, रोहिदास, नोना, रामनामी, रोहित, समगार, सतनामी, सुरज्यबंशी, सूरज्यरामनामी, समगारा, चर्मकार, परदेशी चामार |
| 12 | भंगी, मेहमर, ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बल्मिकी, करोर, झाडगल्ली, कोरार, झाडमल्ली, हेला |
| 13 | बिंदला |
| 14 | ब्यागरा |
| 15 | चलवारी,चन्नया |
| 16 | चेन्नदासर, होलया दासर, होलेया दासरी |
| 17 | हक्कल, डोक्कलवार |

## महाराष्ट्रातील मागासवर्गीयांची यादी शासनपत्र क्र. संकीर्ण-२००८/यादी/प्र.क्र.५५३/मावक-५,दि.२६ सप्टेंबर, २००८

| अ.क्र. | अनुसूचित जातींची नावे |
|---|---|
| 18 | दोर, कक्कय्या, कंकय्या, डोहोर, |
| 19 | डोम, डुमार |
| 20 | येल्लमवार, येल्लमबंडलु |
| 21 | हलसार, हसलार, हुलसवार, हुलसवार,हलसवार |
| 22 | होलार, व्हलार |
| 23 | होलय, होलेर होलेया होलिया |
| 24 | कैकाडी( अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजुरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा यांत) |
| 25 | कटिया, पथारिया |
| 26 | खंगार, कनेरा, मिरया |
| 27 | खाटिक, चिकवा, चिकवी |
| 28 | कोलूपूल वंडलु |
| 29 | कोरी |
| 30 | लिंगडेर |
| 31 | मादगी |
| 32 | मादिगा |
| 33 | महार, मेहरा, तराळ, धेगु-मेगु |
| 34 | माहयवंशी, धेड, वणकर, मारु- वणकर |
| 35 | माला |
| 36 | माला दासरी |
| 37 | माला हन्नाई |
| 38 | माला जंगम |
| 39 | माला मस्ती |
| 40 | माला साले, नेटकानी |

महाराष्ट्रातील मागासवर्गीयांची यादी शासनपत्र क्र. संकीर्ण-२००८/यादी/प्र.क्र.५५३/मावक-५,दि.२६ सप्टेंबर, २००८

| अ.क्र. | अनुसूचित जातींची नावे |
|---|---|
| 41 | गंडा, गंडी |
| 42 | गरोडा, गारो |
| 43 | घासी, घासीया |
| 44 | हल्लीर |
| 45 | मस्ती |
| 46 | मेंघवाल, मेंधवार |
| 47 | मिठा, अयलवार |
| 48 | मुक्री |
| 49 | नाडिया, हादी |
| 50 | पासी |
| 51 | माला सन्यासी |
| 52 | मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग |
| 53 | मांग गारोडी, मांग-गारुडी |
| 54 | मन्ने |
| 55 | सांसी |
| 56 | शेणवा,चेणवा, सेडमा, रावत |
| 57 | सिंधोल्लू, चिंदोल्लू |
| 58 | तिरगार, तिरबंदा |
| 59 | तुरी |

२. अनुसूचित जातींच्या उमेदवारांची भरती तसेच पदोन्नतीमधील आरक्षण व अनुशेष आणि त्यांना देय असलेल्या सवलती, विविध योजना इत्यादी संबंधातील शासन निर्णय, आदेश परिपत्रकांच्या अद्यावत प्रती

## पदोन्नतीमधील आरक्षण – सा. प्र. वि., महाराष्ट्र शासन

➤महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधीसुचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ नुसार १ हा कायदा आरक्षणासाठी तयार करण्यात आला असून त्याअंतर्गत अनुसूचित जातींसाठी १३% आरक्षण आहे. या शिवाय आर्थिकदृष्टया दुर्बळ घटकासाठी १०टक्के व सामाजिक व शैक्षणिक प्रवर्गासाठी १३ टक्के आरक्षण राखीव ठेवले आहे..

➤या शिवाय आर्थिक दृष्टया दुर्बळ घटकासाठी १०% व सामाजिक व शैक्षणिक प्रवर्गासाठी १३% आरक्षण विहीत केले आहे.

विभाग सरळसेवा विवरणपत्र-1

| अ | | | ब | | | क | | | ड | | | एकूण | | | रिक्त पदांची टक्केवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | अ | ब | क | ड |
| 1701 | 1167 | 534 | 1606 | 1147 | 459 | 21791 | 20007 | 1784 | 4877 | 3244 | 1633 | 29975 | 25565 | 4410 | 31.39 | 28.58 | 8.19 | 14.71 |

विभाग पदोन्नती विवरणपत्र-1

| अ | | | ब | | | क | | | ड | | | एकूण | | | रिक्त पदांची टक्केवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | अ | ब | क | ड |
| 1358 | 908 | 450 | 2034 | 1482 | 552 | 19315 | 16303 | 3012 | 240 | 133 | 105 | 22947 | 18826 | 4121 | 33.14 | 27.14 | 15.59 | 17.96 |

विभाग सरळसेवा व पदोन्नती एकूण

| अ | | | ब | | | क | | | ड | | | एकूण | | | रिक्त पदांची टक्केवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | मंजूर | कार्यरत | रिक्त | अ | ब | क | ड |
| 3059 | 2075 | 984 | 3640 | 2629 | 1011 | 41106 | 36310 | 4796 | 5117 | 3377 | 1738 | 52922 | 44391 | 8531 | 32.17 | 27.77 | 11.67 | 16.12 |

राज्य शासनाच्या शासकीय / निमशासकीय सेवामधील आरक्षण

| राज्य शासनाच्या शासकीय / निमशासकीय सेवामधील आरक्षण | १ | २ |
|---|---|---|
| प्रवर्ग | सरळसेवा | पदोन्नती |
| अनुसूचित जाती | १३% | १३% |
| अनुसूचित जमाती | ७% | ७% |
| निरधिसूचित जमाती (अ) | ३% | ३% |
| भटक्या जमाती (ब) | २.५०% | २.५०% |
| भटक्या जमाती (क) | ३.५०% | ३.५०% |
| भटक्या जमाती (ड) | २% | २% |
| विशेष मागास प्रवर्ग | २% | २% |
| इतर मागासवर्ग | १९% | --- |
| आर्थिक दृष्ट्या दुर्बळ घटक | १०% | |
| सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग** | १३% | --- |
| एकूण आरक्षण | ७५% | --- |
| खुला प्रवर्ग | २५% | |
| एकूण | १००% | ३३% |

** सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणाची अमलबजावणीस सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे.

## मुद्दा क्र.2

समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आस्थापनेवरील गट अ व गट ब संवर्गातील अधिकारी यांची मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे याबाबतची माहिती

| अ.क. | पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त |
|---|---|---|---|---|
| 1 | आयुक्त | 1 | 1 | 0 |
| 2 | अतिरिक्त आयुक्त, समाज कल्याण तथा अध्यक्ष जाप्रप समिती | 7 | 1 | 6 |
| 3 | सह आयुक्त समाज कल्याण | 5 | 2 | 3 |
| 4 | उपायुक्त/ प्रादेशिक उपायुक्त/ सदस्य व तत्सम गट-अ | 53 | 44 | 9 |
| 5 | सहा. आयुक्त व तत्सम गट-अ | 118 | 68 | 50 |
| | एकूण गट अ | 184 | 116 | 68 |
| 6 | समाज कल्याण अधिकारी गट-ब<br>विशेष अधिकारी (शानिशा) समाज कल्याण सेवा गट-ब | 63 | 14 | 49 |
| 7 | गृह प्रमुख गट-ब | 38 | 6 | 32 |
| | एकूण गट ब | 101 | 20 | 81 |
| | एकूण गट अ+ब | 285 | 136 | 149 |

मुद्दा क्र. 2

अनुसूचित जातींच्या उमेदवारांची भरती तसेच पदोन्नतीमधील आरक्षण व अनुशेष आणि त्यांना देय असलेल्या सवलती

समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे यांची माहिती माहे 31 डिसेंबर 2020 अखेर

| अ.क्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | | | भरलेली पदे | | | रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | सरळसेवा | पदोन्नती | एकूण |
| 1 | कार्यालय अधिक्षक सरळसेवा व पदोन्नती भरतीचे प्रमाण 100:0 | 0 | 88 | 88 | 0 | 49 | 49 | 0 | 39 | 39 |
| 2 | वरिष्ठ समाज कल्याण निरिक्षक सरळसेवा व पदोन्नती भरतीचे प्रमाण 25:75 | 10 | 32 | 42 | 8 | 21 | 29 | 2 | 11 | 13 |
| 3 | उच्चश्रेणी लघुलेखक सरळसेवा व पदोन्नती भरतीचे प्रमाण 50:50 | 24 | 24 | 48 | 15 | 5 | 20 | 9 | 19 | 28 |
| 4 | निम्नश्रेणी लघुलेखक सरळसेवा व पदोन्नती भरतीचे प्रमाण 50:50 | 6 | 6 | 12 | 2 | 6 | 8 | 4 | 0 | 4 |
| 5 | गृहपाल सरळसेवा व पदोन्नती भरतीचे प्रमाण 75:25 | 353 | 122 | 475 | 277 | 23 | 300 | 76 | 99 | 175 |
| 6 | समाज कल्याण निरिक्षक सरळसेवा व पदोन्नती भरतीचे प्रमाण 50:50 | 177 | 177 | 354 | 131 | 129 | 260 | 46 | 48 | 94 |
| 7 | मुख्य लिपिक सरळसेवा व पदोन्नती भरतीचे प्रमाण 100:0 | 0 | 64 | 64 | 0 | 44 | 44 | 0 | 20 | 20 |
| 8 | वरिष्ठ लिपिक पदोन्नती भरतीचे प्रमाण 50:50 | 183 | 183 | 366 | 51 | 145 | 196 | 132 | 38 | 170 |
| 9 | लघुटंकलेखक सरळसेवा व पदोन्नती भरतीचे प्रमाण 50:50 | 22 | 21 | 43 | 11 | 5 | 16 | 11 | 16 | 27 |
| 10 | कनिष्ठ लिपिक सरळसेवा व पदोन्नती भरतीचे प्रमाण 50:40:10 | 556 | 370 | 926 | 421 | 173 | 594 | 135 | 197 | 332 |
| 11 | वाहन चालक सरळसेवा व पदोन्नती भरतीचे प्रमाण 75:25 | 68 | 23 | 91 | 24 | 0 | 24 | 44 | 23 | 67 |
| 12 | मुख्याध्यापक प्रथम भरती सरळसेवा परंतु सर्व पदे पदोन्नतीची आहेत प्रमाण 0:100 | 100 | 0 | 100 | 54 | 0 | 54 | 46 | 0 | 46 |
| 13 | सहाय्यक शिक्षक 6 वी ते 8 वी इंग्रजी सरळसेवा भरतीचे प्रमाण 100:0 | 100 | 0 | 100 | 83 | 0 | 83 | 17 | 0 | 17 |
| 14 | सहाय्यक शिक्षक 6 वी ते 8 वी मराठी सरळसेवा भरतीचे प्रमाण 100:0 | 300 | 0 | 300 | 143 | 0 | 143 | 157 | 0 | 157 |
| 15 | सहाय्यक शिक्षक 9 वी ते 10 वी इंग्रजी सरळसेवा भरतीचे प्रमाण 100:0 | 100 | 0 | 100 | 69 | 0 | 69 | 31 | 0 | 31 |
| 16 | सहाय्यक शिक्षक 9 वी ते 10 वी विज्ञान सरळसेवा भरतीचे प्रमाण 100:0 | 200 | 0 | 200 | 93 | 0 | 93 | 107 | 0 | 107 |
| 17 | सहाय्यक ग्रंथपाल सरळसेवा भरतीचे प्रमाण 100:0 | 100 | 0 | 100 | 53 | 0 | 53 | 47 | 0 | 47 |
| 18 | प्रयोगशाळा सहाय्यक सरळसेवा भरतीचे प्रमाण 100:0 | 100 | 0 | 100 | 72 | 0 | 72 | 28 | 0 | 28 |
| | एकूण गट - क | 2399 | 1110 | 3509 | 1507 | 600 | 2107 | 892 | 510 | 1402 |

मुद्दा क्र. 2

समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे

अनुसूचित जाती कर्मचाऱ्यांसाठी राखीव पदे व शिल्लक अनुशेष

| अ.क्र | संवर्ग | एकूण मंजूर पद संख्या | | | प्रत्यक्ष भरलेली पदे | | | विभागातील एकूण रिक्त पदे | अनु.जातीसाठी राखीव पदे (मंजूर पदानुसार 13% ) | | | अनुसूचित जातीची भरलेली पदे | | | अनुसूचित जातीसाठी शिल्लक अनुशेष | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | सरळसेवा | पदोन्नती | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | कार्यालय अधिक्षक | 0 | 88 | 88 | 0 | 49 | 49 | 39 | 0 | 11 | 11 | 0 | 11 | 11 | 0 | 0 | 0 |
| 2 | वरिष्ठ समाज कल्याण निरिक्षक | 10 | 32 | 42 | 8 | 21 | 29 | 13 | 1 | 4 | 5 | 1 | 4 | 5 | 0 | 0 | 0 |
| 3 | उच्चश्रेणी लघुलेखक | 24 | 24 | 48 | 15 | 5 | 20 | 28 | 3 | 3 | 6 | 2 | 1 | 3 | 1 | 2 | 3 |
| 4 | निम्नश्रेणी लघुलेखक | 6 | 6 | 12 | 2 | 6 | 8 | 4 | 1 | 1 | 2 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 1 |
| 5 | गृहपाल सरळसेवा | 353 | 122 | 475 | 277 | 23 | 300 | 175 | 46 | 15 | 61 | 46 | 15 | 61 | 0 | 0 | 0 |
| 6 | समाज कल्याण निरिक्षक | 177 | 177 | 354 | 131 | 129 | 260 | 94 | 23 | 23 | 46 | 23 | 23 | 46 | 0 | 0 | 0 |
| 7 | प्रमुख लिपिक | 0 | 64 | 64 | 0 | 44 | 44 | 20 | 0 | 8 | 8 | 0 | 8 | 8 | 0 | 0 | 0 |
| 9 | वरिष्ठ लिपिक | 183 | 183 | 366 | 51 | 145 | 196 | 170 | 23 | 23 | 46 | 14 | 23 | 37 | 9 | 0 | 9 |
| 10 | लघुटंकलेखक | 22 | 21 | 43 | 11 | 5 | 16 | 27 | 3 | 3 | 6 | 3 | 2 | 5 | 0 | 1 | 1 |
| 11 | कनिष्ठ लिपिक | 556 | 370 | 926 | 421 | 173 | 594 | 332 | 72 | 48 | 120 | 60 | 28 | 88 | 7 | 0 | 7 |
| 12 | वाहन चालक | 68 | 23 | 91 | 24 | 0 | 24 | 67 | 8 | 3 | 11 | 8 | 2 | 10 | 0 | 1 | 1 |
| 13 | मुख्याध्यापक | 100 | 0 | 100 | 54 | 0 | 54 | 46 | 13 | 0 | 13 | 8 | 2 | 10 | 0 | 1 | 1 |
| 14 | सहाय्यक शिक्षक 6 वी 8 वी | 400 | 0 | 400 | 226 | 0 | 226 | 174 | 52 | 0 | 52 | 46 | 0 | 46 | 0 | 6 | 6 |
| 16 | सहाय्यक शिक्षक 9 वी 10 वी | 300 | 0 | 300 | 162 | 0 | 162 | 138 | 26 | 0 | 26 | 26 | 0 | 26 | 0 | 0 | 0 |
| 18 | सहाय्यक संग्रपाल सरळसेवा | 100 | 0 | 100 | 53 | 0 | 53 | 47 | 13 | 0 | 13 | 13 | 0 | 13 | 0 | 0 | 0 |
| 19 | प्रयोगशाळा सहाय्यक | 100 | 0 | 100 | 72 | 0 | 72 | 28 | 13 | 0 | 13 | 13 | 0 | 13 | 0 | 0 | 0 |
| | गट क | 2399 | 1110 | 3509 | 1507 | 600 | 2107 | 1402 | 297 | 142 | 439 | 263 | 120 | 383 | 18 | 11 | 29 |

टिप - सरळसेवा भरतीबाबत वित्त विभाग शासन निर्णय दिनांक 2.6.2015 व दिनांक 15.1.2016 अन्वये निर्बंध आहेत. तसेच सेवानिवृत्ती व स्पर्धापरिक्षेमधून वरिष्ठ पदावर निवड झाल्याने राजीनामा या कारणांमुळे सरळसेवा कोटयातील पदे रिक्त आहेत. पदोन्नती कोटयातील पदभरतीची प्रक्रिया सेवाजेष्ठता यादीनुसार नियमित सुरु आहे.

## अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी विशेष सवलत

१.पदोन्नतीच्या विचारात घेतले जाणारे गोपनिय अभिलेख एक टप्याने वाढवून विचार केला जातो.

२.पदोन्नतीसाठीच्या विभागीय परीक्षेमध्ये एक वाढीव संधी देण्यात येते.

# ४. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राज्य शासन व केंद्र शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती व सद्यस्थिती

## शिष्यवृत्ती आणि निर्वाह भत्ता संबंधित योजना

➢ <u>मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना</u>

- अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती.
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती.
- इयत्ता १० वी च्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती.
- व्यवसायिक पाठयक्रमात संलग्न असणाऱ्या वसतीगृहात राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन.
- राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण देण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती.
- अनुसूचित जातीच्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना.
- वैद्यकीय, तंत्रनिकेतन, कृषी, पशुवैद्यकीय व अभियांत्रिकी, व्यावसायिक पाठयक्रम असणाऱ्या महाविद्यालयात शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना.

## शिष्यवृत्ती आणि निर्वाह भत्ता संबंधित योजना

➢ <u>मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना</u>

- ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मुलींना सावित्रिबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे
- ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मुलींना सावित्रिबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे
- इयत्ता ९वी ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकारची मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना
- अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती.
- महाराष्ट्रातील सैनिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता.
- माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदन करणे
- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मागासवर्गीय मुला /मुलींकरिता मॅट्रीकपूर्व शिक्षण फी व परिक्षा फी योजना
- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन
- इयत्ता १० व १२ वीच्या परीक्षेत विशेष उल्लेखणीय यश मिळविणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मुला मुलींना राजर्षि छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे.

१९

# वसतिगृह आणि शाळा संबंधित योजना

- मागासवर्गीय मुला/मुलींचे शासकीय वसतीगृह
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना
- अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलामुलींकरिता प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक निवासी शाळा सुरु करणे.
- अनुसूचित जातींच्या मुलांमुलीसाठी शाहू,फुले,आंबेडकर निवासी/अनिवासी शाळा
- अनुसूचित जातीच्या मुलामुलींसाठी आश्रमशाळा
- स्वेच्छा संघटनांना चालविलेल्या मागासवर्गीयांच्या वसतीगृहांना मान्यता व सहाय्यक अनुदान देणे (अनुदानीत वसतीगृह)

## भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (अनुसूचित जाती )- केंद्रीय अनुदान

सदर योजना १९६० पासून कार्यान्वित असून केंद्र शासनामार्फत या योजनेमध्ये निधी प्राप्त होतो. सदर निधी खालील सूत्रानुसार उपलब्ध होतो.

राज्य शासनाने या योजनेसाठी केलेला खर्च - राज्य शासनाने सोसावयाचा बांधील खर्चाची रक्कम = केंद्राकडून येणे.

### ➢ राज्याचा बांधील खर्च

मागील पंचवार्षिक योजनेतील शेवटच्या वर्षी या योजनेवर झालेला खर्च हा राज्याच्या पुढील पंचवार्षिक योजनेसाठी बांधील खर्च (Committed Liability) म्हणून केंद्र शासन जाहिर करत असे.

### ➢ केंद्राकडून निधीची मागणी करणेबाबत (सन २०१६-१७) पर्यंत.

- प्रत्येक वर्षी केंद्र शासनाने विहित केलेल्या प्रपत्रामध्ये केंद्र शासनाकडून मागील वर्षी या योजनेवर झालेल्या खर्चामधून राज्याचा बांधील खर्च (Committed Liability) वजा जाता उर्वरीत तरतूदीची मागणी करण्यात येत असे. त्यानुसार सन २०१२-१३ ते २०१६-१७ पर्यंत राज्य शासनाचा वार्षिक हिस्सा
- त्या मध्ये चालू वर्षासाठी या योजनेसाठी किती खर्च येणार आहे याबाबत अंदाजीत (Anticipated) लाभार्थी व खर्च याची माहिति केंद्र शासनास पाठवून चालू आर्थिक वर्षासाठी अग्रीम (Adhoc) केंद्रीय अनुदानाची मागणी केली जात असे.

# भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (अनुसूचित जाती )- केंद्रीय अनुदान

## ➢ केंद्रीय अनुदान सुत्रामधील झालेले बदल (सन २०१७-१८ते २०१९-२०) पर्यंत.

- सन २०१७-१८ पासून राज्याचा बांधील खर्चाच्या सुत्रामध्ये बदल करण्यात आले होते. व त्यानुसार राज्यशासनास केंद्राकडून कोणत्याही स्वरुपाचे केंद्रीय अनुदान सदर योजनेस प्राप्त होत नव्हते.
- यादरम्यान सन २०१७-१८ ते२०१९-२० या कालावधीमध्ये मागील आर्थिक पंचवार्षीक योजना (सन २०११-१२ ते सन २०१६-१७ ) मधील थकीत केंद्रीय अनुदान राज्य शासनाने प्राप्त करुन घेतलेले आहे.
- त्याचप्रमाणे सदर सुत्रात तात्काळ बदल करुन सदर योजनेवरील केद्र- राज्य हिस्सा निश्चीत स्वरुपात करण्याबाबत वेळोवळी राज्यशासनाचे मंत्री कार्यालय, सचिवालय सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण आयुक्तालय यांचेकडून पाठपुरावा करण्यात आलेला आहे. अंतिमत: केंद्र शासनाने राज्य शासनाची मागणी विचारात घेवून दिनांक २३/१२/२०२० रोजी केंद्र राज्य हिस्सा ६०:४० याप्रमाणे निश्चित केलेला आहे.

## ➢ केंद्रीय अनुदान सुधारित सुत्र- सन २०२०-२१ पासून सन २०२५-२६ पर्यंत

- सद्यस्थितीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधील नमूद केलेल्या निकषांनुसार (मागिल तीन वर्षाच्या खर्चाची सरासरी लक्षात घेऊन) चालू वर्षाकरीता सदर योजनेवरील एकूण अपेक्षित मागणी रु.९७१.६५ कोटी एवढी आहे. सुधारीत सुत्रानुसार केंद्र शासनाचा हिस्सा (६०टक्के) प्रमाणे रु. ५८२.३९ कोटी केंद्रीय अनुदान अपेक्षित आहे. तसेच राज्य शासनाचा हिस्सा (४० टक्के प्रमाणे) रु. ३८८.२६ कोटी एवढा देय आहे.
- तथापी, राज्य शासनाने सदर योजनेस रु. ३००.०० कोटी एवढी तरतूद उपलब्ध करुन दिली असून त्यापैकी आजतागायत सदर योजनेवर रु. ३७.४६ कोटीचा लाभ वितरीत करण्याची कार्यवाही चालू आहे.

## शिष्यवृत्ती योजना - सर्वसाधारण माहिती




महाविद्यालयांची संख्या - सुमारे १२०००
विद्यालयांची संख्या - सुमारे १.०८ लक्ष
अभ्यासक्रमांची संख्या -सुमारे १२००+
विविध देय शुल्कांचे प्रकार-१६+

जिल्हे - ३६
प्रवर्ग - अनुसूचित जाती
विद्यार्थी संख्या - सुमारे १० लाख
*(मॅट्रीक पुर्व विद्यार्थी - सुमारे ५.५ लाख*
*व मॅट्रीकोत्तर विद्यार्थी - सुमारे ४.५ लाख )*

## विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना

➢ <u>महाडिबीटी पोर्टलवरील ऑनलाईन योजना</u>

- अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती.
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती.
- इयत्ता १० वी च्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती.
- व्यवसायिक पाठयक्रमात संलग्न असणाऱ्या वसतीगृहात राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन.

➢ <u>ऑफलाईन योजना</u>

- राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण देण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती.
- अनुसूचित जातीच्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना.
- वैद्यकीय, तंत्रनिकेतन, कृषी, पशुवैद्यकीय व अभियांत्रिकी, व्यावसायिक पाठयक्रम असणाऱ्या महाविद्यालयात शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना.

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती

**केंद्र पुरस्कृत**

**योजनेचा उद्देश:** १. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन/उच्च शिक्षण घेता यावे,
२. विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी सन १९६० पासून योजना सुरु करण्यात आली

**शासन निर्णय:**
शासन निर्णय : क्र.साप्रवि-मातंस-२०१८/प्र.क्र.१३८/से-१/३९, दि : १२/१०/२०१८

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय : क्र. ईबीसी-२००३/प्र.क्र.३०१/मावक-२, दि : ०१/११/२००३

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय: क्र. अजाशि-२०१९/प्र.क्र.३४५/शिक्षण-१, दि : १५/०१/२०२०

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय: क्र. ईबीसी-२०१७/प्र.क्र.४०३/शिक्षण-१, दि : ०७/०८/२०१७

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय: क्र. इबीसी-२०१८/प्र.क्र.४८४/शिक्षण-१, दि : ०८/०१/२०१९

**पात्रतेचे निकष :-**
१. विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातला असावा.
२. विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे,
३. विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्या पुढील शिक्षण घेत असलेला असावा
४. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**लाभाचे स्वरुप :-**
१. विद्यार्थ्यांस निर्वाह भत्ता व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतरशुल्क प्रदान,
२. द.म. रु २३० ते रु ४५० या दराने निर्वाह भत्ता
३.वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी द.म. रु. ३८० ते रु १२००

सदर शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज सन २०१८-१९ पासून महाडीबीटी पोर्टल वरून स्वीकारण्यात येत आहेत.

### मागील तीन वर्षातील प्राप्त तरतुद व खर्चाची माहिती-

| अनु क्र | आर्थिक वर्ष | प्राप्त तरतुद (रु. लाखात) | | एकूण खर्च (रु. लाखात) | | एकूण खर्च (रक्कम लाखात) | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (केंद्र हिस्सा) | (राज्य हिस्सा) | (केंद्र हिस्सा) | (राज्य हिस्सा) | | |
| १ | २०१७-१८ | ५०४,९७.९६ | ३८२,९१.७७ | ५०४,९६.२७ | ३७८,९१.७६ | ८८३,८८.०३ | २,२७,४८० |
| २ | २०१८-१९ | १०६४,००.०० | ४६१,००.०० | ८७१,६२.४२ | ४६०,९९.९९ | १३३२,६२.४१ | ३,२३,०८४ |
| ३ | २०१९-२० | १११७,२०.०० | ६००,००.०० | ५५९,२०.९४ | ४९४,१६.०० | १०५३,३६.९४ | ३,७८,४२६ |
| ४ | २०२०-२१ | निरंक * | ३००,००.०० | ०.०० | ३८७५.०० | ३८७५.०० | १५,६२९ |

*टीप : १. सन. २०१८-१९ व २०१९-२० या वर्षातील केंद्र हिस्स्याच्या प्राप्त तरतुदी त्या त्या वर्षाकरिता नसून सन २०१६-१७ पूर्वीचे arrears सन २०१८-१९ व २०१९-२० मध्ये प्राप्त झालेले आहेत.*
*२. चालू वर्षातील केंद्र शासनाच्या सुधारित निकषानुसार सन २०२०-२१ पासून राज्यास ६०: ४० (केंद्र : राज्य) नुसार केंद्र हिस्सा प्राप्त होणार आहे. त्यानुसार सन २०२०-२१ करिता सुमारे रु. ५८२ कोटी प्रस्तावित असुन अद्याप राज्यास अप्राप्त आहे.*

सन २०२०-२१ साठी अर्थसंकल्पीय तरतूद लेखाशीर्ष २२२५-०४९५ रु. ७८० कोटी व लेखाशीर्ष -२२२५-०३५२ रु. १००० कोटी अशी एकूण १७८० कोटी अर्थसंकल्पीत आहे.

## ागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती.

राज्य पुरस्कृत

जनेचा उद्देश:१. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयिन/उच्च शिक्षण घेता यावे.

२. विद्यार्थ्यांचे गळतिचे प्रमाण कमी व्हावे.

ासन निर्णय: सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.इबीसी-२०१६/प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दि : ३१ मार्च, २०१६

पात्रतेचे निकष:

१. विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील असावा.

२. विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाखपेक्षा जास्त असावे, उच्चतम मर्यादा लागू नाही.

३. विद्यार्थी शालांत परीक्षेत्तर व पुढील शिक्षण घेत असलेला असावा,

४. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

लाभाचे स्वरुप: शालांत परीक्षोत्तर शिक्षण घेणा-या अनु. जातीच्या विद्यार्थांना त्यांचे वय विचारात न घेता मान्यता प्राप्त मॅट्रिकोत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबींवरील विहीत केलेले शुल्क इ.

मागील तीन वर्षातील प्राप्त तरतुद व खर्चाची माहिती

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | प्राप्त तरतुद (रु. लाखात) | एकूण खर्च (रु. लाखात) | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| 1 | सन 2017-18 | 212,04.00 | 212,04.00 | 32,503 |
| 2 | सन 2018-19 | 305,74.99 | 305,74.98 | 40,446 |
| 3 | सन 2019-20 | 250,00.00 | 245,79.66 | 40,217 |
| ४ | सन 2020-21 | 75,00.00 | 3,785.00 | 2,761 |

सदर शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज सन २०१८-१९ पासून महाडीबीटी पोर्टल वरून स्वीकारण्यात येत आहेत. सन २०२०-२१ साठी अर्थसंकल्पीय तरतूद रु. २५०.०० कोटी.

## इयत्ता १० वी च्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती.

राज्य पुरस्कृत

**योजनेचा उद्देश :** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचा दर्जा सुधारावा व त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, तसेच सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्पर्धेमध्ये ते टिकुन राहावेत. यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या दृष्टीने ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

**शासन निर्णय :** सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय : क्र. ईबीसी-२००३/प्र.क्र.११५/मावक-२, दि : ११/०६/२००३

**पात्रतेचे निकष:** इयत्ता १० वी मध्ये ७५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणा-या अनुसूचित जातीच्या मुला-मुलीसाठी इ. ११ वी व १२ वी मध्ये शिकणा-या कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयातील अनु. जातीच्या मुला-मुलींसाठी आहे.

**लाभाचे स्वरुप:** १. ११ वी रु. ३००/- दरमहा (१० महिन्यासाठी रु.३०००/-)

२. १२ वी रु. ३००/- दरमहा (१० महिन्यासाठी रु.३०००/-)

मागील तीन वर्षातील प्राप्त तरतुद व खर्चाची माहिती-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | प्राप्त तरतुद (रु. लाखात) | एकूण खर्च (रु. लाखात) | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०१७-१८ | ६९०.४२ | ६९०.४२ | २३०१४ |
| २ | सन २०१८-१९ | ८९६.०० | ८९६.५३ | २७२१८ |
| ३ | सन २०१९-२० | ५२२.३३ | ५२२.३३ | १७४११ |
| ४ | सन २०२०-२१ | २४०.०० | २१.५७ | ७१९ |

सन २०२०-२१ साठी अर्थसंकल्पीय तरतूद रु. ८.०० कोटी.

सदर शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज सन २०१८-१९ पासून महाडीबीटी पोर्टल वरून स्वीकारण्यात येत आहेत.

## व्यवसायिक पाठयक्रमात संलग्न असणाऱ्या वसतीगृहात राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन.

राज्य पुरस्कृत

**योजनेचा उद्देश:** वैद्यकिय, अभियांत्रीकी, कृषी इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमातील महाविद्यायांमध्ये शिक्षण घेणा-या अनु.जातीमधील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेतंर्गत वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता दिला जातो.

**शासन निर्णय:** सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय : क्र. ईबीसी-२००३/प्र.क्र.३११/मावक२, दि : ०९/०६/२००३

**पात्रतेचे निकष:** १. विद्यार्थी व्यावसायीक पाठ्यक्रमात प्रवेशीत असावा.
२. विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्ती धारक असावा.
३. भा.स.शि.योजनेच्या उत्पन्न मर्यादे प्रमाणे. (रु.२.५ लाख पेक्षा कमी)

**लाभाचे स्वरुप:**
१. सदर निर्वाहभत्यातुन व्यावसायिक पाठयक्रमाची पुस्तके, स्टेशनरी, निवास, भोजन, इत्यादी बाबींचा खर्च भागविण्यात येतो
२. व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न असणा-या महाविद्यालयाच्या वसतिगृहात, शासकिय वसतिगृहात, व इतर वसतिगृहात राहतात अशा विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती व्यतिरिक्त या योजनेतंर्गत निर्वाह भत्ता देण्यात येतो.

मागील तीन वर्षातील प्राप्त तरतुद व खर्चाची माहिती-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | प्राप्त तरतुद (रु. लाखात) | एकूण खर्च (रु. लाखात) | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०१७-१८ | ३७५.२४ | ५२.६९ | १०८८ |
| २ | सन २०१८-१९ | २००.०० | १२४.६८ | ९९९० |
| ३ | सन २०१९-२० | २००.०० | १९९.९९ | ४००८ |
| ४ | सन २०२०-२१ | ६०.०० | ६०.०० | २३२ |

| अभ्यासक्रम कालावधी | शासकीय वसतिगृहांमध्ये राहणा-या विद्यार्थ्यांसाठी | शासकीय वसतिगृहासाठी पात्र ठरलेल्या परंतु शासकीय वसतीगृहांमध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी |
|---|---|---|
| ४ ते ५ वर्षे | दरमहा रु. ७०० /- | दरमहा रु. ७०० / |
| २ ते ३ वर्षे | दरमहा रु. ५०० /- | दरमहा रु. ५०० /- (फक्त २ वर्षासाठी) |

सन २०२०-२१ साठी अर्थसंकल्पीय तरतूद रु. २.०० कोटी.

सदर शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज सन २०१८-१९ पासून महाडीबीटी पोर्टल वरुन स्वीकारण्यात येत आहेत.

## राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण देण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती.

राज्य पुरस्कृत

**योजनेचा उद्देश:** अनु. जाती व नवबौध्द घटकांतील १०० अनुसूचित जाती / नवबौध्द विदयार्थ्यांना IIM,IIT,NIT,IISER,IIIT,IIIM या सारख्या देश पातळीवरील संस्थांमध्ये शिक्षण घेण्याची संधी मिळावी या उद्देशाने ही योजना सन २००३-०४ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

**शासन निर्णय :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र.४०२/शिक्षण-१, दि : ०८/११/२०१७

**प्रमुख अटी :** १. विद्यार्थी अनुसूचित व नवबौध्द जातीचा असावा व महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.
२. कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ६.०० लाखपर्यंत असावे.
३.विद्यार्थी या योजनेसाठी शासन निर्णय दि. ८ नोव्हेंबर, २०१७ सोबत जोडलेल्या शासन परिशिष्ट ब अन्वये महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या संस्थेत प्रवेशित असावा. (उदा. IIM,IIT,NIT,IISER,IIIT,IIIM).
४. सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी इ.१० वी १२ वी ची परिक्षा मंडळ महाराष्ट्र राज्य माध्यमिक बोर्ड / केंद्रीय बोर्ड(CBSC) यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या माध्यमिक परिक्षांमध्ये किमान ५५ % गुण मिळवून उत्तीर्ण झालेले असावे.

**लाभाचे स्वरुप :** १. संस्थेचे आकारणी केलेले शैक्षणिक शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्क.
२.क्रमिक पुस्तके रु ५०००/- व शैक्षणिक साहित्य रु ५०००/- यांच्या खर्चासाठी प्रतिवर्षी एकूण रु.१०,०००/-

### मागील तीन वर्षातील प्राप्त तरतुद व खर्चाची माहिती-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | प्राप्त तरतुद (रु. लाखात) | एकूण खर्च (रु. लाखात) | लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०१७-१८ | ६६०.०० | ३१३.०० | २२६ |
| २ | सन २०१८-१९ | ६६०.०० | ३८४.०० | १९१ |
| ३ | सन २०१९-२० | १०००.०० | ३३४.३७ | १६६ |
| ४ | सन २०२०-२१ | १५०.०० | १५०.०० | ४० |

सन २०२०-२१ साठी अर्थसंकल्पीय तरतूद रु.५.०० कोटी

# अनुसूचित जातीच्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना

राज्य पुरस्कृत

**योजनेचा उद्देश:** अनु. जातीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता असुनही केवळ आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. अनु. जातीच्या मुलामुलींना परदेशात शिक्षणात संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा या उददेशाने सदर योजना सुरु करण्यात आली.

**प्रमुख अटी :**

१. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी व अनु. जाती/नवबौध्द असावा.

२. विद्यार्थ्याचे वय पदव्युत्तर पदवी करिता ३५ व पीएचडी करिता वय ४० पेक्षा जास्तनसावे.

३. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ६.०० लाखापेक्षा जास्त नसावे.

४. परदेशातील QS top३०० World Ranking विद्यापिठात प्रवेश घेतलेला असावा.

५. परदेशातील विद्यापिठ हे मान्यताप्राप्त विद्यापिठ असावे.

६. QS top १०० world ranking मध्ये असणा-या परदेशी विद्यापीठांमध्ये तसेच लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न मर्यादा लागू राहणार नाही.

७. अनु.जातीच्या विद्यार्थ्यांना PhD अभ्यासक्रमाचा कालावधी कमाल ०४ वर्ष किंवा व पदव्युत्तर पदवी करिता कमाल ०३ वर्ष किंवा यापेक्षा कमी असलेला प्रत्यक्ष कालावधी ग्राहय धरावा .

८. ज्या विदयार्थ्यांनी यापुर्वी परदेशात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी योजनेचा लाभ घेतलेला आहे, अशा विदयार्थ्यांना सन २०१८-१९ पासुन पीएचडी अभ्यासक्रमासाठी पात्र ठरविण्यात आलेले आहे.

| अ.क्र | निवड वर्ष | निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रत्यक्ष प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | सन २०१७-१८ | ५० | ४१ |
| २ | सन २०१८-१९ | ७५ | ६६ |
| ३ | सन २०१९-२० | ७५ | ६५ |
| ४ | सन २०२०-२१ | ७५ | १९ |

**लाभाचे स्वरुप :** १. विद्यापिठाने प्रमाणित केलेला शिक्षण फी ची पुर्ण रक्कम व इतर खर्च मंजूर करण्यात येतो.

२.विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता अमेरिका व इतर राष्ट्रासांठी यु.एस. डॉलर १५४०० तर यु.के.साठी पौंड ९९०० इतका अदा करण्यात येतो.

३.विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी यू.एस.ए. व इतर देशांसाठी यु.एस.डी. १५०० व यु.के.साठ पौंड ११०० इतके देण्यात येतात. पुस्तके, अभ्यासदौरा इत्यादी खर्चाचा यात समावेश आहे.

४.केंद्र शासनाच्या नॅशनल ओव्हरसीज शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत लागू करण्यात आलेली इतरफी,आरोग्य विमा आणि व्हिसा शुल्क

५.विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम संपल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च

मागील तीन वर्षातील प्राप्त तरतुद व खर्चाची माहिती-

| अ.क्र | आर्थिक वर्ष | प्राप्त तरतुद (रु. लाखात) | एकूण खर्च (रु. लाखात) | लाभार्थी विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०१७-१८ | ५५००.०० | २६०३.३५ | १५२ |
| २ | सन २०१८-१९ | ५४९९.९९ | ३२००.०० | १५२ |
| ३ | सन २०१९-२० | ५०००.०० | ३५००.०० | १८१ |
| ४ | सन २०२०-२१ | २४००.०० | १८००.०० | १०९ |

शासन निर्णय : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय : क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र.२८८/शिक्षण-१, दि : २७/०६/२०१७

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता पुस्तकपेढी योजना

केंद्र + राज्य पुरस्कृत

**योजनेचा उद्देश:** वैद्यकीय, तंत्रशिक्षण, कृषी,पशुवैद्यकिय व अभियांत्रीकी,सी.ए., एम.बी.ए.व विधी अभ्यासक्रमासाची पुस्तके महाग असल्याने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना पुस्तके घेण्यामध्ये आर्थिक अडचणी निर्माण होऊ नये म्हणुन सन १९७८-७९ पासून ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

**शासन निर्णय :** दि ०१/११/२००३

**योजनेच्या प्रमुख अटी :**

- विद्यार्थी हा अनुसूचित जातीचा असावा.
- विद्यार्थी जाती वैद्यकीय, तंत्रशिक्षण, कृषी,पशुवैद्यकिय व अभियांत्रीकी, सी.ए., एम.बी.ए. व विधी अभ्यासक्रमात शिकत असणारा असावा.
- विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्ती धारक असावा

**लाभाचे स्वरुप :**

- वैद्यकीय व अभियांत्रीकीच्या दोन विद्यार्थ्यामागे १ संच आणि रु. ७५००/-
- कृषी पदवीच्या विद्यार्थ्यासाठी दोन विद्यार्थ्यामागे १ संच आणि रु. ४५००/-
- पशुवैद्यकिय च्या विद्यार्थ्यासाठीदोन विद्यार्थ्यामागे १ संच आणि रु. ५०००/-
- तंत्रशिक्षण च्या विद्यार्थ्यासाठी दोन विद्यार्थ्यामागे १ संच आणि रु. २४००/-
- CA,MBA,LAW अभ्यासक्रमासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे १ संच व रु.५००० /-

मागील तीन वर्षातील प्राप्त तरतुद व खर्चाची माहिती-

| अनु क्र | आर्थिक वर्ष | प्राप्त तरतूद (रु. लाखात) | खर्च (रु.लाखात) | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०१७-१८ | ४२२.३० | २१७.९७ | ९२१८ |
| २ | सन २०१८-१९ | ३०७.५२ | २०९.०७ | ८७१८ |
| ३ | सन २०१९-२० | निरंक | निरंक | निरंक |
| ४ | सन २०२०-२१ | निरंक | निरंक | निरंक |

*टीप : सदर योजना जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत राज्य हिस्सा ५०% व केंद्र हिस्सा ५० % असुन सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये केंद्र हिस्सा प्राप्त न झाल्यामुळे तरतूद अप्राप्त आहे.*

## विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मॅट्रिकपुर्व शिष्यवृत्ती योजना

### मॅट्रिकपुर्व शिष्यवृत्ती योजना

- ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मुलींना सावित्रिबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे
- ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मुलींना सावित्रिबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे
- इयत्ता ९वी ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकारची मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना
- अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती.
- महाराष्ट्रातील सैनिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता.
- माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदन करणे
- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मागासवर्गीय मुला /मुलींकरिता मॅट्रीकपूर्व शिक्षण फी व परिक्षा फी योजना
- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन
- इयत्ता १० व १२ वीच्या परीक्षेत विशेष उल्लेखणीय यश मिळविणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मुला मुलींना राजर्षि छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे.

## ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मुलींना सावित्रिबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे

**राज्य पुरस्कृत**

**योजनेचा उद्देश:** इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणा-या मागासवर्गीय मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उद्‌शाने अनुक्रमे सन १९९६ व २००३ पासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना व राज्य योजना द्वारे निधी प्राप्त होतो.

**शासन निर्णय:** सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय : क्र. ईबीसी-२००३/प्र.क्र.४१७/मावक-२, दि : ३१/०३/२००५

मागील तीन वर्षातील प्राप्त तरतुद व खर्चाची माहिती-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | तरतूद (रु. लाखात) | खर्च लाखात | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | सन 2017-18 | २५८०.२२ | २०१८.०० | २६९०६६ |
| 2 | सन 2018-19 | २२००.१३ | १७८६.३९ | २३८१८५ |
| 3 | सन 2019-20 | २०१२.३७ | १४५२.५१ | १९३६०० |

**प्रमुख अटी :** १.उत्पन्न व गुणांची अट नाही.
२. विदयार्थ्यांना अर्ज करण्याची आवश्यकता नाही
३. शाळेचे मुख्याध्यापकामार्फत एकत्रित प्रस्ताव सादर करणे आवश्यक.

**लाभाचे स्वरुप :** १. इयत्ता ५ वी ते ७ वी दरमहा ६०/- रुपये (१० महिन्यासाठी ६००/-)
२. इयत्ता ८ वी ते १० वी दरमहा १००/- रुपये (१० महिन्यासाठी १०००/-)

❖ सदर योजना सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात राज्य शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने विकसित केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन राबविण्यांची कार्यप्रणाली सुरु आहे.

| क्र | योजनेचे नाव | सन २०२०-२०२१ साठी अर्थसंकल्पीय तरतूद (रु.लाखात) |
|---|---|---|
| 1 | अनुदानित बसतिगृह | १९४,२१.२४ |
| 2 | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मॅट्रीकपूर्व शिक्षणफी व परिक्षाफी प्रतिपुर्ती योजना | २,४२.०० |
| 3 | माध्यमिक शाळेतील (5 वी ते 10 वी ) अनु.जाती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | १,६१.०० |
| 4 | 5वी ते ७ वी मधील अनु.जाती मुलींसाठी सावित्रिबाई फुले शिष्यवृत्ती | १,६७.०० |
| 5 | बालवाड्या व संस्कार केंद्र | ०.७६ |
| | एकूण अर्थसंकल्पीय तरतूद | २००,००.०० |

**सन २०२०-२१ साठी इ. ८ वी ते १० साठी अर्थसंकल्पीय तरतूद रु १८.८४ कोटी**

## इयत्ता ९वी ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकारची मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना

**केंद्र व राज्य पुरस्कृत**

**योजनेचा उद्देश:**

१. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी केंद्र शासनाने इ. ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरु केली आहे.

२. सदरहू योजना ही राज्यात सन २०१३-१४ पासून लागू करण्यात आलेली आहे.

**शासन निर्णय :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय : क्र. इबीसी-२०१२/प्र.क्र.१५१/शिक्षण-१, दि : ०४/१०/२०१३

**लाभाचे स्वरुप :**

१. वसतिगृहात राहणारे - दरमहा ३५०/- रुपये (१० महिन्यासाठी)

२. पुस्तके व तदर्थ अनुदान वार्षिक रु.१०००/-

३. वसतिगृहात न राहणारे दरमहा १५०/-रु.(१० महिन्यासाठी), पुस्तके अनुदान वार्षिक रु. ७५०/-

४. दिव्यांग विदयार्थ्यांसाठी दरमहा १६०/- रुपये

५. मंदबुध्दी विद्यार्थ्यांकरिता दरमहा २४०/- रुपये

**योजनेच्या प्रमुख अटी :**

१. सदर योजना शासकिय मान्यता प्राप्त शाळेत शिकत असणा-या विद्यार्थ्यांस लागू राहिल

२. विद्यार्थी हा अनु. जाती प्रर्वगातला असावा

शासकीय .रोजीच्या शासन निर्णयाव्दारे स्वाधार योजना अंमलात आली २०१७ जानेवारी ६ दिनांक ,२-शिक्षण वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतीगृहात प्रवेश नमिळालेल्या शासकीय / भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या ,तलेल्या तसेच निवासवसतीगृहात प्रवेश न घे वी नंतरच्या व्यवसायिक तसेच १२ वी तसेच इयत्ता १२ वी व ११ अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांपैकी इयत्ता बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयातमध्ये प्रवेश मिळालेल्या शिक्षण संस्थां / निर्वाह ,शैक्षणिक साहित्य ,निवास ,विद्यार्थ्यांना मागासवर्गीय शासकीय वसतीगृहातील मुलामुलींप्रमाणे भोजन उपलब्ध करून घेण्यासाठी :भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वतही योजना आहे.

या योजनेमध्ये मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरीचिंचवड-, नागपुर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम रू ६००००.आहे तर इतर महसुल विभागीय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम रू ५१०००.आहे तर इतर जिल्हयाच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम रू ४३०००.आहे या . रक्कमेव्यतिरिक्त वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रुव अन्य शाखेतील -/५००० . -/२०००.विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रुइतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरुपात देण्यात येईल.

महानगरपालिकेच्या हद्दीपासूनशिक्षण संस्थेत शिकत /परिसरात असलेल्या महाविद्यालयात .मी.कि ५ .असलेल विद्यार्थीसुध्दा या योनजेचा लाभ मिळण्यास पात्र असतील सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांस कमीत कमी .टक्के गुण प्राप्त असावेत ५०

तथापी स्वाधार योजनेची व्याप्तीप्रसार व सदर योजनेस मिळणारा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लक्षात ,प्रचार , तसेच तालुकास्तरावरील .करण्यात यावी .मी.कि २० मर्यादा वाढवून .मी.कि ५ घेता सदर योजनेसाठी असणारी माज कल्याण आयुकविद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू करण्याबाबत स◌ालयामार्फत प्रस्ताव पत्र क्र ,३८७. अन्वये ०३.०३.२०२० दिनांक शासनास सादर करण्यात आलेला आहे.

(रूपये कोटीत)

| क्र. | वर्ष | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|
| १ | १९-२०१८ | २१६५१ | ८३.९८ |
| २ | २०-२०१९ | १७१०० | ५७.५५ |
| ३ | २१-२०२० | *२५८३ | ७४.९६ |

सदर योजना ही स्वाधार योजना नसून ती इयत्ता वी १०मध्ये ७५ % व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इ. ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे अशी योजना आहे. सदर योजनेंतर्गत सन २००३-०४ पासून खालील प्रमाणे विद्यार्थ्यांस लाभ देण्यांत येतो.

| | इयत्ता | शिष्यवृत्ती दर | कालावधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| अ | इ.११ वी. | रु. ३००/- दरमहा | दहा महिने | रु.३०००/- |
| ब | इ.१२ वी. | रु. ३००/- दरमहा | दहा महिने | रु.३०००/- |

सबब, शिष्यवृत्ती दरामध्ये वाढ करणेसाठी आयुक्तालयाचे पत्र क्र. २२१०, दि. २५/८/२०२१ अन्वये खालील प्रमाणे दरामध्ये वाढ करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.

| | इयत्ता | शिष्यवृत्ती दर | कालावधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| अ | इ.११ वी. | रु. ५५०/- दरमहा | दहा महिने | रु.५५००/- |
| ब | इ.१२ वी. | रु. ५५०/- दरमहा | दहा महिने | रु.५५००/- |

- सन २०१८या २०-२०१९व १९- आपण वर्षातील विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने सदर आकडेवारी तपासून समितीला माहिती देण्यात यावी .

- इयत्ता वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित ११ वी च्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता १० जातीच्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीयोजना ही सन २०१८-१९ पासून महाडीबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज स्विकारले जातात. महाडीबीटी पोर्टल वरील विद्यार्थ्यांच्या अर्जांची सद्यस्थिती खालील प्रमाणे-

| वर्ष | नोंदणीकृत अर्ज संख्या | पात्र अर्ज संख्या |
|---|---|---|
| २०१८-१९ | २३३३९ | १८३३३ |
| २०१९-२० | १९६७१ | १७३३८ |
| २०२०-२१ | २१९५० | १९३८५ |

- सदर योजना सन २०१८-१९ या वर्षापासून राज्य शासनाच्या महाडीबीटी प्रणालीवरुन राबविण्यांत येत आहे. त्यानुसार सदर योजनेचा लाभ हा डीबीटी तत्वावरती वितरीत करण्यांत येत आहे. या करिता विद्यार्थ्यांने आपले आधार संबंधीत बँकेच्या खात्यासोबत संलग्नीकृत करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१८-१९ हे वर्ष सदर प्रणालीचे प्रारंभिक वर्ष असल्याने सदर पोर्टलबाबत विद्यार्थी, महाविद्यालय व विद्यार्थ्यांचे पालक यांच्यामध्ये मोठया प्रमाणात योजनेचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याकरीता प्रसिध्दी करण्यांत आली होती. त्यानुसार राज्यभरातून सन २०१८-१९ या वर्षाकरीता २३३३९ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १८३३३ अर्ज पात्र झाले होते. या दरम्यान महाडीबीटीच्या निकषानुसार ब-याच विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार संलग्नीकृत करावयाचे होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांना संबंधीत बँक खात्याशी वेळोवेळी पाठपुरावा करुन आधार संलग्नीकृत बँक खाते करण्यांत येत होते. सन २०१९-२० मध्ये सदर प्रक्रिया ही थोडीफार किचकट असल्याची जनसामान्यांमध्ये ऑनलाईन प्रणालीस मिश्र प्रतीसाद मिळू लागला.
- तथापी, सदर बाब तात्काळ निदर्शनास येताच विभागांने, आयुक्तालय, समाज कल्याण व सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी सदर प्रक्रिया सुलभ करण्यास्तव विविध ऑनलाईन तसेच प्रत्यक्ष उपक्रम राबविले. त्याच प्रमाणे सदर प्रक्रियेबाबत राज्य शसनच्या माहिती व तंत्रज्ञान विभाग व संबंधीत तांत्रिक कक्षास तात्काळ तक्रार निवारण व मदतकक्ष स्थापन करुन सन २०२०-२१ मध्ये पुनश्चः अर्ज नोंदणी व प्रत्यक्ष लाभ

| | | |
|---|---|---|
| | | वितरणामध्ये वाढ झाली असल्याचे दिसून येत आहे. याच प्रमाणे चालू वर्ष २०२१-२२ मध्ये देखील विभागामार्फत अर्ज नोंदणी वाढविण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न करण्यांत येत आहे. |
| | • व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये आयआयटी, आयआयएस अशा संस्थामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत भरीव वाढ करण्याची गरज आहे. | • अनु. जाती व नवबौध्द घटकातील १०० अनुसूचित जाती / नवबौध्द विद्यार्थ्यांना IIM, IIT, NIT, IISER, IIIT, IIIM या सारख्या देशी पातळीवरील संस्थांमध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांसाठी राज्यातील १०० अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण देण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना राबविण्यांत येते.<br>• सदर योजनेंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेने ठरविलेले परिक्षा शुल्क, शैक्षणिक शुल्क, नोंदणी शुल्क, जिमखाना, ग्रंथालय, संगणक शुल्क व विकास निधी इत्यादी शुल्क १०० टक्के देण्यांत येते. तसेच विद्यार्थ्यांच्या पुस्तकांसाठी रु. ५०००/- व शैक्षणिक साहित्यासाठी रु. ५०००/- असे एकूण रुपये-१०,०००/- प्रतीवर्षी देण्यांत येतात.<br>• सदर रक्कमेत महागाई निर्देशांकानुसार वाढ करुन सदर बाबींसाठी प्रत्येकी रक्कम रुपये-२५,०००/- व एकत्रित रक्कम रुपये-५०,०००/- असे प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यास मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयाचे पत्र क्र. २२०८, दि. २६/८/२०२१ नुसार शासनास सादर करण्यांत आलेला आहे. |
| ३ | अनुसूचित विद्यार्थ्यांकरिता पुस्तक पेढी योजना | |
| | • राज्यात सर्व जिल्ह्यात पुस्तक पेढी योजनेसाठी तरतूद करण्यात यावी. | • शासन निर्णय दि. ५ जानेवारी, २००५ व त्यासोबतच्या केंद्र शासनाच्या दि. १ एप्रिल, २००५ च्या मार्गदर्शक सूचनानुसार भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषि, पशुवैद्यकीय व तंत्र निकेतन व विधी अभ्यासक्रमातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता "ग्रंथपेढया" ही योजना (केंद्र हिस्सा ५०%) लेखाशिर्ष- (२२२५-०५६६) ३१- सहाय्यक अनुदान व जिल्हा वार्षिक योजना (राज्य हिस्सा ५०%) लेखाशिर्ष (NN210006) या प्रमाणात राविण्यांत येते.<br>• सदर योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असूनही केंद्र स्तरावर स्वतंत्र योजना नसुन या योजनेचा समावेश भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गतच करण्यात येतो. त्यानुसार प्रत्येक वर्षी केंद्रीय अनुदान प्राप्त करुन घेण्यास्तव केंद्र शासनास राज्य शासनाकडून प्रस्तव पाठविण्यांत येतो. सदर प्रस्तावामध्ये पुस्तकपेढी या योजनेवरील मागणी देखील करण्यात येते. मात्र केंद्र शासनाने भारत सरकार मॅट्रीकोत्तर योजनेच्य निकषांमध्ये सन २०१७-१८ पासून बदल प्रस्तावीत केले होते. यामध्ये प्रामुख्याने केंद्र शासनाचा हिस्सा अत्यल्प करण्यात आला होता व संपूर्णत: योजनेचा आर्थिक भार राज्य शासनास सोसावा लागणार होता. सदर बाब लक्षात घेता सामाजिक न्याय व विशेष् सहाय्य विभाग व समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांनी सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीत वेळोवेळी केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, यांचेशी समन्वय साधून व याबाबत प्रखर पाठपुरावा करुन अखेरीस माहे मार्च, २०२१ मध्ये केंद्र शासनाने सदर योजनेस ६० (केंद्र हिस्सा) : ४० (राज्य हिस्सा) या प्रमाणात बांधील खर्च निश्चित केला आहे.<br>• त्यानुसार पुस्तकपेढी ही योजना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत असल्याने या योजनेंतर्गत लेखाशिर्ष (२२२५-०५६६) (केंद्र हिस्सा ५०%) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी रक्कम |

<table>
<tr><td></td><td></td><td>रुपये- १८७.८४ लाख एवढी तरतूद प्रस्तावित करण्यांत आलेली होती. तथापि शासनस्तरावरुन सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी रक्कम रुपये- ०.०१ लाख इतकी नाममात्र तरतूद अर्थसंकल्पीत करण्यांत आलेली आहे. तथापी, सदर तरतूद बीडीएसवर अप्राप्त आहे. सदर योजनेंतर्गत वाढीव तरतूद मागणीचा प्रस्ताव शासनास आयुक्तालयाचे पत्र क्र. २२०९, दि. २६/८/२०२१ रोजी सादर करण्यांत आलेला आहे. त्याच प्रमाणे चालू वर्ष २०२१-२२ करिता सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व प्रादेशिक उपायुक्त, यांचेकडून सदर योजनेकरीता तरतूद मागणी करणेकीरता आयुक्तालयाकडून दिनांक २६/८/२०२१रोजीच्या पत्रान्वये कळविण्यांत आले आहे.</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना</td></tr>
<tr><td></td><td>• सन २०१९या आर्थिक वर् २०२०-षात कमी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिल्याने रक्कम अखर्चित राहिलीत्याबाबतची . कारणे काय आहेत व सदर योजनेत नंतर शिष्यवृत्तीच्या २००३रक्कमेत अद्याप वाढ केल्याचे दिसून येत नाही.</td><td>इ. ५ वी ते ७ वी व इ. ८ वी ते १० मध्ये शिकणा-या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने सन १९९६ व सन २००३ पासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यांत आलेली आहे. सदर योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना व राज्य योजनाव्दारे निधी प्राप्त होतो.<br>या योजनेच्या लाभाचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.<br>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>इयत्ता</th><th>शिष्यवृत्ती दर</th><th>कालावधी</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>१</td><td>इ.५ वी. ते ७ वी.</td><td>रु. ६०/- दरमहा</td><td>दहा महिने</td><td>रु.६००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>इ. ८ वी. ते १० वी</td><td>रु. १००/- दरमहा</td><td>दहा महिने</td><td>रु.१०००/-</td></tr>
</table>
सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये सदर योजनेवर जिल्हावार्षिक योजना व राज्य योजनेवर रक्कम रु. २०१२.३७ लाख इतकी तरतूद मंजूर होती त्यापैकी रु. १४५२.५१ लाख इतका तरतूद खर्च झालेली आहे. सदर योजनेंतर्गत १,९३,६०० लाभार्थ्यांना लाभ देण्यांत आलेला आहे. विद्यार्थीनींचे परिपूर्ण अर्ज कमी प्रमाणात प्राप्त झाल्यामुळे मंजूर तरतूदीच्या प्रमाणात सन २०१९-२० या आर्थिक वर्षात खर्च न झाल्याने उर्वरीत रक्कम अखर्चित राहिली.<br>सदर योजनेत विद्यार्थीची ७५ टक्के उपस्थिती होत नाही. गळतीचे प्रमाणे असते. तसेच सन२०१९-२० मध्ये कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शाळा ऑनलाईन असल्याने शिक्षकांना पालकांकडून / विद्यार्थ्यांकडून कागदपत्रे प्राप्त करुन घेण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. तसेच सदर योजनेवर जिल्हा वार्षिक योजनेतून खर्च होत असल्याने राज्य शासनाचा निधी अखर्चित राहतो.</td></tr>
<tr><td></td><td>• शिष्यवृत्तीच्या रक्कमेत वाढ करण्याची गरज आहे.</td><td>• सदर योजनेचे शिष्यवृत्तीचे दर हे सन २००३ पासूनचे असून ते खालील प्रमाणे आहेत.<br>या योजनेच्या लाभाचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.<br>
<table>
<tr><th>क्र.</th><th>इयत्ता</th><th>शिष्यवृत्ती दर</th><th>कालावधी</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>१</td><td>इ.५ वी. ते ७ वी.</td><td>रु. ६०/- दरमहा</td><td>दहा महिने</td><td>रु.६००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>इ. ८ वी. ते १० वी</td><td>रु. १००/- दरमहा</td><td>दहा महिने</td><td>रु.१०००/-</td></tr>
</table></td></tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>सबब, शिष्यवृत्ती दरामध्ये महागाई निर्देशांकानुसार वाढ करणेसाठी आयुक्तालयाचे पत्र क्र. २२१०, दि. २५/८/२०२१ अन्वये खालील प्रमाणे दरामध्ये वाढ करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>इयत्ता</th><th>शिष्यवृत्ती दर</th><th>कालावधी</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>१</td><td>इ.५ वी. ते ७ वी.</td><td>रु. १५०/- दरमहा</td><td>दहा महिने</td><td>रु.१५००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>इ. ८ वी. ते १० वी</td><td>रु. २२५/- दरमहा</td><td>दहा महिने</td><td>रु.२२५०/-</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>५</td>
<td colspan="2">अस्वच्छ व्यावसायातील पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>• सदर योजनेस मागील ३ वर्षापासून केंद्र शासनाचा निधी मिळाला नाही .याबाबत पाठपुरावा करण्याची गरज आहे.</td>
<td>• अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या इ.१ ली ते १० वीत शिकत असलेल्या पाल्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती देण्याची योजना केंद्र व राज्य शासनाच्या ५०:५० टक्के अर्थसहाय्याने राबविण्यांत येत आहे. सदर योजनेसाठी सन २०१८-१९ करीताचे केंद्रीय अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्तालयाचे पत्र क्र.४२९५, दि. १२/३/२०२० अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ करीता तरतूद उपलब्ध करुन देणेबाबत शासनास सादर करणेसाठी आयुक्तालयातील नियोजन शाखेस अनुक्रमे आठमाही अंदाजपत्रक दि.१०/१२/२०२०, व सन २०२१-२२ चे अंदपजपत्रक दि.२३/१०/२०२०रोजी प्रस्ताव सादर करण्यांत आलेले आहेत.</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>सन २०१९करीता तरतूद कमी करण्याची २०२०-चकारणे काय आहेत व शिष्यवृत्तीया रक्कमेत वाढ करण्याची गरज आहे.</td>
<td>अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या इ.१ ली ते १० वीत शिकत असलेल्या पाल्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती देण्याची योजना केंद्र व राज्य शासनाच्या ५०:५० टक्के अर्थसहाय्याने राबविण्यांत येत होती. तसेच केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाल्याशिवाय राज्य शासनाचा निधी खर्च करता येत नाही.<br>सदर योजनेवर सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रक्कम रु.१३४२.६५ लाख एवढी तरतूद करण्यांत आलेली होती. तथापी सदर योजनेवर लाभार्थ्यांकडून एकूण २११९४ परिपूर्ण अर्ज प्राप्त झाले त्यानुसार रक्कम रुपये ३९२.१० लाख एवढा खर्च करण्यांत आला.<br>अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्तीकरीता अस्वच्छ व्यवसाय करत असल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा यांचेकडून अडचणी निर्माण होतात. त्यामुळे शिष्यवृत्तीसाठी पालकांकडून अर्ज कमी प्रमाणत प्राप्त होतात. अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्तीकरीता अस्वच्छ व्यवसाय करत असल्याबाबद्चे प्रमाणपत्र पालकांन देण्यांबाबत महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा यांना आयुक्तालयाचे अ. शा. पत्र क्र. २३६-, दि.१५/२/२०२१ अन्वये कळविण्यांत आलेले आहे.<br>शासन परिपत्रक दि. १७ मार्च, २००९ नुसार सदर योजनेचे दर दि. १/४/२००८ पासून खालील प्रमाणे आहेत. (दहा महिनेकरिता)</td>
</tr>
</table>

| बाब | वर्ग | वसतिगृहात न राहणारे | वसतिगृहात राहणारे |
|---|---|---|---|
| दरमहा शिष्यवृत्तीचे दर | १ ली ते २ री | रु.११०/- | - |
| | ३ री ते १० वी | रु.११०/- | रु. ७००/- |
| वार्षिक तदर्थ अनुदान | | रु. ७५०/- | रु.१०००/- |

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. अजाशि-२०२०/प्र.क्र.१८९/शिक्षण-१, दि. १ मार्च, २०२१ नुसार केंद्र शासनाकडून प्रस्तावीत करण्यांत आलेले शिष्यवृत्तीचे सुधारित दर सन् २०२०-२१ पासून खालील प्रमाणे-

(दहा महिनेकरिता)

| बाब | वर्ग | वसतिगृहात न राहणारे | वसतिगृहात राहणारे |
|---|---|---|---|
| दरमहा शिष्यवृत्तीचे दर | १ ली ते २ री | रु.२२५/- | - |
| | ३ री ते १० वी | रु.२२५/- | रु. ७००/- |
| वार्षिक तदर्थ अनुदान | | रु. ७५०/- | रु.१०००/- |

सदरील योजनेसाठीच्या दिव्यांग लाभार्थ्यांना केंद्र शासनाचे नियमावली दि. ०२/०४/२०१८ च्या मार्गदर्शक सूचना परिच्छेद ५.IV. नुसार शिष्यवृत्तीचे खालील अतिरिक्त लाभ लागू राहतील.

a)Reader Allowance of Rs 100 per month for blind students in classes III and X

b) Transport Allowance of Rs 50 per month for the disabled students not resending in the hostel located within the premises of educational institutions.

c) Special pay of Rs100 per month would be admissible to any employee of the hostel willing to extended help to severely orthopedically handicapped student residing in a hostel managed by the educational institutions or by the state govt.

d) Escort allowance of Rs. 50 per month for severely handicapped day scholar students with lower extremity disability.

e)Allowance of Rs. 100 per month towards extra coaching to mentally retarded and mentally ill students in class III and X.

| | | |
|---|---|---|
| | • प्रत्येक शाळेमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांची आकडेवारी काय आहे याबाबतची माहिती देणे अपेक्षित आहे. | • प्रत्येक शाळेमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या शालेय शिक्षण विभाग व एन. आय.सी. यांच्याकडील संगणीकृत प्रणालीमध्ये उपलब्ध असल्याने आयुक्तालयाच्या दिनांक २६/८/२०२१ च्या पत्रान्वये संबंधीत विभाग व यंत्रणेकडून सदर शाळानिहाय माहिती तात्काळ मागविण्यात आलेली आहे. संबंधीत यंत्रणेकडून माहिती प्राप्त होताच मा. अनुसूचित जाती कल्याण समिती यांना सादर करण्यांत येईल. |
| | • सदर योजनेचा प्रचार प्रसार होणे गरजेचे आहे. | • अस्वच्छ व्यावसायातील पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीबाबत शासनास आयुक्तालयाचे पत्र दि. २६/८/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे. |
| ६ | महर्षी विठ्ठलरामजी शिंदे मॅट्रीकपूर्व शिक्षण फी व प्रतिपूर्ती योजना | |
| | • सदर योजनेत मिळणारी शिक्षण फी ची | शासन निर्णय क्रमांक इबीसी-२०११/प्र.क्र.९७/शिक्षण-१, दि. ३० डिसेंबर, २०११ अन्वये खाजगी विनाअनुदानित व |

<table>
<tr>
<td></td>
<td>व परीक्षा फी ची रक्कम वाढवून मिळण्याची गरज आहे .</td>
<td>
कायम विनाअनुदानित शाळांमध्ये इ. १ ली ते १० वी. च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील विद्यार्थ्यांकरीता सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यांत येते.<br>
सदर योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची इयत्तानिहाय प्रतिपूर्ती दर खालील प्रमाणे-
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>इयत्ता</th><th>विद्यार्थ्यांना द्यावयाची दरमहा (शिक्षण शुल्क + परीक्षा शुल्काची) प्रतिपूर्ती (वर्षातुन दहा महिने कलावधीसाठी)</th></tr>
<tr><td>१</td><td>१ ली ते ४ थी</td><td>रु. १००/- दरमहा</td></tr>
<tr><td>२</td><td>५ वी ते ७ वी</td><td>रु. १५०/- दरमहा</td></tr>
<tr><td>३</td><td>८ वी ते १०वी</td><td>रु. २००/- दरमहा</td></tr>
</table>
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमध्ये इ. १ ली ते १० वी. च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील विद्यार्थ्यांकरीता सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यांत येणारी "मागासर्गीय मुला/मुलींकरिता मॅट्रीकपूर्व शिक्षण फी, परिक्षा फी" ही योजना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून "महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मागासवर्गीय मुलां/मुलींकरिता मॅट्रिकपूर्व शिक्षण फी, परिक्षा फी योजना" या नांवाने संबोधण्यास शासन निर्णय क्रमांक इबीसी-२०१६/प्र.क्र.६२७/ शिक्षण-१, दि. १५ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच सदरहु योजनेच्या अंमलबजावणीकरिता यापूर्वीच्या शासन निर्णयांन्वये विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्ती पुढील आदेश होईपर्यंत कायम राहतील. असे नमूद केलेले आहे.<br>
सदर योजनेच्या दरामध्ये महागाई निर्देशांकानुसार वाढ झाल्यामुळे खालील प्रमाणे दरवाढ प्रस्तावित करण्यांत येत आहे.
<table>
<tr><th>प्रलित शिष्यवृत्ती दर</th><th>सुधारीत प्रस्तावित शिष्यवृत्ती दर</th></tr>
<tr><td>इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना दरमहा रु.१००/- (१० महिन्यांकरीता एकूण रु. १०००/-)</td><td>१ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. २२५/- (१० महिन्यांकरीता एकूण रु.२२५०/-)</td></tr>
<tr><td>५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा रु.१५०/- (१० महिन्यांकरिता एकूण रु.१५००/-)</td><td>५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा रु.२५०/- (१० महिन्यांकरिता एकूण रु.२५००/-)</td></tr>
<tr><td>८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा रु.२००/- (१०महिन्यांकरीता एकूण रु.२०००/-</td><td>८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा रु.३००/- (१० महिन्यांकरीता एकूण रु.३०००/-)</td></tr>
</table>
वरील प्रमाणे सुधारीत दरवाढ करणेबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयाचे पत्र क्र. २२१०, दि. २५/८/२०२१ अन्वये शासनास सादर करण्यांत आला आहे.
</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>• सचिवांनी आश्वासित केल्यानुसार सर्व योजनांचा आढावा घेऊन नव्याने योजना अद्यावत करण्याची गरज आहे.</td>
<td>• योजनांचा सविस्तर आढावा घेण्यांत येत आहे.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | सदर योजनेचा प्रचार व प्रसार प्रभावीपणे करावा. | • महर्षी विठ्ठलरामजी शिंदे मॅट्रीकपूर्व शिक्षण फी व प्रतिपूर्ती योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीबाबत आयुक्तालयाचे पत्र दि.२६/८/२०२१ शासनास प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे. |
| | • सदर योजनेत असलेली दारिद्रय रेषेखालील विद्यार्थ्यांची असलेली अट शिथिल करण्यात यावी. | • आयुक्तालयाचे पत्र क्र. २२१०, दि. २५/८/२०२१ अन्वये शासनास सादर करण्यांत आला आहे. |
| ७ | शासकीय वसतीगृह | |
| | • राज्यातील सर्व शासकीय वसतीगृहात सर्व सुखसोयी अद्यावत कराव्यात व त्याअनुषंगाने एक दौरा आयोजित करुन पहाणी करणे गरजेचे आहे. | • सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय दिनांक २६ जुलै २०११ मध्ये नमुद केलेनुसार राज्यातील शासकीय वसतीगृहांतील विद्यार्थ्यांना सोयी दिल्या जातात. मा. आयुक्त समाजकल्याण यांनी सहआयुक्त (शिक्षण) यांचे समवेत नागपूर, अमरावती,मुंबई आणि लातूर या विभागांमध्ये दौरा करुन तेथील शासकीय वसतीगृहे आणि निवासी शाळांमध्ये दौरा करुन आवश्यक त्या सोयी सुविधांबाबत आढावा घेतलेला आहे. आयुक्तालयाद्वारे घेण्यात आलेल्या व्हिडीओ कॉन्फरन्स दिनांक २१/५/२०२१, दिनांक २२/७/२०२१ आणि दिनांक १३/८/२०२१ रोजी याबाबत सर्व प्रादेशिक उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांना सुचना दिलेल्या आहेत. तसेच राज्यातील शासकीय वसतीगृहे आणि निवासी शाळांमध्ये आवश्यक असलेल्या सोयी सुविधांबाबतची माहिती आयुक्तालयाचे पत्र क्र. १०८७, दिनांक २९/७/२०२१ अन्वये मागविण्यात आलेली आहे. सदर आवश्यक त्या वस्तूंची माहिती प्राप्त करुन घेण्यात येवून शासन मंजूरीनंतर उपरोक्त वस्तू पुरविण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| | • शासकीय वसतीगृहे जी भाड्याच्या इमारतीत आहेत ती तातडीने शासनाच्या मालकीच्या इमारती उभारुन स्थलांतरीत करणे गरजेचे आहे. | • सद्यस्थितीत राज्यातील एकूण ४४१ वसतीगृहांपैकी १८८ वसतीगृहे भाडेतत्वावरील इमारतीत सुरु आहेत. १८८ वसतीगृहांपैकी १०४ ठिकाणी वसतीगृहांसाठी अद्यापपर्यंत जागा उपलब्ध झालेली नाही. ४७ ठिकाणी वसतीगृहांचे बांधकाम सुरु आहे. ९ ठिकाणी बांधकाम पुर्ण झालेले आहे तथापी किरकोळ दुरुस्तीचे काम सुरु असल्याने अद्यापपर्यंत सामाजिक न्याय विभागास इमारतींचे हस्तांतरण झालेले नाही. २८ ठिकाणी वसतीगृहे अंदाजपत्रक स्तर/प्रशासकीय मान्यता/ निवीदा स्तरावर प्रलंबित आहेत. अद्यापही १०४ ठिकाणी जागा उपलब्ध नसलेल्या ठिकाणी संबंधित जिल्हाधिकारी,उपजिल्हाधिकारी तसेच तहसीलदार यांना जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्तालयाद्वारे तसेच स्थानिक कार्यालयाद्वारे वारंवार पाठपुरावा केला जात आहे. सन २०२१-२२ मध्ये मागा. मुलींचे शासकीय वसतीगृह वरुड, जि. अमरावती आणि मागा. मुलींचे शासकीय वसतीगृह कळंब, जि. उस्मानाबाद या दोन वसतीगृहांच्या बांधकामासाठी जमीन खरेदीबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी मागा. मुलींचे शासकीय वसतीगृह वरुड, जि. अमरावती या वसतीगृहाच्या जमीन खरेदीस शासन मान्यता प्राप्त झालेली आहे. |
| | • अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या | • सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्र.अजाशा- |

| | | |
|---|---|---|
| | मुलांमुलीकरीता प्रत्येक तालुक्यात एक निवासी शाळा सुरु करण्याची गरज आहे. | २००५/प्र.क्र.४३२/मावक-४, दिनांक ०१ जून, २००६ अन्वये राज्यातील प्रत्येक तालुक्यात एक शासकीय निवासी शाळा अशा ३५३ तालुक्यांमध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द मुलामुलींच्या शासकीय निवासी शाळा सुरू करण्यास मान्यतादेण्यात आलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय क्र.बीसीए-२००६/प्र.क्र.३९५/मावक-४, दिनांक ०४ जून, २००७ अन्वये पहिल्या टप्प्यातील १०० अनुसूचित जाती व नवबौध्द मुलामुलींच्या शासकीय निवासी शाळांचे ठिकाणे निश्चित करून सुरू करण्यात आलेल्या आहेत. तसेच उर्वरित २५३ तालुक्यामध्ये शासकीय निवासी शाळा सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून या अनुषंगाने आयुक्तालयाचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/शानिशा/२५३ शानिशा सुरू/का-५/२०२०-२१/७३, दिनांक १३.०१.२०२१ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तथापी सदर प्रस्तावामध्ये शासकीय निवासी शाळेतील पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधांसाठी येणाऱ्या खर्चाबाबतची माहिती शासनाकडून मागविण्यात आलेली होती. त्यानुसार आयुक्तालयाचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/शानिशा/२५३ शानिशा/सोसु अंदाजित खर्च/का-५/२०२०-२१/२३२६, दिनांक २०.०१.२०२१ अन्वये एका शासकीय निवासी शाळेसाठी अंदाजे रूपये १०२८४०३९/- रक्कमेचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे.<br>याबाबत शासनाकडून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रस्तावित करण्यात आलेल्या २५३ तालुक्यांच्या शेजारील तालुक्यांमध्ये अनुदानित वसतीगृहे, शासकीय वसतीगृहे, अनुदानित आश्रमशाळा व शासकीय निवासी शाळा यांची माहिती सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. सदरील माहिती आयुक्तालयाचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/शानिशा/माहिती/का-५अ/२१-२२/१९२५६, दिनांक ०७.०७.२०२१ अन्वये शासनास सादर करण्यात आलेली आहे. |
| | • सामाजिक न्याय विभाग व सार्वजनिक बांधकाम यांनी राज्यातील सर्व सुरु असलेल्या बांधकामाचा एकत्रित आढावा घेणे गरजेचे आहे व सामाजिक न्याय विभागात स्वतंत्र बांधकाम कक्ष स्थापन करण्याची गरज आहे. | • राज्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत सद्यस्थितीत ४७ ठिकाणी बांधकामे सुरु आहेत. सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारितील बांधकामे वेळेत व परिणामकारक पुर्ण करण्यासाठी आदिवासी विभागाच्या धर्तीवर सामाजिक न्याय विभागामार्फत स्वतंत्र बांधकाम यंत्रणा सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयाचे पत्र क्र. ७२० दिनांक ९/७/२०२० अन्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे. सोबत प्रत संलग्न करण्यात येत आहे. |
| ८ | कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना :<br>• सध्याची महागाई व रेडीरेकनरचे दर लक्षात घेता राज्यात जिरायत जमीन प्रति एकर ५ लाख व बागायत जमीन प्रति एकर ८ लाख रुपये हे दर अत्यंत कमी असल्याने प्रत्येक एकराचे दर | • सदरची योजना दि. १३ मार्च २०१२ च्या शासन निर्णयानुसार ३ लक्ष इतक्या कमाल मर्यादेपर्यंत अनुदान देण्यात येत होते. तसेच सदरची योजना ५०% कर्ज व ५०% अनुदान या प्रमाणात राबविण्यात येत होती. यामध्ये सुधारणा करुन सुधारित शासन निर्णय दिनांक १४.८.२०१८ नुसार रेडीरेकनरचे किंमतीप्रमाणे जमीन उपलब्ध होत नसल्यास जमिनीच्या मुल्यांबाबत संबंधित जमीन मालकाशी वाटाघाटी करुन रेडीरेकनरची किंमत (+) अधिक २०% पर्यंत प्रथम रक्कम वाढवून तरी सुध्दा जमीन विकत मिळत |

| | | |
|---|---|---|
| | वाढविण्यात यावेत.<br><br>• या योजनेअंतर्गत अत्यंत कमी लाभार्थ्यांना लाभ मिळत असल्याचे दिसून येत असल्याने या योजनेचा प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणात करण्यात यावा. | नसल्यास २०%च्या पटीत १००% पर्यंत म्हणजेच रेडीरेकनरच्या दुपटीपर्यंत वाढविण्यात येते. सद्यस्थितीत जिरायत जमिनीकरिता प्रति एकर ५ लक्ष व बागायत जमिनीकरिता प्रति एकर ८ लक्ष पर्यंत कमाल मर्यादा वाढविण्यात आलेली आहे.<br>• वरीलप्रमाणे पुर्ण राज्यामध्ये एकसारखे दर आहे परंतू प्रत्येक जिल्हयामध्ये जमिनीचे भाव वेगवेगळे असल्याने या अटीमध्ये सुधारणा होवून त्यामध्ये रेडीरेकनरच्या दरानुसार प्रत्येक जिल्हयानिहाय वेगवेगळे जमिन खरेदीचे दर निश्चित करावे यानुसार मा. समितीने केलेल्या रक्कमेत वाढ करणेच्या शिफारशीबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. ९२३३ दि. ०५.०३.२०२१ अन्वये धोरणात्मक बाब असल्यामूळे शासनास विनंती केली आहे.<br>• शासकीय योजनांची जाहिरात व प्रसिध्दी बाबत शासन स्तरावरुन जाहिरात प्रसिध्दीसाठी पॅनेल आहे.तसेच शासन निर्णय दि.१५ जुलै २०२० पासून जाहिरात व प्रसिध्दीबाबतचे कामकाज हे शासन स्तरावरुन करण्यात येत आहे.शासन स्तरावरुन सदर योजनेच्या प्रसिध्दीसाठी एस.टी. डेपो ओडीओ जिंगलद्वारे,एस.टी.बसेस इ.भारत पेट्रोल पंप,एच.पी.सी.एल.,इंडियन ऑईल संचलित पेट्रोलपंपावर फ्लेक्सच्या माध्यमातून,ऑडीयो,रेडीओ, टिव्ही चॅनेल, जास्त खपाची वर्तमानपत्राद्वारे याशिवाय शेगाव गजानन महाराज या सारख्या मोठया देवस्थानचे ठिकाणी व्यापक स्वरुपात योजनेची जाहिरात व प्रसिध्दी देण्याबाबत कार्यवाही केलेली आहे. सन २०१८.१९ या वर्षात १.७१ कोटी व २०१९.२० या वर्षात ९.५१ कोटी इतका खर्च सदर योजनेच्या प्रसिध्दीसाठी झालेला आहे. पुनश्च: या योजनेचा लाभ जास्तीत जास्त ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना मिळणेकरीता राज्यस्तरावर मोठया प्रमाणात प्रचार व प्रसिध्दीबाबत शासन स्तरावरुन उचित कार्यवाही करणेबाबत शासनास पत्र क्र. ३० दि. २६.०८.२०२१ अन्वये विनंती केलेली आहे.<br>• याशिवाय सर्व साधारण अर्जदारास या योजनेची माहिती व लाभ घेण्यासाठी आवश्यक अशा कागदपत्राची माहिती तात्काळ मिळावी व त्या संबधित फॉर्मचे नमुने इत्यादी मार्गदर्शक पुस्तीका सुलभ व सुबक बनविण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. जेणे करुन अर्जदारास एकाच मार्गदर्शकेतून आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊन योजनेचा लाभ सहज मिळण्यास मदत होईल. |
| ९ | स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने अर्थसाह्य योजना :<br>• सदर योजनेचा लाभ हा ग्रामीण भागातील बचत गटांना देण्यात येत असला तरी ट्रॅक्टर व उपसाधने ही मागासवर्गीय बचत गटातील लाभार्थी वापरत आहेत किंवा कसे याबाबतचा सुद्धा विभागीय अधिकाऱ्यांनी | • याबाबतचा आढावा घेण्याकरिता सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वेळोवेळी दूरदृष्य प्रणालीद्वारे तसेच आयुक्तालयाचे पत्र दि.१८.२.२०२१ व १७.५.२०२१ अन्वये सदर पुरविण्यात आलेला मिनी ट्रक्टर व त्याची उपसाधने गटाच्या वापरात असून या योजनेचा लाभ दिल्यामुळे बचतगटाच्या उत्पन्नात वाढ होऊन याची तपासणी करणे करीता सर्व क्षेत्रिय अधिका-यांना लेखी पत्राद्वारे सूचना अलाहिदा देण्यात आलेल्या आहेत.<br><br>• मा.समितीने सदर केलेली शिफारस हि धोरणात्मक बाब असल्याने याबाबत शासनस्तरावरुन उचित आदेश होणे आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| | वेळोवेळी आढावा घेणे गरजेचे आहे.<br>• या योजनेच्या धर्तीवर शहरी भागातील लाभार्थ्यांना सुद्धा एक चांगली योजना करणे गरजेचे आहे. | • सदयस्थितीत शहरीभागामधून विविध महामंडळाच्या माध्यमातून बीज भांडवल हि<br>• योजना राबविण्यात येत आहे.यामधून शहरी भागातील लाभार्थी लाभ घेत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| १० | गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना :<br>• या योजनेत विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन महानगरपालिका/ नगरपालिकेकडून पीच परवाने प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात यावेत.<br>• या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होत असल्याचे दिसून येत नाही. शासनाने पुढाकार घेऊन ही योजना प्रभावीपणे राबविली पाहिजे. | • सदर योजनेच्या अनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई हे नियंत्रक म्हणून शासनाने घोषित केलेले आहे. त्यांचे स्तरावरुन महानगर/नगर पालिकेकडून पीच परवाने प्राधान्याने घेणेबाबत पत्र क्र. २१ दि. २६.०८.२०२१ अन्वये सूचना दिलेल्या आहे.<br>• गटई कामगारांना स्टॉल पुरविणे योजनाचे मुल्यमापन करणे करीता बार्टी पुणे या संस्थेस कळविण्यात आलेले होते.त्यानुसार बार्टी संस्था पुणे यांनी योजनेचे सुक्ष्म असे सर्व्हे करुन मुल्यमापन अहवाल सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी सन १९९७ पासून सन २०२०.२१ अखेर राज्यात एकूण २४७१६ इतके गटई स्टॉलचे वाटप केलेले आहे.<br>• सदर योजनेच्या अनुषंगाने विविध लोकप्रतिनिधी व संघटना यांचेमार्फत प्राप्त झालेल्या निवेदनावर उचित कार्यवाही करणेकरीता लिडकॉम संस्थेस सूचना दि.८.२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. |
| ११ | केंद्र शासनाच्या स्टॅन्ड अप योजनेत लाभार्थ्यांना मार्जिन मनी उपलब्ध करून देण्याची योजना :<br>• सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे समितीला दिसून येत आहे. | • सदर योजना ही सन २०१९-२० या वर्षापासून सुरु झालेली असून, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये सदर योजनेकरिता रुपये ७.५० कोटी इतकी तरतूद प्राप्त झालेली होती. सदर योजनेसाठी परिपूर्ण प्राप्त झालेले एकूण ८३ प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. सदर मंजूर करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना ६.८३ कोटी इतके मार्जिन मनी रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे. तसेच अशी मार्जिन मनी म्हणून मंजूर करण्यात आलेल्या रकमेमुळे संबंधित लाभार्थ्यांने त्यांचे सादर केलेल्या प्रकल्प किमतीचे कर्ज कमी करण्यास मदत झाली आहे. परिणामी सदरच्या योजनेचा खूप मोठया प्रमाणात लाभ झाला असल्याचे मनोगते व्यक्त केलेली आहेत.<br>• सन २०२१-२२ या वर्षातसुध्दा या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी विभागनिहाय छाननी समितीचे गठण करण्यात आले असून, संबंधित लाभार्थ्यास त्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले कागदपत्रांची तात्काळ क्षेत्रीय स्तरावरच पूर्तता करुन घेणेकरीता सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना दिलेल्या आहेत. याबाबत माहे एप्रिल व मे २०२१ मध्ये दुरदृष्यप्रणालीद्वारे बैठकांचे आयोजन करुन<br><br>सदर योजनेतंर्गत जास्तीत जास्त नव उद्योजक तयार होणेकरीता आयुक्तालय |

- ज्या औद्योगिक सहकारी संस्था चांगले काम करत आहेत, त्या तपासून औद्योगिक सहकारी प्रस्तावांना मान्यता देऊन मागासवर्गीय घटकातील संस्थांना उद्योगात पुढे आणले पाहिजे असे समितीचे मत आहे.

कार्यालय स्तरावरुन दि. २३.१०.२०२०, २६.१०.२०२०, ०७.०६.२०२१ अन्वये क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहे तसेच या योजनेचा लाभ मिळणेकरीता जास्तीस जास्त योजनेची प्रसिध्दी देण्याकरीता या कार्यालयाचे पत्र दि. ०१.०१.२०२१ अन्वये सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना ,जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी यांना प्रसिध्दीसाठी सूचना दिलेल्या आहेत.

ज्या औद्योगिक सहकारी संस्था चांगले काम करत आहेत, त्यांचे प्रस्ताव आवश्यक त्या त्रुटींच्या पुर्ततेसह प्राप्त करुन घेणेबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. असे परिपूर्ण झालेले प्रस्ताव पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव शासनास सादर करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

- अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करणे या योजनेअंतर्गत ३७२ संस्थांना वित्तीय सहाय्य करण्यात आलेले आहे. व ५ नविन संस्थांना मंजूरी मिळालेली आहे

| अ. क्र. | वर्ग-वारी | निकष | विभागाने वर्गवारी केलेल्या संस्था | सहकार विभागाने लेखा परिक्षण केलेल्या संस्था | एकूण संस्था |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ | प्रकल्पात उत्पादन सुरु | ६६ | ११ | ७७ |
| २ | ब | १. बांधकाम पूर्ण /प्रगतीपथावर<br>२. मशिनरी बसविण्याची कार्यवाही सुरु | ९६<br>५+९१)नवीन( | २२ | ११८ |
| ३ | क | १. पहिला हप्ता घेवून उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केलेल्या संस्था<br>२. मान्यता रद्द करुन एकरकमी वसुली करण्यासाठी प्रस्तावित संस्था<br>३. सहकार विभागाकडून प्रशासकीय कारवाईस पात्र संस्था | ७६ | ४३ | ११९ |
| ४ | ड | गुन्हे दाखल झालेल्या संस्था/ सहकार विभागाकडून तपासणीअंती विनिर्दीष्ट अहवाल सादर केलेल्या संस्था/फौजदारी कारवाई सुरु असलेल्या संस्था. | १० | ५३<br>– | ६३ |
| | | | २४८ | १२९ | ३७७ |

" अ" मधील ७६ संस्थांच्या प्रकल्पामध्ये उत्पादर सुरु झालेले आहे तसेच ब मधील ११७ संस्थांच्या प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण/प्रगती पथावर /मशिनरी बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. अशा ४५ संस्थांची सुनावणी सन २०२०-२१ मध्ये घेण्यात आल्या असून ज्या संस्थांन निधी

| | | |
|---|---|---|
| | | उपलब्ध करून दिल्यामुळे त्या संस्था उद्योग उभे करू शकतील अशा अ + ब च्या एकूण १९३ संस्थांपैकी ज्या संस्था पात्र ठरतील त्या संस्थांचे प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाकडून मागवून त्या संस्थांना अर्थसहाय्य देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याने अशा संस्थांना आवश्यक त्या प्रमाणात अनुसुचित जाती उपयोजनेतून पुनर्विनियोजनाद्वारे निधी मंजूर करण्याबाबत पुरवणी मागणी शासनास सादर करण्यात येईल.<br>तसेच संस्थांच्या प्रकल्पाचे संबंधित पुरवठादार यांचेशी दुरद्दष्य प्रणालीद्वारे संपर्क साधून प्रकल्प सुरू होण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असून ८ नविन संस्थांचे प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास सादर करण्यात आलेले आहेत. |
| १२ | रमाई आवास योजना :-<br>• रमाई आवास योजनेंतर्गत सुरु असलेल्या घरकुलांसाठी १५०० कोटी रुपयांची गरज असतांना केवळ ३०० कोटी दिल्याने या योजनेला गती मिळत नसल्याने उर्वरित १२०० कोटी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत समिती शिफारस करीत आहे. | राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील कुटूंबांचे राहणीमान उंचवावे व त्यांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी २६९ चौ.फुटाचे पक्के घर बांधून देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक १५ नोव्हेंबर,२००८ अन्वये रमाई आवास योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे. त्यानंतर शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१० नुसार सदर योजनेमध्ये सुधारणा करण्यात येऊन योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सन २०१०-११ पासून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या स्थानिक यंत्रणांमार्फत सुरु आहे.<br>तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ३० सप्टेंबर, १०१६ अन्वये सन २०१६-१७ पासून रमाई आवास योजना (ग्रामीण) या योजनेची संपूर्ण अंमलबजावणी, संनियंत्रण व निधीचे व्यवस्थापन संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई या राज्यस्तरीय कक्षामार्फत करण्यात येत आहे.<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ७.१.२०१७ व दिनांक १.१०.२०१८ अन्वये लाभार्थी अनुदान,कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादेत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे :- |
| | • | (रुपये लाखात) |

| बांधकामासाठी क्षेत्रनिहाय खर्चाची मर्यादा | | लाभार्थी हिस्सा | वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये | घरकूलाचे क्षेत्रफळ (चौ.फु) |
|---|---|---|---|---|
| क्षेत्र | रुपये | | | |
| ग्रामीण (शौचालय बांधकामासह) | १.३२ | ---- | १.२० | २६९ |
| डोंगराळ/ नक्षलग्रस्त (शौचालय बांधकामासह) | १.४२ | -- | १.२० | २६९ |

15

| | | |
|---|---|---|
| | | रमाई आवास योजना (ग्रामीण) या योजनेंतर्गत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद रु. ५००.०० कोटी पुरेशी नसल्याने संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई यांनी पत्र दिनांक २१.१०.२०२० अन्वये रु. १५१६.०३ कोटी इतक्या अतिरिक्त तरतूदीची मागणी नोंदविली होती सदर मागणी विचारात घेऊन सन २०२०-२१ च्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात रु. १५१६.०३ कोटी इतक्या जादाच्या तरतूदीचा पुरक मागणीचा प्रस्ताव आयुक्तालयाचे पत्र दि.१७.११.२०२० अन्वये शासनास सादर करण्यात आला होता. त्यापैकी शासनाने ज्ञापन दि. १५.२.२०२१ अन्वये रु. ५००.०० कोटी इतकी तरतूद पुरक मागणीद्वारे व अर्थसंकल्पीत तरतूद रु. ५००.०० कोटी अशी एकूण तरतूद रु. १०००.०० कोटी सन २०२०-२१ करीता माहे मार्च, २०२१ पर्यत प्राप्त झालेली होती. सदर प्राप्त तरतूद संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई यांना वर्ग करण्यात आली असून सदर तरतूद योजनेच्या अंमलबजावणीसाठी खर्च करण्यात येत आहे.<br>तसेच सन २०२१-२२ करीता रु. ७५०.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत असून त्यापैकी शासन ज्ञापन दिनांक ६ जुलै, २०२१ अन्वये १८७.५० कोटी इतकी तरतूद बी.डी.एस.वर खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात आली असून सदर तरतूद आयुक्तालयाचे आदेश दिनांक ५ ऑगस्ट, २०२१ अन्वये संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई यांच्याकडे योजनेच्या अंमलबजावणीसाठी वर्ग करण्यात आली आहे.<br>सदर योजनेंतर्गत सन २०१६-१७ ते २०२१-२२ पर्यत एकूण २९६७.५० कोटी इतकी तरतूद शासनाकडून प्राप्त झाली असून त्यानुषंगाने संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई या अंमलबजावणी यंत्रणेमार्फत अद्याप पर्यत एकूण मंजूर ३,२२,७९६ घरकुलांपैकी २,०८,७११ इतक्या घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे व १,१४,०८५ इतक्या घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक तरतूद वेळोवेळी शासनाकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. |
| | • रमाई आवास योजनेत अघोषित झोपडपट्यांचाही समावेश करावा अशी समिती शिफारस करीत आहे. | राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील कुटूंबांचे राहणीमान उंचवावे व त्यांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी ३२३ चौ.फुटाचे पक्के घर बांधून देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक १५ नोव्हेंबर,२००८ अन्वये रमाई आवास योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे. त्यानंतर शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१० नुसार सदर योजनेमध्ये सुधारणा करण्यात येऊन योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सन २०१०-११ पासून महानगरपालिका क्षेत्रासाठी आयुक्त, महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत योजनेची अंमलबजावणी सुरु आहे. |

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ७.१.२०१७ अन्वये लाभार्थी अनुदान,कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा व घरकुलाच्या क्षेत्रफळात खालीलप्रमाणे सुधारणा केली आहे :-

(रुपये लाखात)

| बांधकामासाठी क्षेत्रनिहाय खर्चाची मर्यादा | | लाभार्थी हिस्सा | उत्पन्न मर्यादा रुपये | घरकूलाचे क्षेत्रफळ (चौ.फु) |
|---|---|---|---|---|
| क्षेत्र | रुपये | | | |
| (ब) महानगरपालिका | २.५० | १०% | ३.०० | ३२३ |
| (क)नगरपालिका | २.५० | ७.५% | ३.०० | ३२३ |

वरीलप्रमाणे रमाई आवास योजना (शहरी) या योजनेंतर्गत घरकुल बांधकामासाठी प्रतिलाभार्थी अनुदान हे रु. २.५० लक्ष इतके आहे व शहरी भागातील खाजगी जागेची किंमत अवाजवी असल्याने यामधील तफावत दुर करुन किंवा घरासाठी जागा खरेदी किमतीची मर्यादा निश्चित करुन ज्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील व्यक्ती/कुटुंबाकडे स्वत:ची जागा नाही आणि ते खाजगी मालकीच्या जागेवर अतिक्रमण करुन वास्तव्य करीत आहेत. अशा लाभार्थ्यांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे असलेली आरक्षित किंवा त्या भागातील जागा प्रधानमंत्री आवास योजना / झोपडपट्टी पुनर्वसन योजना यांच्या नियमानुसार पुर्नविकास करुन त्या ठिकाणी सदर लाभार्थ्यांसाठी घरकुल किंवा बहुमजली इमारत बांधून देण्याचे धोरण ठरविण्यासाठी तसेच शहरी भागातील योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण या कक्षाच्या धर्तीवर रमाई आवास योजना (शहरी) या योजनकरीता राज्यस्तरावर नवीन राज्य व्यवस्थापन कक्ष-नागरी गृहनिर्माण कक्ष स्थापन करुन सदर कक्षामार्फत शहरी योजनेची संपूर्ण अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी शासनस्तरावरुन सर्वसमावेशक धोरण तयार करण्याकरीता आयुक्तालयाचे पत्र दिनांक २ जुलै, २०२१ अन्वये धोरणात्मक निर्णयासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

तसेच सदर योजनेकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी रु. १००.०० कोटी इतक्या निधीची मागणी करण्यात आली होती परंतू प्रत्यक्षात रु. ६०.०० कोटी इतका निधी प्राप्त झाला तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता सुध्दा रु. १००.०० कोटी निधीची मागणी करण्यात आली होती परंतू प्रत्यक्षात फक्त रु. २०.०० कोटी इतकाच निधी प्राप्त झाला व सन २०२१-२२ करीता रु. १००.०० कोटी इतक्या निधीची मागणी नोंदविण्यात आलेली आहे. अद्याप पर्यत निधी अप्राप्त आहे.

<table>
<tr>
<td>१३</td>
<td>

• अनुसूचित जाती प्रवर्गातील वस्त्यांमध्ये सांस्कृतिक कार्यासाठी किंवा लग्न समारंभासाठी सभागृह मंडप यासाठी शासनाकडून २० लाख समारंभाच्या निधीची मर्यादा असल्याने निधीची मर्यादा वाढविणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच कमी लोकसंख्या असलेल्या गावात स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध करण्यात यावी.

</td>
<td>

• अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील कुटूंबांचे राहणीमान सुसहय व्हावे, राहणीमानात सुधारणा व्हावी, म्हणून त्यांचे वस्त्यांमध्ये पायाभूत सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सदर योजना राबविली जाते. सदरची कामे जिल्हा परिषदेमार्फत पाच वर्षाचा बृहत आराखडा तयार केला जातो व त्यानुसार विकासाची कामे केली जातात.

• अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेच्या शासन निर्णयामध्ये सांस्कृतिक कार्य, लग्न समारंभ किंवा सभागृह मंडप यासाठी निधीची तरतूद किंवा या समारंभासाठी शासनाकडून रु. २० लाख निधी देण्याची तरतूद नाही.

• तथापि, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ५/१२/२०११ नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेच्या सर्व बाबींचा विचार करुन लोकसंख्येच्या निकषानुसार जास्तीत जास्त रु. २० लाख अनुदान देण्याची तरतूद आहे. त्याचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे :-

<table>
<tr><td>१</td><td>१० ते २५</td><td>२ लक्ष</td></tr>
<tr><td>२</td><td>२६ ते ५०</td><td>५ लक्ष</td></tr>
<tr><td>३</td><td>५१ ते १००</td><td>८ लक्ष</td></tr>
<tr><td>४</td><td>१०१ ते १५० पर्यंत</td><td>१२ लक्ष</td></tr>
<tr><td>५</td><td>१५१ ते ३००</td><td>१५ लक्ष</td></tr>
<tr><td>६</td><td>३०१ च्या पुढे</td><td>२० लक्ष</td></tr>
</table>

• यामध्ये प्राधान्याने पाणीपुरवठा, मलनिस्सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, विजपुरवठा व समाजमंदिर ही कामे प्राधान्यक्रमाने बृहतआराखडा मंजूर करुन केली जातात.

• अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेंतर्गत घ्यावयाच्या समाजमंदिरांच्या बांधकामासाठी टाईप प्लॅन निश्चित करुन त्याची बांधकाम मर्यादा रु. ७ लाख व देखभाल दुरुस्तीसाठी रु. १.०० लाख इतके अनुदान दिले जाते.

• शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०११ नुसार निश्चित करण्यात आलेले अनुदान मर्यादेमध्ये महागाई निर्देशांकानुसार अनुदानाच्या रक्कमेत दुप्पट वाढ करण्याबाबत आयुक्तालयाने पत्र क्रमांक ११७७, दिनांक २९/०७/२०१९ व पत्र क्र.४८४, दिनांक २२ जुलै, २०२१ अन्वये अनुदान मर्यादेत वाढ करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

• आयुक्तालयाचे पत्र क्रमांक ४८३, दिनांक २२/०७/२०२१ नुसार जिल्हा परिषद, बीड यांचे मागणीनुसार समाजमंदिर बांधकामासाठी रक्कमेची मर्यादा रु. ७ लाखावरुन रु. १० लाख व देखभाल दुरुस्ती खर्च रु. २ लाख करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. तसेच सदर योजनेंतर्गत स्माशानभूमी बांधकाम व परिसर सुधारणा, विद्यार्थ्यांसाठी वाचानलय व अभ्यासिका बांधकाम व अनुषंगीक सुविधा निर्माण

</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | करणे, वस्तीमध्ये नागरीक व वृध्दांसाठी खुली व्यायामशाळा व उद्यान तयार करणे, वस्तीमध्ये मुले व तरुणांसाठी व्यायामशाळा बांधकाम व व्यायामाचे साहित्य, बचतगटांसाठी बचत गट भवन बांधकाम व अनुषंगीक सुविधा, सार्वजनिक स्वच्छतागृह बांधकाम व क्षारयुक्त पिण्याचे पाणी असलेल्या ठिकाणी फिल्टर बसविणे या नवीन कामांचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यामध्ये स्मशानभूमीचाही समावेश आहे.<br>• सदर योजनेस शासन निर्णय दिनांक १३ एप्रिल, २०१७ अन्वये अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत जिल्हा नियोजन समितीमार्फत संबंधित जिल्हा परिषदेस थेट निधी उपलब्ध करुन दिला जातो. |

# परिशिष्ट - तीन

## समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

## पहिली बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक बुधवार, दिनांक ३ फेब्रुवारी २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता कक्ष क्रमांक ८०१, विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीत समाजकल्याण विभागाकडून अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे संगणकीय सादरीकरण ( Power Point Presentation ) केले. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

( १ ) कुमारी प्रणिती शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

( २ ) श्री. यशवंत माने, वि.स.स.

( ३ ) डॉ. किरण लहामटे, वि.स.स.

( ४ ) श्री. लहू कानडे, वि.स.स.

( ५ ) श्री. सुनील कांबळे , वि.स.स.

( ६ ) श्री. नामदेव ससाणे, वि.स.स.

( ७ ) श्री. टेकचंद सावरकर, वि.स.स.

( ८ ) श्री. अरुण लाड, वि.प.स.

( ९ ) श्री. राजेश राठोड, वि.प.स.

( १० ) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

( ११ ) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

२. श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव ( समिती )

३. श्री. घ. ज्ञा. देबडवार, कक्ष अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधींची उपस्थिती :**

१. श्री. श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग

२. श्री. दिनेश डिंगळे, सहसचिव, सामाजिक न्याय.

३. श्री. विजयकुमार गायकवाड, सह आयुक्त (शिक्षण) समाजकल्याण आयुक्तालय, पुणे

४. श्री. सिध्दार्थ अ. झाल्टे, अवर सचिव, सामाजिक न्याय.

५. श्रीमती वृशाली शिंदे, उपायुक्त, नियोजन स. क. आयुक्तालय, पुणे

६. श्री. उमेश म. घुले, निबंधक, बार्टी, पुणे.

सदरहू बैठकीत सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांच्याकडून समितीसमोर विभागाच्या विविध योजनांसंदर्भात संगणकीय सादरीकरण करण्यात आले. तसेच समितीने विभागाच्या विविध योजनांसंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

## दुसरी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक मंगळवार, दिनांक २४ मे २०२२ रोजी दुपारी १.०० वाजता कक्ष क्रमांक ८१२, विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) कुमारी प्रणिती शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) श्री. यशवंत माने, वि.स.स.

(३) श्री. लहू कानडे, वि.स.स.

(४) श्री. सुनील कांबळे , वि.स.स.

(५) श्री. अरुण लाड, वि.प.स.

(६) श्री. राजेश राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. शिवदर्शन साठ्ये, उप सचिव

२. श्रीमती सीमा तांबे, अवर सचिव (समिती)

३. श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधींची उपस्थिती :**

१. श्री. सुमंत भांगे, सचिव, सामाजिक न्याय विभाग

२. श्री. दिनेश डिंगळे, सहसचिव, सामाजिक न्याय विभाग

३. रा. ना. सवने, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग

४. डॉ. प्रशांत नारनवरे, आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय

५. श्री. दिनेश डोके, अतिरिक्त आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे

६. प्रशांत चव्हाण, उपायुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे

७. श्री. विजयकुमार गायकवाड, प्र. उपायुक्त (शिक्षण), पुणे.

सदरहू बैठकीत समितीने सचिव, सामाजिक न्याय विभाग व आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

## तिसरी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक सोमवार, दिनांक २३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४-०० वाजता कक्ष क्रमांक २००१ (विसावा मजला), विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. नारायण कुचे, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) डॉ. अशोक माने, वि.स.स.

(३) श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स.

(४) श्री. गजानन लवटे, वि.स.स.

(५) श्री. संजय मेश्राम, वि. प. स.

(६) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.

(७) श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. विलास आठवले, सचिव - ३

२. श्री.सुभाष नलावडे, सह सचिव (समिती) तथा वि.का.अ

३. श्रीमती सीमा तांबे, अवर सचिव

४. श्री. राहुल लिंगरवार, कक्ष अधिकारी

समितीने या बैठकीत प्रारुप अहवालावर चर्चा करून किरकोळ दुरुस्तीसह तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.